# मॉडर्न

१९८१-८२



# I AM MINTY
# A SQUIRREL TINY




Thrifty, nifty, sprightly
I helped Prince Rama
cross the sea.
Got a pat on the back-
for all to see.
Others eminent-
still bless me
Even at Mahabank—
—yes, that's me.
Once a denizen of parks
and tress
I live on branches that
grow with me.
Mahabank branches
hundred's of now and
more to be.

**BANK OF MAHARASHTRA**

[ A Govt. of India Undertaking ]
H. O. - 'Lokmangal'
1501, Shivajinagar,
Pune - 411 005

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
**मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय**
शिवाजीनगर, पुणे ५.



# मॉडर्न

१९८१ - ८२

वर्ष बारावे * अंक बारावा

*

संपादक :
डॉ. शं. ना. नवलगुंदकर

॥ चातुर्येविण खटपट । ते विद्याचि फल्कट ॥

बहुत बोल्णें ऐकावें । तेथें मौन्याचि धरावें ! अल्पचिन्हें समजावें । जगदांतर
बाष्कळांमधें बैसो नये । उद्धटासी तंडो नये । आपणाकरितां खंडो नये । समाधान जनाचें
नेणतेपण सोडू नये । जाणतेपण फुगो नये । नाना जनांचीं ह्रदयें । मृदुशब्दें उकलावें
प्रसंग जाणावा नेटका । बहुतांसीं झुंज घेऊ नका । खरें असताचि नासका । फड होतो

॥ जगामधें जगमित्र । जिव्हेपासीं अ हे सूत्र ॥

# मॉडर्न

# १९८१–८२

॥ मॉडर्न १९८१–८२ । संपादन–समिती ॥

↓

प्राचार्य स. य. गंभीर । उपप्राचार्य ल. ह. गाडगीळ । उपप्राचार्य प. स. चिरपुरकर
उपप्राचार्य सीताराम रायकर । प्रा. अरुण दांडेकर । डॉ. र. वि. गंधे
प्रा. राजीव कुलकर्णी । विद्यार्थिप्रतिनिधी : अशोक वंजारी
प्रकाशक । प्रा. स. य. गंभीर । प्राचार्य, मॉडर्न कॉलेज । शिवाजीनगर । पुणे ५
मुद्रक । श्री. गो. व्यं शिंगरे । इंप्रिंट । १०४७ शुक्रवार पेठ, पुणे ३०.

↑

॥ मॉडर्न १९८१–८२ । प्रकाशक–मुद्रक ॥

आधीच शिकोन जो शिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी
गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळें ॥
आधीं कष्ट मग फळ । कष्टचि नाही ते निर्फळ

*

विद्याभ्यास सोडू नये कांहीं केल्या ।
ज्याचा जो अभ्यास जैसा । तैसा व्यापार पाहणें
पाहाता पाहाता जाणे । जाणता जाणता कळे
कळता कळता शीके । शिकता शिकता करी
करिता करिता वाढे । वाढता वाढता भला

*

प्रचितीवीण जें बोलणें । तें अवघेंचि कंटाळवाणें
तोंड पसरुन जैसें सुणें । रडोनि गेलें

*

मतामताचा गलबला । कोणी पुसेना कोणाला
जो जे मतीं सापडला । तयास तेचि थोर

*

पाठ उदंडचि असावें । सर्वकाळ उजळीत जावें
सांगितले गोष्टीचे असावें । स्मरण अंतरीं

*

उत्कट भव्य तेचि घ्यावे । मळमळीत अवघेंचि टाकावें
निस्पृहपणे विख्यात व्हावें । भूमंमळीं

*

हिताकारणें बोलणें सत्य आहे ।
हिताकारणें सर्व शोधूनि पाहे
हिताकारणें बंड पाखांड वारी ।
तुटे वाद संवाद तो हितकारी



# समर्थ-वाणी

## सार असार एकचि करावें हें मूखपण

वाचन कसे असावे ? तर समर्थांच्या मताप्रमाणे ते सर्व प्रकारचे असावे. वाचनाला कसली मर्यादा नसावी. परंतु आपणाला ज्या विषयात प्रावीण्य मिळवावयाचे असेल त्याचे वाचन नियमित असावे. त्याखेरीज नाना प्रकारचे देश, नाना प्रकारची माणसे, खगोलविद्या याचे ज्ञान हवे. गायकवादननर्तनादि कला वर्ज्य मानू नयेत. नाना वल्ली, नाना औषधी ज्योतिष-विद्या दुर्लक्षू नये. चौदा विद्या, चौसष्ट कला यांचेही थोडेथोडे ज्ञान हवेच. परंतु हे सर्व मिळविताना सारासार विवेक हवा. आंधळेपणाने वाचू, ऐकू नये.

बहुत ग्रंथ धुंडाळावे । अपार पाठांतर करावे

हे खरेच परंतु शृंगारिक वाचून मन चळते आणि आंधळे पाठांतर निरुपयोगी ठरते. त्यात निवड करता येत नसेल, अर्थ न कळता पाठांतर होत असेल तर ते समर्थांच्या मते पक्के मूर्खपणाचे होय.

## देव दगडाचा नव्हे तर

अचूक यत्न तो देवो । चुकणें दैत्य जाणिजे
न्याय तो देव जाणावा । अन्याय राक्षसी क्रिया
सावधू देव जाणावा । उन्मत्तू दैत्य बोलिजे
साक्षपी वंश देवाचे । आळशी वंश दानवी

## यत्न तो देव जाणावा

यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेवीण दरिद्रता
आळसी घात घेणा तो । कष्टला म्हृणिजे बरा
उदंड ओळखी होता । उदंड भाग्य होतसे
उदंड कलहो होता । उदंड लाथ खातसे ।।

## धीर-अधीर

धीर्धरा धीर्धरा तकवा । हडबडू गडबडू नका
काळ देखोनि वर्तावे । सांडावे भय पोटीचे
धरावा धीर तो मोठा । विचारे पाहता बरे
अधीर माणसे खोटी । काम काही कळेच ना

## आई ती आईच

वीट नाहीं, कंटाळा नाहीं । आलस्य नाहीं, त्रास नाहीं
इतुकी माया कोठेंचि नाहीं । मातेवेगळी
पुत्र वैभवहीन भिकारी । माता तैसाचि अंगीकारी
दगदगला देखोनि, अंतरी । त्याच्या दुःखें दुखावें

## अक्षर कसे पाहिजे ?

वाटोळें, सरळें, मोकळें । वोतलें मसीचें काळें
कुळकुळीत ओळी चालिल्या ढाळें । मुक्तमाळा जैशा
अक्षरमात्र तितुकें नीट । नेमस्त पैस, काने नीट
आडव्या मात्रा त्याही नीट । अर्कुली वेलांट्या
पहिलें अक्षर जें काढिलें । ग्रंथ संपेतों पाहात गेलें
येका टाकेंचि लिहिलें । । ऐसें वाटे
अक्षराचें काळेपण । टांकाचें ठोसरपण
तैसेंचि वळण वांकण । सारिखेंचि
ओळीस ओळ लागे ना । अर्कुली भेदी ना
खालील ओळीस स्पर्शे ना । अथवा लंबाक्षर
ज्यांचें वय आहे नूतन । त्यानें ल्याहावें जपोन
जनासी पडे मोहन । ऐसें करावें

## माणसाचे मोठेपण

पृथ्वीमध्यें लोक सकळ । येक संपन्न, येक दुर्बळ
येक निर्मळ, येक वोंगळ । काय निमित्य ?
हे सकळ गुणांपासीं गती । सगुण भाग्यश्री भोगती
अवगुणासि दरिद्रप्राप्ती । यदर्थी संदेह नाहीं
जो जो जेथें उपजला । तो तो ते वेवसाईं उमजला
तयासी लोक म्हणती भला । कार्यकर्ता
'जाणता' तो कार्य करी । नेणता कांहींच न करी
जाणता तो पोट भरी । नेणता भीक मागें
हें तों प्रगटचि असे । जनीं पाहातां प्रत्यक्ष दिसे
विद्येवीण करंटा वसे । विद्या तो भाग्यवन्त
वडील आहे करंटा । आणि समर्थ होय धाकुटा
कां, जे विद्येनें मोठा । म्हणोनिया !

## प्रपंच करावा नेटका

आधीं प्रपंच करावा नेटका । मग·घ्यावें परमार्थविवेका
येथें आळस करूं नका । विवेकी हो
प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल
प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी
प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळे ना खायाला
मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ?
प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा
म्हणोनि सावधानपणें । प्रपंच-परमार्थ चालवणें
ऐसें न करतां, भोगणें । नाना दुःखें



# आमचे मनोगत

यदाचा 'मॉडर्न' हा नियतकालिकाचा अंक आपल्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. या निमित्ताने गतकालातील प्रगतीचे मूल्यमापन करता येते व आगामी योजनांचे संकल्पही करता येतात. १९७० मध्ये आमचे महाविद्यालय सुरू झाले तेव्हा विद्यार्थिसंख्या ७०७ इतकी होती तर आज ती ३३५४ इतकी झाली आहे. त्या वेळी केवळ २८ प्राध्यापक होते तर आज ११७ प्राध्यापक आहेत. प्रतिवर्षी महाविद्यालयात प्रवेश मागणाऱ्यांची व प्रवेश घेणाऱ्यांची संख्या वाढतच आहे. बी. ए; बी. एस्सी. बी. कॉम्. ह्या पदवी परीक्षांच्या अनेक विषयांचे अभ्यासक्रम चालू आहेत. त्या शिवाय एम् कॉम् चे वर्गही सुरु आहेत. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या धुरीणांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून अत्यल्पकालात महाविद्यालयाला सुस्थिर, समृद्ध व प्रथितयश असा लौकिक प्राप्त करून दिला आहे, त्यांच्या विधायक दृष्टिकोणामुळे महाविद्यालयाची संख्यात्मक व गुणात्मक प्रगती झाल्याचे विद्यापीठ–परीक्षांच्या निकालांवरून दिसून येते.

## बहुविध समस्या

शैक्षणिक जगतातील उद्दिष्टांची अनिश्चिती व जीवनमूल्यांतील पडझड झाल्याने एकूण परिस्थिती स्फोटक बनली आहे. गगनाला गवसणी घालणाऱ्या महत्त्वाकांक्षी योजना व तुटपुंजी शैक्षणिक साधने याचा मेळ न बसल्याने शैक्षणिक क्षेत्रात योजनांची प्रत्यक्ष कार्यवाही करणाऱ्यांपुढे अनेक घनगंभीर समस्या उभ्या आहेत. वरिष्ठ महाविद्यालयाला कनिष्ठ महाविद्यालय जोडले गेल्याने गर्दीचा एक प्रचंड प्रश्न निर्माण झाला आहे. अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत मनाच्या एकाग्रतेला असाधारण महत्त्व असते. गर्दीच्या लाटेत एकाग्रतेचा लय झाला आहे. उरली आहे ती केवळ यांत्रिक प्रक्रिया. परंतु शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न करणारे विद्यार्थी हे समाजातील महत्त्वाचे घटक असल्याने त्यांना महाविद्यालयात प्रवेश देणे हे एक अनिवार्य सामाजिक कर्तव्य ठरते. त्यामुळे गर्दीतून मार्ग काढणे क्रमप्राप्त आहे.

## सत्र–पद्धतीतील अडचणी

पुणे विद्यापीठाने सत्र–पद्धतीचा अवलंब केल्याने समस्या अधिक आणि अधिक गुंतागुंतीच्या झाल्या आहेत. अंतर्गत मूल्यमापनाची जबाबदारी काटेकोरपणे कशी पार पाडता येईल या संबंधी प्राध्यापकांत वैचारिक आदान–प्रदान सुरू आहे. विद्यापीठाने प्रथमवर्ष परीक्षांची जबाबदारी महाविद्यालयाकडे सोपवली आहे. शास्त्र, कला आणि वाणिज्य विभागांतील प्राध्यापकांनी विचारपूर्वक प्रश्नपेढी तयार केल्या. महाविद्यालयाने त्या छापून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांचा उपयोग केवळ आमच्याच विद्यार्थ्यांना झाला आहे असे नाही. अनेक महाविद्यालयांकडून त्यांना मागणी आल्यामुळे त्या त्या महाविद्यालयांना त्यांचा पुरवठा केला गेला. प्रत्येक प्रश्नपेढी व्यापक आहे. त्यात नियमित बदल केला जाण्याची कल्पना आहे. प्रश्नपेढी परिणामकारी ठरण्यासाठी ती प्रवाही असली पाहिजे, याकडे आम्ही लक्ष देणार आहोत. सत्र–पद्धती सुरू झाल्यापासून वर्गातील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती वाढल्याचे आमच्या लक्षात आले आहे. त्याला नियंत्रण घालण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहेत. त्यात आम्हाला काही प्रमाणात यश आले आहे. सत्रपद्धतीमुळे चाचणी, पुन्हा चाचणी, पुन्हा–पुन्हा चाचणी असे चक्र तयार झाले आहे. अध्ययन–अध्यापनाखेरीज इतर शैक्षणिक उपक्रमांवर त्याचा अनिष्ट परिणाम झाला आहे. जागा आणि वेळ यांची त्रुटी आहे. तथापि आमच्या महाविद्यालयाने आवश्यक ते विधायक उपक्रम केले आहेत. विविध खेळांतील प्राविण्य, कलागुणांचा विकास, शैक्षणिक सहली, वादस्पर्धांतील सहभाग इत्यादींची कल्पना विभागीय अहवालांवरून येऊ शकते.

## व्यावहारिक ज्ञानाला महत्त्व

उदारमतवादाच्या छायेतील आधुनिक शैक्षणिक तत्त्वज्ञानानुसार अध्ययनाला विशेष महत्त्व दिले जाते. शैक्षणिक प्रक्रियेतील विद्यार्थ्यांचा सहभाग निर्माण करणे, वाढणे, वाढवणे आणि परिणामकारी करणे हा विचारवंतांच्या चिंतनाचा विषय आहे. यासाठी विद्यार्थ्यांच्या चर्चासत्रांना विशेष महत्त्व आहे. आमच्या महाविद्यालयात विविध विषयांतर्गत चर्चासत्रे आयोजित केली गेली. नियोजित विषयांवर विद्यार्थ्यांचे निबंध–वाचन झाले. विद्यार्थ्यांना पुस्तकी स्वरूपातील तात्त्विक माहिती दिल्याने अध्ययन–अध्यापनात पूर्णता येत नाही. व्यावहारिक जीवन संघर्षमय असल्याने विद्यार्थ्यांना तात्त्विक ज्ञानाबरोबर व्यावहारिक ज्ञान प्राप्त होणे अत्यावश्यक असते. मुख्यतः वाणिज्य विभागातील व साधारणतः इतर विद्याशाखांतील विद्यार्थी व्यावहारिक ज्ञान प्राप्त करण्याच्या बाबतीत प्रयत्नशील केले जातात. वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी कारखान्यांना आणि व्यापारी संस्थांना भेटी देऊन तेथील माहिती गोळा केली आहे. त्याचे विश्लेषण करून प्रतिवृत्त तयार केले आहे.

## ग्रंथालय नव्या वास्तूत

'ग्रंथ हेच गुरु' हे सुभाषित यथार्थ असले तरी ते परिणामकारी ठरण्यासाठी ग्रंथ विद्यार्थ्यांच्या पर्यंत पोचले पाहिजेत. त्यासाठी स्वतंत्र आणि सुसज्ज ग्रंथालय आवश्यक असते. ग्रंथालयातील देवघेव विभाग कार्यक्षम असावा लागतो. विद्यार्थि–विद्यार्थिनी व प्राध्यापक यांच्यासाठी स्वतंत्र अभ्यासिका आवश्यक असते. यंदा आमच्या नव्या वास्तूत ग्रंथालय संपन्न झाले आहे. नव्या अभ्यासिका उपलब्ध झाल्या आहेत. परंतु आमची समस्या पूर्णत: सुटली नाही. ग्रंथसंपत्ती वाढत आहे. वाचकांची संख्या वाढत आहे. नवीन सुविधा अपूर्ण ठरल्या आहेत.

## सामाजिक उत्तरदायित्व

महाविद्यालय आणि समाज यांच्यातील संबंध अतूट असतो. महाविद्यालयामुळे सुसंस्कारित विद्यार्थ्यांचे योगदान समाजाला लाभावे ही महाविद्यालयाबद्दलची अपेक्षा स्वाभाविक आहे. शैक्षणिक गुणवत्ता, जीवनमूल्यविषयक आदर आणि सामाजिक ऋणाची जाण वाढवून विद्यार्थि–वर्ग समाजाकडे गेला तर तो सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अधिक गतिमान करू शकतो. अध्ययन कालातच विद्यार्थ्यांची जीवनबैठक तयार झाली पाहिजे.

विद्यार्थ्यातील विधायक प्रवृत्ती चेतविली व त्यांच्यातील सुप्त शक्ती जागृत केली तर समाजासमोरील अनेक समस्या सहजपणे सुटतील. आमच्या महाविद्यालयातील एका गरीब विद्यार्थिनीच्या पालकांनी वैद्यकीय मदतीसाठी केलेल्या आवाहनाला विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद आला. यावरून असे स्पष्ट होते की, सामाजिक ऋणाची जाण विद्यार्थ्यांत असते, ती विकसित करण्याची जरूरी असते. यावर्षी महाविद्यालयाने कान–नाक–घसा तपासणी शिबिर आयोजित केले. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीने अनेक नागरिकांची वैद्यकीय तपासणी झाली. अनेकांना त्याचा फायदा झाला. अशा प्रकारचे अनेक उपक्रम हाती घेता येतील. प्रतिवर्षी आम्ही नवनिर्मितीच्या प्रयत्नात आहोत. गतिमानता हा आमचा स्थायी भाव आहे. "धावन्प्राप्नोति सामर्थ्यं मार्गंच लभते नर:" हे आमचे ब्रीदवाक्य आहे.

## नवगतांचे स्वागत

१९८१–८२ या शैक्षणिक वर्षामध्ये खालील प्राध्यापकांच्या नवीन नेमणुका झाल्या.

१) वरिष्ठ महाविद्यालय

१) सौ. पारखी मीना अरुण (संख्याशास्त्र)
२) डॉ. सौ. सुषमा जयंत थत्ते (प्राणीशास्त्र)
३) प्रा. मुळाबागल प्रकाश मोहन (गणित)
४) प्रा. पुजार मोहन गणेशभट्ट (रसायनशास्त्र)

२) कनिष्ठ महाविद्यालय

१) सौ. बुटाला चारुलता विजय (प्राणिशास्त्र)
२) सौ. सिधये मेधा वासुदेव (मराठी)
३) सौ. एकबोटे वसुधा सुनिल (भूगोल)
४) प्रा. भारती हरि भिवबुवा (भूगोल)
५) कु. कांबळे स्मिता बळवन्त (प्राणिशास्त्र)

६) सौ. पटवर्धन सरोज अशोक (जर्मन)
७) सौ. जोगळेकर आशा श्रीपाद (मानसशास्त्र)
८) श्री. शेरीकर विनयकुमार मुरलीधर (शारीरिक शिक्षण)
९) कु. जोशी सुमन रघुनाथ (राज्यशास्त्र)
१०) प्रा. संगोराम आनंद श्रीरंग (अकौंटन्सी)

३) शिक्षकेतर

१) श्री. ए. एन. पारा
२) श्री, एस. एम. जाधव

**शुभेच्छा**

महाविद्यालयात खालील प्राध्यापकांना / सेवकांना अन्यत्र संधी मिळाल्याने ते यंदाचे वर्षी (१९८१–८२) सेवामुक्त झाले आहेत. त्यांना त्या त्या क्षेत्रात यश लाभो ही शुभेच्छा.


१) डॉ. सौ. वन्दना तळेकर (राज्यशास्त्र)
२) कु. ए. एस. मुळे (भूगोल)
३) श्री. एम. एन. कांबळे (भूगोल)
४) डॉ. आर. जी देशपांडे (रसायनशास्त्र)
५) श्री. एस. एन. मोने (अकौंटन्ट)

**ऋणनिर्देश**

या अंकाच्या निर्मितीच्या कामी प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी यांची अनमोल मदत झाली. मुद्रकांनी आस्थेने व वेळेवर काम पुरे केल्याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोत.

**–संपादक**

## * क्रीडा-संघटना *



बसलेले (डावीकडून): श्री. देशमुख (विद्यार्थि-प्रतिनिधी), प्रा. सौ. कुलकर्णी, प्रा. छाब्रा, प्रा. लागू, प्रा. गोसावी, उपप्राचार्य रायकर, प्राचार्य गंभीर, उपप्राचार्य चिरपुटकर, प्रा. म. आ. कुलकर्णी, प्रा. बनसुडे, प्रा. पाथरे, प्रा. लाळे, प्रा. सौ. नवाथे, कु. देशपांडे (विद्यार्थिनी-प्रतिनिधी)

उभे (डावीकडून): श्री. रघतवान, श्री. जोशी, श्री. कुंजीर, श्री. सातव, कु. गांधी, श्री. बाळ, श्री. पिसाळ, श्री. भोसले श्री. पवार, श्री. जाडू.

## * कलामंडळ *




बसलेले (डावीकडून) : प्रा. आर. व्ही. कुलकर्णी, प्रा. जोर्वेकर, प्रा. पुंडे, प्रा. देशपांडे, उपप्राचार्य रायकर, प्राचार्य गंभीर, उपप्राचार्य चिरपुटकर, प्रा. धायगुडे, प्रा. सुमंत, प्रा. गंधे, प्रा. सौ. सातभाई, श्री. प्यारेलाल चौधरी (विद्यापीठ प्रतिनिधी)

उभे (डावीकडून पहिली रांग): कु. कुकडोलकर, श्री. बहिरट, श्री. शेवते, श्री. पवार, श्री. बालगुडे, श्री. पाटील, श्री. फौजदार, श्री. किराड, श्री. महाजन, श्री. वंजारी, कु. घाटे.

(दुसरी रांग) सर्वश्री: शितोळे, ठाकूर, काळभोर, उबाळे, थोरात आणि बोरावके.

## * राष्ट्रीय सेवा–योजना *



बसलेले (डावीकडून) : कु. इनामदार, प्रा. गोखले, प्रा. म. आ. कुलकर्णी, उपप्राचार्य, रायकर, प्रा. वाणी, प्रा. गोसावी, श्री. चिंचकर, श्री. तापडे.

* * *

## * संघनायक *




बसलेले (डावीकडून) : कु. म्हसकर, श्री. पिसाळ, प्रा. शेरीकर, प्रा. लागू (संचालक), उपप्राचार्य चिरपुटकर, प्रा. छात्रा, श्री. बोडस, श्री. बडवे, श्री. सावे, कु. वैद्य.

उभे (डावीकडून) : कु. जाडू, श्री. संत, श्री. मुथ्था, श्री. देसवंडीकर, श्री. निकम, श्री. पाटील, श्री. जावळे, श्री. डांगे, श्री. व्यवहारे, कु. घोणसे, मागे उभे–श्री. कदम (सेवक)

## * कलामंडळ *





पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे
नटवर्य मामा पेंडसे यांचा सत्कार




कलामंडळाचे उद्घाटन :
श्री. शरद तळवलकर

## * राष्ट्रीय सेवा योजना *




राष्ट्रीय सेवा योजनेने भरविलेले
नाक, कान व घसा तपासणी शिबिर
डॉ. टेपण तपासणी करताना

## भारतीय कृषि अनुसंधान परिषद (I.C.A.R.), नवी दिल्ली



आय्. सी. ए. आर. यांच्या अनुदानाने
प्राणिशास्त्र विभागात
चालू असलेल्या संशोधन-प्रकल्पास भेट—
डॉ. श्रीवास्तव, प्रो. मेहरोत्रा, प्रो. कपिल
आणि डॉ. श्रीहरन् यांच्या समवेत प्राचार्य गंभीर




**युवक महोत्सव कथ्थक नृत्य !**

युवक महोत्सवात कथ्थक नृत्यात
कुलगुरूंच्या हस्ते रौप्यपदक स्वीकारताना
नरेंद्र नायडू (तृतीय वर्ष शास्त्र)

**वाणिज्य पदव्युत्तर विद्यार्थी संघटना**

चर्चासत्रात बोलताना—श्री. मोहन धारिया






बसलेले (डावीकडून) :
श्री. छाब्रा ( क्रीडा संघटक ),
प्रा. बनसुडे (उपकार्याध्यक्ष), कु. गोडबोले
उभे (डावीकडून) :
श्री. येरवडेकर, श्री. नवाथे, श्री. अुभ

आंतर विभागीय (पुणे विभाग) व्हॉलीबॉल विजेता संघ



बसलेले (डावीकडून) :
श्री. छाब्रा ( क्रीडा संघटक ),
प्रा. बनसुडे (उपकार्याध्यक्ष), कु. दीक्षित
उभे (डावीकडून) :
कु. दाते, कु. घोरपडे, कु. पवार, कु. लोहो



आंतर शालेय (पुणे विभाग)
बॅडमिंटन उपविजेता संघ

बसलेले (डावीकडून)
श्री. छाब्रा (क्रीडा शिक्षक), प्रा. बनसुडे (उपकार्याध्यक्ष), श्री. नवाथे
उभे (डावीकडून)
श्री. लिमये, श्री. शेटचे, श्री. बापट.



*** मैदानी स्पर्धा, विजेता संघ**

पुढची ओळ :
कु. जयश्री साने, कु. मिथिला जबडे
कु. सुनीता देशपांडे, कु. मेधा अवधानी
कु. संगीता ताटके

मागची ओळ :
यशोधन बाळ, कु. निशा अंबिके,
कु. वसुधा तुमपल्लीवार, कु. वनिता महाजन
श्री. लागू ( मार्गदर्शक )

**वॉटरपोलो उपविजेता संघ**

पुढची ओळ : आनंद पाध्ये, अतुल टांकसाळे
मार्नासिंग पाटोळे, भालचंद्र फाटक
सोपान रघतवान, विजय ओसवाल
मागची ओळ
यशोधन बाळ, संघनायक प्रवीण फुले
श्री. लागू ( मार्गदर्शक)
मिलिंद जोशी, विवेक आचवल







*** बॉल बॅडमिंटन विजेतेपद**

पुढची ओळ :
कु. विजया जोशी, कु. सुनन्दा इंगळे,
कु. अंजली बिद्रे, कु. अरुणा पांडे,
कु. शुभदा थिटे
मागची ओळ :
नरेंद्र मेहेर, कु. रेखा कुलकर्णी ( संघनायिका )
कु. हेलन सूर्यवंशी, शेरीकर (क्रीडा-शिक्षक)


## * विशेष नैपुण्य *



राजकुमार आगरवाल
१२ वी शास्त्र, सर्वप्रथम




मकरंद घारे
१२ वी वाणिज्य, सर्वप्रथम



श्रीकांत पिंपळकर
१२ वी कला, सर्वप्रथम



कु. चंदा निमकर
संख्याशास्त्र, सर्वप्रथम



अतुल देशपांडे
टी. वाय्. बी. ए. सर्वप्रथम



कु. पूर्णिमा ललवाणी
टी.वाय्. बी. एस्सी. सर्व प्रथम



कु. विद्या गोडखिंडी
टी. वाय्. बी.कॉम., सर्व प्रथम



कु. सीमा पारखी
एम्. कॉम. सर्वप्रथम



कु. भारती बनबेरू
शिवछत्रपती पारितोषिक



कु. निता अंबिके
राणी लक्ष्मी पारितोषिक




कु. मिथीला जबडे
क्रीडा प्रतिनिधी


## * क्रीडामंडळ व कलामंडळ प्रतिनिधी *



श्री. पवार डी. डी.
इंडियन गेम्स



श्री. चौधरी पी. एस.
यू. आर्. आणि जी. एस्.




श्री. हरीश देशमुख
आय्. सी. एस्. आर्.




शैलेश जोशी
'ज्यूडो', सुवर्णपदक




श्री. यशोधन बाळ
ॲथलेटिक्स



श्री. पिसाळ रवीन्द्र
हॉकी




रघतवान एस्. एस्.
रेसलिंग




दिगंबर जोशी
मायनर गेम्स




दंडवते ए. डी.
क्रिकेट



भोसले ए. एस्.
फुटबॉल




मेहेर नरेन्द्र
मायनार गेम्स




मुकुंद महाजन
कला मंडळ

## * क्रीडामंडळ व कलामंडळ प्रतिनिधी *




संजीव किराड
ग्रंथालय



अभय काळभोर
वादविवाद मंडळ




अशोक वंजारी
नियतकालिक



सुनिल पवार
मॅग


## * छात्रसेना प्राविण्य *



कुलकर्णी ए. आय.



रघतवान एस. एस.



एम. एच. बी. शेख



जगताप ए. एस.



कु. मीना राठोड

## खोखोपटू निशिगंधा अंबिके



महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या पत्नी श्रीमती बिल्कीस लतीफ
यांच्या हस्ते श्रीशिवछत्रपती पुरस्कार स्वीकारताना कु. निशिगंधा अंबिके

*



नरेंद्र नायडू
कथ्थक नृत्य



शंकर साळुंके
'मॉडर्न श्री'

महाविद्यालयाच्या शास्त्रसंघटनेने आयोजित केलेल्या
' विज्ञान कथास्पर्धे 'त प्रथम पारितोषिक विजेती कथा

# दृष्टिआड सृष्टी

सविता कुलकर्णी, तृतीय वर्ष शास्त्र

' कंट्रोल रूम ' मधील विलक्षण वातावरण पाहाताच अविनाश साठेचा चेहरा आणखीच गंभीर झाला. कामाची शिफ्ट संपवून जाणाऱ्या पथकाच्या मुख्याकडे त्याने एक प्रश्नार्थक नजर टाकली. त्या प्रमुखाने टी. व्ही. स्क्रीनकडे बोट दाखविले आणि थोडा खुलासा केला. " न्यूयॉर्क व मॉस्को येथील आपली प्रमुख विद्युत-केंद्रे दोन मिनिटे सहेचाळीस सेकंदांपूर्वी बंद पडली आहेत. कारण मात्र अजून समजत नाही. "

"एखादया परकीय यानाची करामत ? " अविनाशने विचारले.

" कॉम्प्युटरने अद्याप तरी पूर्णत: मौन पाळले आहे. त्यामुळे आम्ही गोंधळून गेलो आहोत. दोन्ही विदयुत-केंद्रांची कसून तपासणी जारी आहे. कदाचित या दोन मिनिटांत कॉम्प्युटर आपल्याला आवश्यक माहिती देईलच. तुम्ही वाटल्यास सुपर कॉम्प्युटरची मदतही घ्या " पथकप्रमुखाने जाता जाता सांगितले.

अविनाश साठे विचारात गुंतला.

परकीय यान ? कुठून आले असेल ? आपल्या सूर्यमालेत तरी एवढी प्रगत जीवसृष्टी नाही. मग हा नक्की प्रकार काय आहे ? समजा अवकाशयान या करामती-मागे असेल तर त्याच्या आस्तित्वाची चाहूल आपल्या यंत्रांनी का नाही टिपली ? आणि अवकाशयान नसेल तर दुसरे काय ?

इतक्यात जवळचा फोन वाजला. त्याने रिसीव्हर कानाला लावला आणि तो दचकलाच ! कारण पेकिंगचे तिसरे महत्त्वाचे विदयुतकेंद्र बंद पडल्याची खात्री-लायक बातमी त्याला मिळत होती. अशाच वेगाने विद्युतकेंद्रे बंद पडत राहिली, तर साऱ्या मानवजातीचा शेवट काय होईल, हे त्याला माहीत होते. त्याने तातडीने सुपरकॉम्प्युटरशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण सुपरकॉम्प्युटरकडून त्याला काहीच प्रतिसाद मिळाला नाही.

आणि तो विशिष्ट विचार मनात डोकवताच अविनाश अस्वस्थ झाला.

वसाहतीतील व्यवस्थापक-समितीची बैठक भरली होती. वातावरणातील तणाव सर्वांनाच जाणवेल एवढया उघडपणे व्यक्त होत होता. अध्यक्ष भाषण करीत होते. " नुकत्याच मिळालेल्या माहितीवरून अक्षय साठे, क्रमांक E 623 आणि कीथ बोथम, क्रमांक X 092 यांच्याशी ' त्यांनी ' संपर्क साधला आहे. त्यांच्या संवादाची नोंद करण्यात आली आहे, पण त्यामधून काही विशेष माहिती मिळू शकली नाही. हे लोक पाचव्या सूर्यमालेतील असावेत असे कॉम्प्युटरला वाटते. येस, B 613, तुला काय वाटते ?"

B 163 वसाहतीचा संरक्षण-प्रमुख होता. अवकाशातील या वसाहतीच्या संरक्षणाची जबाबदारी त्याच्यावर होती. साहजिकच त्याचे मत ऐकण्यास सर्वजण उत्सुक होते. त्याने मिळालेल्या माहितीवर एक नजर टाकली आणि बोलायला सुरुवात केली. "सर, या लोकांच्या आस्तित्वाचा नेमका शोध लागल्याशिवाय आपण काहीसुद्धा करू शकत नाही. आपल्या सूर्यमालेत कोणत्याही नव्या वस्तूचा प्रवेश झालेला नाही. आणि आपल्या यंत्रांच्या लक्षात न येता पृथ्वीपर्यंत काहीच जाऊ शकणार नाही. ते जे कोणी प्राणी आहेत त्यांचा शोध आपल्या E 623 व X 092 यांच्या मदतीनेच लागेल. त्या दोघांच्या प्रत्येक विचाराची नोंद घेणे

एवढेच आपण सध्या करू शकतो."

"B 163 चे म्हणणे मला पटते; पण E 623 व X 092 यांना या देखरेखीची जाणीव होणार नाही, ही काळजी आपल्याला घ्यावी लागेल" C 703 उद्गारला!

I 269 तातडीने उठत म्हणाला, "येथे एक महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो. आपण संरक्षण करणार आहोत की प्रतिहल्लाही करणार आहोत, हे आत्ताच ठरवायला हवे. आपली तीन महत्त्वाची विद्युतकेंद्रे बंद पडण्यामागे नेमक्या याच लोकांचा हात आहे. शिवाय..."

इतक्यात अध्यक्षांच्या जवळचा फोन वाजला. त्यांनी रिसीव्हर कानाला लावला. त्यांचा चेहरा आणखीच गंभीर झाला आणि त्यांनी घोषणा केली, "मित्रहो! आपली तीनही प्रमुख विद्युतकेंद्रे आपल्या शत्रूंनीच E 623 व X 092 यांच्यामार्फत बंद पाडली असल्याचे निदर्शनास आले आहे. सर्व विद्युतकेंद्रे पूर्ववत सुरू करण्यात आली असून या प्रकरणाची चौकशी व कारवाई योग्य अधिकारी करणार आहेत. तोपर्यंत आपण या विषयावर चर्चा करू शकत नाही."

भावी संकटाच्या कल्पनेने तेथील प्रत्येक शास्त्रज्ञ विचारमग्न झाला होता.

अवकाश वसाहतीतील सर्व शास्त्रज्ञांचे आणि यंत्रांचेही आपण 'लक्ष्य' असू याची कल्पना अक्षय साठे किंवा कीथ बोथम दोघांनाही नव्हती. परग्रहावरच्या 'त्या' लोकांना मात्र या गोष्टीची जाणीव झाली असावी. रोज एका विशिष्ट वेळी त्यांचा अक्षय साठे किंवा कीथ बोथम यांच्याशी होणारा संवाद आज मात्र झाला नव्हता. अर्थात लहान मुलांच्या चंचल प्रवृत्तीला अनुसरून अक्षयने अथवा कीथनेही या गोष्टीला फारसे महत्त्व दिलेच नाही. वसाहतीतील सर्व शास्त्रज्ञ मात्र आणखी सावध झाले.

खरे तर ज्या घटना घडल्या त्या प्रथमदर्शनी वाटल्या तेवढ्या सरळ नाहीत, याची जाणीव प्रथम अविनाश साठेलाच झाली. अक्षय आणि कीथ बोथम विद्युतकेंद्राच्या नियंत्रक कक्षात प्रवेश कसे मिळवू शकले? समजा त्यांनी आपले व बोथम यांचे प्रवेशपत्र वापरले असले तरी निरीक्षक यंत्रांनी संशयात्मक परिस्थितीची नोंद कशी नाही केली? त्यांचे फोटो घेऊन ते पडताळून पाहण्याचे यंत्रांनी का नाकारले? एकाही यंत्राने धोक्याची सूचना कशी नाही दिली? आणि पेकिंगचे विद्युतकेंद्र तर आपण कामावर हजर असताना बंद पडले! श्री. बोथमही त्यावेळी विभाग T 8369 मध्ये हजर असल्याची नोंद आहे. म्हणजे पेकिंगचे विद्युतकेंद्र अक्षय किंवा कीथ या दोघांच्या मदतीशिवाय बंद पाडण्यात आले! 'त्यांनी' कोणाही तिसऱ्या व्यक्तीशी संपर्क साधल्याची बातमी नाही!' याचा अर्थ एकच की सुपरकॉम्प्युटरने 'त्यांना' या कामात मदत केली!

आणि त्याच्या लक्षात आले की, गेले काही तास सुपरकॉम्प्युटर आपल्या आज्ञा नाकारत आहे. खरे तर पंधरा दिवसांपूर्वीच आपण सावध बनायला हवे होते. कारण भारत व इंग्लंड यांच्यातील पाचव्या कसोटी सामन्यात भारताच्या एन्. कपिलने वडला एक षट्कार मारला असताना कॉम्प्युटरने मात्र एन्. कपिल बाद असल्याचे घोषित केले होते! गेल्या कित्येक वर्षांतील कॉम्प्युटरची ही एकमेव चूक! आणि सर्वांनीच तिकडे दुर्लक्ष केले होते!

जगायचे असेल तर तातडीने हालचाल केली पाहिजे याची त्याला जाणीव झाली. पण तो अगतिक झाला होता!

अवकाश वसाहतीतील सर्वच शास्त्रज्ञ आता हैराण झाले होते. कारण समोरच्या टी. व्ही. स्क्रीनवर हजारो आकृत्या वसाहतीत उतरताना दिसत होत्या. त्या आकृत्यांचा नेमका आकार कोणालाच सांगता आला नसता. पण धूसर करड्या रंगाचे एक वलय मात्र त्यांच्याभोवती दिसत होते. वसाहतीतील सर्व क्षेपणास्त्रे त्या धूसर करड्या वलयापुढे निष्प्रभ ठरली होती. त्या सर्व आकृत्यांच्या हालचाली मात्र योजनाबद्ध होत्या. हळूहळू सर्व महत्त्वाच्या प्रयोगशाळा ते ताब्यात घेत होते.

शेवटचा उपाय म्हणून B 163 ने अक्षयच्या खोलीवर आपले लक्ष केंद्रित केले. सर्वत्र भयाण शांतता पसरली होती. आणि—

नेमके काय घडले, ते अक्षयला प्रथम कळलेच नाही. कोठल्यातरी दुसऱ्या ग्रहावरचा आपला 'मित्र' आपल्याला भेटायला येणार याचाच त्याला आनंद झाला होता. आपल्या या मित्राला— ('ॲपल' असे त्याने त्याचे नाव सांगितले होते) भेटायला तो अतिशय उत्सुक होता.

दार अथवा खिडकी कशाचाच वापर न करता काहीतरी धूसर करडे अक्षयसमोर उभे होते. तो प्रथम

घाबरला. पण, ' मी ' ॲपल ' आहे' असे त्या आकृतीने सांगताच अक्षय त्याच्याकडे आनंदाने धावला होता. अक्षयचा आणि ' ॲपल 'चा मजेत संवाद चालू असतानाच अचानक अक्षयच्या लाडक्या टॉमीने खोलीत उडी घेतली होती. त्याने उडी घेताच टेबलावरचा पाणी भरून ठेवलेला ग्लास खाली पडला आणि पाण्याचे तुषार ' ॲपल 'वर पडले आणि अवकाश वसाहतीतील कृत्रिम वातावरणात धुके विरून जावे तसा तो वितळून गेला. अक्षय मात्र विमनस्कपणे उभाच होता !

शेवटचा उपाय म्हणून B 163 ने अक्षयच्या खोलीवर आपले लक्ष केंद्रित केले होते. सर्वत्र भयाण शांतता पसरली होती. आणि अचानक तो हर्षभराने ओरडला. सर्वांनीच चमकून त्याच्याकडे पाहिले. पण कोणालाच स्पष्टीकरण देण्याच्या भानगडीत तो पडला नाही! झटपट जाऊन त्याने सर्व कृत्रिम कारंजी, पाऊस पाडणारी यंत्रे चालू करण्याची आज्ञा दिली. वसाहतीतील वातावरण पूर्वस्थितीवर येण्यास मग दोन मिनिटांपेक्षा कमी वेळ लागला. सर्व उपाय संपल्यानंतर साध्या H20 नेच अखेर त्यांना वाचविले होते. कळत-नकळत सर्वांनीच अक्षयच्या ' टॉमीला ' धन्यवाद दिले !

अविनाशची काळजी मिटली होती ! कारण ॲपल आणि त्याच्या हजारो मित्रांचे आस्तित्व नष्ट झाल्यानंतर सुपर कॉम्प्युटर अर्थातच त्यांच्या तावडीतून मुक्त झाला होता.

काही दिवसांनंतर ' अवकाश वसाहतीत धूसर करड्या ढगांचे मनोहर दर्शन ' अशी बातमी पृथ्वीवर प्रसिद्ध झाली ! त्यावर अनेक चर्चा, परिसंवाद झाले. पण खरी बातमी पृथ्वीवर सामान्य लोकांपर्यंत न पोचविण्याची खबरदारी सर्व उच्च अधिकाऱ्यांनी अर्थातच घेतली.

अविनाश काही महिन्यांच्या रजेवर भारतात परत आलाय. जेव्हा जेव्हा सामान्य लोक ' त्या ' ढगांच्या दर्शनाबद्दल हेवा करतात, तेव्हा त्याला वाटते, ' दृष्टिआड सृष्टी ' हेच खरे !

卐

---

# मैत्री

मैत्री असावी फुलांशी,
त्यांना रंग असावा परोपरीचा
सुगंध त्यातून आला तरी त्यांना काटे नसावे ।
मैत्री असावी झाडांशी, त्यावर फळ असावे,
फांदी मजबूत असली तरी झाड उंच नसावे ।
मैत्री असावी नदीशी, पाणी चंचल असावे,
त्यात उडी मारली तरी ते खोल नसावे ।
मैत्री असावी पाखरांशी, ते खांद्यावर बसावे,
परत कधी उडू नये म्हणून त्यांना पंख नसावे ।
मैत्री असावी मित्रांशी, नेहमी हसत रहावे,
थोडी चूक झाली म्हणून काय जन्मभर रुसावे ?

व्ही. व्ही. पवार, प्रथम वर्ष शास्त्र

# ' माझ्यासाठी '

' मी ' ' माझे ', ' माझ्यासाठी ', सगळे काही.
रेटारेटी, धासाघाशी अन् खेचाखेची.
ते झुंजणे माझ्यासाठी,
ते हसणे माझ्यासाठी,
आणि ते खेचून रडणेसुद्धा केवळ माझ्यासाठीच!
तू वेडा, मी वेडा आपण सारे वेडे ' माझ्यासाठी '
मूर्ख, शहाणे, अतिशहाणे माझ्यासाठी
धडपड, बडबड, जगण्यासाठी मरणे. . . उरले,
. . . सारे आता ' माझ्याचसाठी '

सुजाता गानू, प्रथम वर्ष वाणिज्य

**विज्ञान-कथा स्पर्धेतील द्वितीय पारितोषिकाची कथा**

# अजुनि चंद्रमा नभात

—प्रमोद देशपांडे (द्वितीय वर्ष शास्त्र)

राजूची टी. व्हीवरची शाळा चालू झाली. शाळेत जाऊन शिकण्याचे दिवस केव्हाच मागे पडले होते. आता टी. व्ही कडून शिक्षण घेण्याचाच जमाना होता.

राजूने टी. व्ही. सुरू केला. बाजूलाच त्याचे आजोबा आपला नेहमीचा चाळीस ग्रॅम अळींब्यांचा (mushrooms) ब्रेकफास्ट घेत वाचत होते.

'गुड मॉर्निंग आजोबा'. छे ! आजोबा आपल्या वाचनातच दंग. 'जाऊ दे'... राजू अभ्यासाला लागला.

तेवढ्यात फोनो–व्हीजन खणखणू लागला. आता मात्र आजोबांचं लक्ष गेलं. त्यांनी उठून बटण दाबलं. उजळलेल्या स्क्रीनवर ए. एस्. आर्. प्रमुख विनस्टन दिसू लागले.

'गुडमॉर्निंग, डॉक्टर प्रभुणे !'

'गुडमॉर्निंग, काय म्हणतोयस बाबा ? सकाळीच आठवण काढलीस ते !'

'डॉक्टर, तुम्हाला एक त्रास द्यायचाय. तुमची झोप उडवून टाकणारी कामगिरी तुमच्यावर सोपवायची आहे.'

'अरे वा ! सांग ना मग.'

'डॉक्टर, थोड्याच वेळात तुमच्या ए. एस्. आर्.च्या ब्रांच मधील कॉम्प्युटरच्या आऊटपुट सिस्टीम मधून तुम्हाला एक डाटा मिळेल. तो एम्-२७ ने पाठवलेला आहे. तो वाचून त्यावर उपाय शोधायला लागा. डाटा नक्कीच धक्कादायक आहे. पण तरीही तुम्ही उपाय शोधाल अशी आशा वाटते. मी ब्राऊनिंग आणि प्रा. लावास्कीना सांगतो आहेच. ठीक आहे डॉक्टर, विश यू बेस्ट ऑफ लक !' स्क्रीन मोकळा झाला.

डॉ. प्रभुणे हे ए. एस्. आर् म्हणजे ॲकॅडमी ऑफ स्पेस रीसर्चचे निवृत्त प्रमुख होते. नाहीतरी निवृत्तीला कंटाळलेल्या डॉक्टरांना या बातमीने काहीतरी करायला मिळणार या गोष्टीचा आनंदच झाला.

'पण चंद्राबद्दल एवढं गोपनीय आणि धक्कादायक काय असू शकेल ?' डॉक्टर विचार करू लागले. कारण पृथ्वीला मिळणारी चंद्राबद्दलची सर्व माहिती M. 27 ही स्पेस कॉलनीच देत असते. त्यामुळे तिच्या कडून आलेली माहिती ही नक्कीच चंद्राबद्दल असणार.

डॉक्टर विचार करतच ए. एस् आर्. च्या ब्रँचकडे निघाले. ए. एस्. आर्.च्या शाखा जगभर आहेत. न्यूयार्क मधील मुख्यालयात असलेल्या मुख्य कॉम्प्युटरचे इनपूट सिस्टीम, ब्रेन, मेमरी हे सर्व मुख्यालयातच आहेत आणि त्याच्या आऊटपुट सिस्टीमस् मात्र जगभरच्या सर्व शाखांतून आहेत. असच आताही विनस्टनांनी न्यूयॉर्कला इनपुट सिस्टीम मधे टाकलेला डाटा डॉक्टरांना भारतात, ब्राऊनिंगना युरोपात व लावास्कींना रशियात मिळतो.

डॉक्टर अधिरतेने डाटा वाचू लागले—

'चंद्र आपली २७$\frac{१}{३}$ दिवसाची प्रदक्षिणा पूर्ण करताना ०·३४ एवढा पृथ्वीच्या दिशेनं ढळतो आहे. आजची ...'

'आपण काय वाचलं ? छे ! छे ! असं होता कामा नये. हे भयंकर आहे.' डॉक्टर अविश्वासाने माहितीकडे पाहू लागले, कारण पुढचे नवे चित्र डॉक्टरांच्या डोळ्या पुढे सरकू लागले.

चंद्र आत्ता जरी एवढ्या सावकाश ढळत असला तरी हळूहळू त्याची गती वाढणार. एकदा तो पृथ्वीच्या

गुरुत्वाकर्षणात सापडल्यावर प्रचंड वेगाने पृथ्वीकडे ओढला जाणार आणि एखाद्या उल्केप्रमाणे पृथ्वीवर आदळणार !

'तीन हजार चारशे छपन्न' किलोमीटर व्यासाचा गोळा प्रचंड वेगाने पृथ्वीवर आदळणार !

ज्या चंद्रावरच्या वसाहतीच मानवाचं स्वप्न साकार होणार होतं तोच चंद्र पृथ्वीवर आदळणार !

आणि पृथ्वी ? तिचं काय होणार ?

'छे...विचार करण्यात अर्थच नाही.'

डॉ. तातडीने आपल्या प्रयोगशाळेत आले. 'चंद्राचे पृथ्वीपासूनचे अंतर ३८,४०० किलोमीटर, चंद्र २७⅓ दिवसात ०·३४ ने ढळतो आहे. पृथ्वीची गुरुत्वा....'

डॉक्टरांनी गणित मांडले.

उत्तर आले दहा वर्षे !

चला ! वेळ तर बराच मिळाला !

डॉक्टरांनी थोडा वेळ विचार केला आणि मग डॉक्टर व कॉम्प्युटर आपआपले मेंदू पणाला लाऊन काम करत राहीले. तिकडे ब्राऊनिंग व लावास्की यांचे प्रयत्न चालूच होतेच. तिघेही एकमेकांशी संपर्क साधून होतेच.

तीन एक दिवसांनी निरनिराळे उपाय सापडले. 'पृथ्वीवरून एक प्रचंड अणुअस्त्र सोडून चंद्राचे तुकडे तुकडे करावेत अथवा त्याची कक्षाच बदलावी. पण असले प्रचंड अणूअस्त्र सोडताना पृथ्वीला एक असह्य हादरा देणार असते.' हा उपाय निकामी. 'त्या ऐवजी छोटी छोटी अणूअस्त्रे सोडून चंद्राचा आकार लहान करायचा आणि त्याला महासागरात पडायला लावायचे पण ह्या उपायात चंद्रही हादरा देणार असतोच, शिवाय त्याने बाजूला फेकलेल्या पाण्याचाही प्रश्न असतो.' हाही उपाय निकामीच ठरला.

तर असे उपाय मिळाले पण त्यात धोकेही तेवढेच. सर्वांचे प्रयत्न चालूच राहिले.

असेच एके दिवशी डॉक्टर विचारात गढलेले होते. राजू आत आला.

'आजोबा, आजीने चंद्रोदयाची वेळ विचारली आहे.' डॉक्टरांनी आपल्या कॉम्प्युटरकडून वेळ मिळविली '९ : २२ : १७' डॉक्टर परत विचारात गढले. 'आजोबा आपल्याशी बोलले देखील नाहीत' राजू हिरमूसून निघून गेला.

डॉक्टरांना मात्र हसू आलं. 'चंद्र इथे पृथ्वीचा नाश करायला निघालाय आणि राजूच्या आजीला चंद्रोदय पाहिजे.' त्यांच्या हट्टाखातर डॉक्टरांनी पूर्वीच पंचांगाचा डाटा कॉम्प्यूटरला पुरवलेला असतो, त्यामुळे आता जरी पंचांग नसली तरी पंचांगानुसार वेळ मिळत असे. अर्थात एम-२७ कडून येणारी चंद्रोदयाची वेळ आणि ही वेळ नेहमीच सारखी असे. पण स्त्रीहट्ट ना !

डॉक्टर परत आपल्या कामाला लागले. नुकताच एम्-२७ कडचा चंद्रासंबंधीचा ताजा डाटा आला होता. डॉक्टर तो वाचू लागले. चंद्राची '२७⅓ दिवसात ०·३४' नी ढळण्याची क्रिया चालू आहे. आजची चंद्रोदयाची वेळ ९:२४:१७. आजची....'

'अरेच्या ! काहीतरी चुकतंय'

डॉक्टरांनी पंचांगाप्रमाणे आलेली वेळ पाहिली ९ : २२ : १७. दोन मिनिटांचा फरक ? कसं शक्य आहे? असं असतं तर चंद्र अनेक डीग्रीजमध्ये ढळला असता. तो तर ०·३४' एवढाच ढळतोय.

'नाही नाही ! काही तरी नक्कीच चुकतंय.'

डॉक्टर त्वरेने कामाला लागले.

स्पेस शटल एम्-२७ च्या दिशेने निघाले. डॉक्टरांनी विनस्टन ब्राऊनिंग, लावास्की यांना पंचांगवेळेतले घोळ सगळं समजावून सांगितले.

'डॉक्टर, एक प्रयोग म्हणून आपण तुमची योजना अमलात आणू. पण पंचांगासारख्या जुन्या गोष्टीवर तुमचा एवढा विश्वास आहे ह्याचंच मला आश्चर्य वाटतं'—ब्राऊनिंग.

खरं तर सर्वांना असंच वाटत होते पण प्रयत्न म्हणून सर्वांनी डॉक्टरांच्या योजनेलामान्यता दिली.

स्पेस शटल एम्-२७ वर पोहोचले. स्पेस शटलमधून उतरल्यावर सर्वजण एम्-२७ च्या कॉम्प्यूटरकडे आले. डॉक्टरांनी एम्-२७ च्या कॉम्प्यूटरला पंचागाचा डाटा फीड केला. काही सेकंदातच कॉम्प्युटरने चंद्रोदयाची वेळ सांगितली. डॉक्टरांनी ती आपल्या बरोबर आणलेल्या पंचांगाशी ताडून पाहिली.

परत तेवढाच फरक !

कॉम्प्यूटरतज्ञ तानिवाकांना बोलावण्यात आलं. डॉक्टरांनी त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितली.

'कॉम्प्यूटरची चूक अशक्यच'... तानिवाका अनिच्छेनेच कॉम्प्यूटरच्या तपासणीला लागले.

सहा तासांनी ते कॉंप्यूटरतपासणी संपवून बाहेर आले. 'डॉक्टर तुमचा अंदाज खरा ठरला. कॉंप्यूटरच्या ब्रेन मध्येच एक क्षुल्लक चूक सापडली.'

चूक दुरुस्त होताच डॉक्टरांनी मघाचाच प्रयोग पुन्हा केला. आता मात्र दोन्ही उत्तरं तंतोतंत बरोबर!

सर्वांनी उत्सुकतेने चंद्राच्या कक्षेविषयीची ताजी बातमी मिळविली आणि सर्वांना परत एक आश्चर्याचा धक्का बसला.

'कॉम्प्यूटरने निर्वाळा दिलेला होता की चंद्र बिचारा आपल्याच कक्षेत फिरतोय. मीच त्याच्यावर आळ घेऊन तुम्हाला घाबरवलं.'

पृथ्वीवरचं संकट दूर झालं.

स्पेस शटल पृथ्वीकडे निघाले. सर्वजण आनंदात होते. पंचागाचं आणि डॉक्टरांचं कौतुक. आपली तारांबळ कशी उडाली हेच प्रत्येक जण बोलू लागला. तेवढ्यात विनस्टन म्हणाले, 'मित्रहो ही जर कॉंप्यूटरची चूक नसतीच आणि चंद्र खरोखरच पृथ्वीच्या रोखाने येत असता तर आपण काय करू शकलो असतो?'

आणि त्यांचा पुढचा प्रवास एकमेकांशी न बोलताच पार पडला!

❋

---

# दाता

गावकुसाबाहेर ओरडला कावळा,
कुणीतरी नवखा आला होता बगळा,
बगळ्याने केली आश्वासनांची ओरड,
भाषणबाजीने पडली घशात कोरड,
बगळा म्हणाला देताना आश्वासन,
अन्याय करणाऱ्यांना देईन शासन,
निवडणुकीत बगळा निवडला खरा,
सगळ्यांना वाटले सापडला झरा,
पण, निवडणुकीचीं ओसरलीं लाट,
वेडे सगळे पहातात बगळ्याची वाट,
बगळ्याने केला सर्वांचा विश्वासघात,
मिळेना कोणाचा मदतींचा हात,
गावकुसाबाहेर नेहमींच ओरडतात कावळे,
नवनवीन नेहमींच असतात बगळे,
पण, सर्वांना समजू लागलंय खरं-खरं आता
माझ्याशिवाय माझा कोणीं नाही दाता!

**अशोक भालेराव, तृतीय वर्ष शास्त्र**

# कळी उमलताना

कळी उमलते
उमलताना,
गोडशी हसते
आणि हसतानाच
हळुच भृंगाला निरोप देते
कळी उमलताना
पडतात दंवमोती पटपट
करतात कळीचे स्वागत
कळी उमलताना
रम्य पहाट होते
वारा वाहतो झुळझुळ
त्या वायुलहरींवर
झोके घेतानाच,
भरकन अपुले पर पसरुनिया
नाचू लागते, फुलून येते
सुमन नटखट सुंदर

**सुजाता गानू, प्रथम वर्ष वाणिज्य**

# कॅम्लीनचे दांडेकर

**उद्योगिनं पुरुषमुपैति लक्ष्मीम् ।**

रवींद्र एकनाथ कोठावदे, एम. कॉम-पार्ट १



एक यशस्वी, धडाडीचे उद्योजक माननीय श्री. काकासाहेब ऊर्फ डी. पी. दांडेकर यांनी २७ डिसेंबर १९८१ रोजी ७५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. जीवन-संघर्षात नेकीने आणि अखंड परिश्रमाने यश मिळवून महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रात त्यांनी जे यश प्राप्त केले आहे, त्याचा कोणालाही सार्थ अभिमान व आनंद वाटेल. कॅम्लीन या त्यांच्या उत्पादनाने भारतातच नव्हे तर भारताबाहेरसुद्धा चांगलीच बाजारपेठ मिळविली आहे. एवढेच काय, भारताबाहेर मलेशियातसुद्धा त्यांचा कारखाना आहे.

एके काळी दूधवाल्यासारखी बरणी भरून शाई-व्यापाऱ्यांच्या दारात जाऊन दुधाच्या मापाने शाई विकणारे ते काकासाहेब हेच का असा संभ्रम पडणे अत्यंत साहजिक आहे. परंतु त्यांच्या या अपूर्व यशामागे काकासाहेबांचे कष्ट आहेत, जिद्द आहे, तळमळ आहे. आणि हो, कष्टामागे नशीबही धावते. हिंमत, उत्साह, काम करण्याची जिद्द, कष्टाळूपणा, धडाडीचा स्वभाव, आणि इच्छाशक्ती तीव्र असली की या जगात अशक्य काहीच नाही, याचे उदाहरण आहेत काकासाहेब. म्हणूनच त्यांच्या कॅम्लीनने—कॅमलने—पन्नास वर्षांची यशस्वी आणि अथक वाटचाल केली आहे.

१९३० साली काकासाहेब बी. एस्सी. परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांनी वेधशाळेत आठ महिने नोकरी केली. येथे त्यांचे बस्तान चांगले बसले होते. प्रमोशन्स मिळून, उच्च पदाचे अधिकारपद मिळून भरपूर पैसासुद्धा त्यांना मिळाला असता. परंतु त्यांना जात्याच आवड होती स्वतंत्र व्यवसाय करण्याची. त्यातूनच काकासाहेबांचे मोठे बंधू माननीय नानासाहेब यांचेकडून धंदा करण्यास प्रोत्साहन ! काकासाहेब यशातील सिंहाचा वाटा नानासाहेबांना देतात, यात त्यांची खिलाडू वृत्ती दिसून येते.

धंद्यामध्ये नफ्याची निश्चिती नसतानासुद्धा काकासाहेबांनी चांगल्या पगाराची, मोठ्या हुद्याची नोकरी सोडून दिली. बऱ्याच जणांचा असा समज असतो की, ज्यांना नोकरी मिळत नाही, किंवा ज्यांना नोकरी करणे जमत नाही, ते नाइलाजाने धंदा करतात. हा निव्वळ गैरसमज आहे, हे धादांत खोटे आहे. तसेच भरपूर भांडवल धंद्यासाठी सुरूवातीच्या काळात लागते, महाराष्ट्रीयन माणसाला धंदाच करता येत नाही, असे बरेच गैरसमज असतात. हे गैरसमज दूर करून दाखविणारे उत्तम उदाहरण आहेत काकासाहेब. वास्तविक पाहता त्यांनी नोकरी सोडून धंद्यात पडून धोका पत्करला होता. धंद्याची नेमकी काय फलनिष्पत्ती होणार याचीसुद्धा खात्री नव्हती. शिवाय अल्पशा भांडवलाबाबत का होईना धोका पत्करला होताच. एकंदरीत, चांगल्या पगाराची, बढतीची, सुखसोयी उपभोगता

येतील अशी नोकरी सोडून दिलेली होती. आयुष्यक्रमच धोक्यात घातलेला होता.

काकासाहेबांनी नोकरी सोडली खरी, परंतु कसला धंदा करावयाचा ? तो काळ होता स्वदेशीच्या युगाचा. स्वदेशीच एक नवे युग जन्माला आलं होतं. म्हणनच स्वदेशी वस्तूंची निर्मिती करून या देशव्यापी चळवळीला हातभार लावावा या उदात्त हेतूने त्यांनी आखुडशिंगी बहुदुधी आणि अल्पमोली चीज निवडली. ती म्हणजे शाई. सर्वांनाच उपयुक्त अशी ही वस्तू. परंतु शाईच निवडण्यामागे काकासाहेबांनी कित्येक अंगांनी अभ्यास केला होता हे दिसून येते. त्यांनी संभाव्य अडचणींचा अंदाज घेतला. थोडक्या भांडवलात, तांत्रिक ज्ञानाचा कमी वापर करून, थोडक्या जागेत धंदा करता येईल असाच हा धंदा निवडला. धंदा निवडत असताना त्यांनी सामाजिक, आर्थिक, आयुष्यक्रमाविषयीचे धोके पत्करले. तसेच पर्यावरणाबाबतचे धोके. अगदी विपरित अशा वातावरणात काम करण्याचीसुद्धा वेळ त्यांच्यावर आली, पण त्यामुळे न डगमगता त्यांनी त्यातून यशस्वीपणे मार्ग काढला. कारण काकासाहेबांना त्या परिस्थितीची चांगली जाण होती व तडजोडीची वृत्तीसुद्धा !

काकासाहेबांचे यश हे अल्पावधीत, अल्पश्रमांमध्ये मिळालेले यश नव्हे. त्यांनासुद्धा अपयश आले. प्रयोग फसले, पैसा फुकट गेला. परंतु अखेर यश आलं. सर्व कष्टांचं चीज झालं. परंतु एक गोष्ट महत्त्वाची लक्षात ठेवण्यासारखी आहे की ते कधीही क्षणिक यशाने हुरळून गेले नाहीत व अपयशाने कधी खचून गेले नाहीत.

सारी काही तारेवरची कसरत चालली होती ! कच्च्या मालाची खरेदी, निर्मिती स्वतःच्याच हाताखाली करवून घ्यायची, कामगारांना काम शिकवून तरबेज करायचे, नवीन प्रयोग करायचे, तेही काकासाहेबांनीच आणि विक्रीसाठी बाजारात खेटचा घालायच्या त्याही काकासाहेबांनीच ! परंतु म्हणतात ना, "बोलणाऱ्याची बोरं विकली जातात, परंतु न बोलणाऱ्याचे आंबेसुद्धा विकले जात नाहीत." तर काकासाहेबांनी मिठ्ठास वाणीने व्यापाऱ्यांना आपलेसे करून घेतले. धंदा वाढविला, जोपासला.

१९३६ साली मालतीबाईंशी त्यांचा शुभविवाह झाला. सौ. मालतीबाईंनी सुद्धा पूर्णतया कारखान्यातच स्वतःला सामावून घेतले. तेसुद्धा केवळ नाईलाज म्हणून नव्हे तर एक कर्तृत्वाची कसोटी म्हणून. सौ. मालतीबाईंबद्दल बोलताना काकासाहेब म्हणतात, "तिचं सहकार्य नसतं तर माझी कारखानदारीची स्वप्न हवेतच विरघळली असती. यापेक्षा आणखी कोणत्या शब्दांनी तिच्या कर्तृत्वाचं वर्णन करू अन कोणत्या शब्दांनी तिला धन्यवाद देऊ ?" खरोखर, नव–उद्योजकांना हा आदर्श धडा आहे.

हळूहळू उत्पादनाचा व्याप वाढत होता. परंतु सर्व प्रकारच्या परिस्थितीत आणि वातावरणात काकासाहेब, त्यांच्या पत्नी आणि सहकार्यांसमवेत यशाची घोडदौड करीत होते. हळूहळू त्यांनी डिंकाचे उत्पादन सुरू केले डिंकाच्या बाबतीतसुद्धा अनेक प्रयोग केले. काकासाहेबांनी त्यांच्या प्रत्येक उत्पादनाबाबत एक कटाक्ष पाळला होता. तो असा की काहीतरी थातुरमातुर करून कसला तरी माल बनवायचा आणि बाजारात आणायचा असला प्रकार मुळीच करायचा नाही. अर्थात जे असे करतात ते अल्पावधीसाठी बाजारात टिकून राहतात. पण दीर्घकाळ अशांना बाजारात टिकणे अशक्य असते. काकासाहेबांनी नवनिर्मितीमध्ये आनंद मिळविला, योग्य अशी संधी शोधून तिचा पुरेपूर उपयोग करून घेतला. त्यांनी सतत डोके लढवून नव्या कल्पनांचा उपयोग करून घेतला. ग्राहकांच्या नेमक्या गरजा कोणत्या आणि त्या गरजांची चांगल्या प्रकारे पूर्ती कशी करता येईल हे जाणून घेऊन त्या दिशेने त्यांनी त्यांची पाऊले टाकली आहेत. आहे त्यात काकासाहेबांनी समाधान न मानता उत्पादनात नियमितपणे सुधारणा केली. त्यामुळे ते यशस्वी बनले आणि बाजारपेठेत दीर्घकाळ टिकून आहेत. यावरून असे दिसून येते की 'ठेविले अनंते तैसेचि राहावे' हे उद्योजकाला अजिबात मान्य नसते.

'मी एवढा मोठा कारखानदार आहे, मग मला गाडी असली पाहिजे.' असा विचार त्यांच्या मनाला कधीच शिवला नाही. बरीच वर्षे त्यांनी ट्राममधूनच प्रवास केला. स्वतःच्या चैनीसाठी कंपनीला झळ लागू नये ही त्यांची प्रामाणिक इच्छा. ह्या गोष्टीपासून नव–उद्योजकांना धडा मिळतो की धंद्यामध्ये मिळालेला नफा धंद्याव्यतिरिक्त कोठेही खर्च न करता धंद्याच्या वाढीसाठीच वापरला पाहिजे.

शाई, डिंक इ. वस्तूंच्या उत्पादनाबरोबरच त्यांनी १९६७ सालापासून सध्या सुप्रसिद्ध असलेले क्रायलीन

रंग बनविण्यास सुरूवात केली. त्यासाठीसुद्धा वर्षभर संशोधन चालू होते. अॅक्रायलिक नावाचं द्रव्य या रंगात मुख्यत: वापरले जाते यावरूनच क्रायलीन हे नाव पडले. आपल्या देशातील कलाकारांनी देशी साहित्य वापरूनच चांगल्या चांगल्या कलाकृती बनवाव्यात, हा आग्रह अगदी रास्त असा आहे. पुढील वर्षीच, म्हणजे १९६८ सालापासून तर कॅम्लीन उत्पादने मोठ्या प्रमाणावर निर्यात होऊ लागली.

१९७१ मध्ये कॅम्लीनने मलेशियातील नेगेरी सेंबिलान येथे कारखाना सुरू केला. त्या कंपनीचे नाव 'कॅम्लीन नेगेरी सेंबिलान सेंड्रियन बेरहाड' असे ठेवण्यात आले. (सेंड्रियन बेरहाड=प्रायव्हेट लिमिटेड) अर्थात हा कारखाना स्थापन करण्यापूर्वी काकासाहेबांनी त्यासंबंधी सर्वांगीण अभ्यास केला. तेथे वस्ती किती, शिक्षणाचं प्रमाण काय, ते वाढविण्यासाठी सरकार काय काय उपाय करीत आहे, शैक्षणिक संस्था किती आहेत, इंजिनिअरिंग, आर्किटेक्चर शिकविणाऱ्या संस्था किती आहेत, तेथील बाजारपेठेतील मालाशी तुलना करता आपल्या मालाला कितपत उठाव मिळेल, ह्या आणि अशा अनेक बाबींचा सर्वांगीण अभ्यास त्यांनी केला व नंतरच कारखाना स्थापण्याचा विचार पक्का केला. निष्ठा, अचूक दृष्टी, दीर्घोद्योग, कल्पकता, कार्यतत्परता इ. च्या बळावर काम करता येतं याचा हा कारखाना म्हणजे मूर्तिमंत उदाहरण आहे.

वरील विवेचनावरून असे दिसून येईल की काकासाहेबांचा नवनिर्मितीसाठी सदैव कटाक्ष असतो. त्यांनी उपलब्ध असलेल्या थोडक्याच साधनसंपत्तीचे संघटन आणि व्यवस्थापन कसे सुंदर रीतीने केले, हे दिसून येते. अत्यंत अल्पशा भांडवलापासून सुरू केलेला धंदा आता यंदा त्यांची उलाढाल दहा कोटींची होईल, येथपर्यंत त्यांनी मजल मारली. धंदा सुरू करताना अनेक प्रकारचे धोके पत्करले. त्यातून त्यांचा मानसिक सोशिकपणा आणि निर्भयता हे गुण प्रकर्षाने दिसून येतात. संशोधन करताना आधी आलेल्या अनुभवांचा योग्य असा फायदा त्यांनी करून घेतला. गतअनुभवातूनच ते शिकले. परंतु त्यासाठी त्यांनी स्वत: कष्ट घेतले, असंख्य प्रयोग केले. प्रत्येक काम आपणास स्वत:ला यावयास पाहिजे. कोणतेही काम करताना लाज न वाटू देणे या गुणांमुळे ते यशस्वी बनले. यावरून त्यांचा स्वावलंबी स्वभाव दिसून येतो. उद्योजक म्हणून त्यांचा अजून एक गुण विशेष म्हणजे नियमितपणा.

नियमित वागणूक आणि निर्व्यसनीपणा यामुळे काकासाहेबांची तब्येत उत्तम आहे. सुदृढ प्रकृतीची, त्यांच्या मते हीच दोन कारणे आहेत. त्यांना क्लबात जायला आवडत नाही. हल्ली 'काळाची एक गरज' या दृष्टिकोनातून क्लबकडे बघितले जाते. काकासाहेबांचा त्याला आक्षेप नाही. परंतु क्लबात जाण्यापेक्षा आपल्या सहवासात जे जे आले, त्यांच्याच सुखदु:खाशी समरस होण्यात त्यांना आनंद, शांती आणि समाधान मिळते, त्यांच्या या स्वभावामुळे त्यांच्याच कारखान्यात काम करून लहानाचे मोठे झालेले कामगार आहेत. काकासाहेबांनी वेळोवेळी प्रत्येकास उत्तेजन देऊन सुधारणा घडवून आणली आहे. त्यामुळेसुद्धा कामगारांशी घरोब्याचे संबंध आहेत. काकासाहेब एकत्र–कुटुंब पद्धतीला अत्यंत महत्त्व देतात. अजूनही ते एकत्र-कुटुंब पद्धतीनेच राहतात. त्यांचे पुतणे आणि मुलगे आता सर्व कारभार सांभाळतात. काकासाहेब जरी आता निवृत्त झाले असले, तरी सल्ला मात्र देण्याचे काम मोठ्या आवडीने करतात.

काकासाहेब जरी यशस्वी उद्योजक असले, तरी त्यांचा देवावरचा विश्वास अगाध आहे. केळशीचा श्रीराम हे काकासाहेबांचे कुलदैवत. त्याच्याच आठवणीत त्यांनी आयुष्याचे कठीण आणि चांगले दिवस काढले. त्यांच्याच शब्दात सांगावयाचे तर, 'आम्ही कष्ट केले, प्रामाणिकपणे आयुष्य जगलो, व्यवसाय वाढविला. परंतु आमचं हे यश त्याच्या कृपेमुळेच. त्याची कृपा आणि कॅम्लीनचं यश यात आम्ही भेद मानीत नाही. श्रीरामाच्या विशाल कृपाछत्राखाली आम्ही वाढलो.' केवढी ही लीनता. हल्ली यांत्रिक युगात देवावरचा विश्वास उडत चालला असताना काकासाहेबांचे असे हे आगळे उदाहरण पाहून धन्यता वाटते.

यंदा कॅम्लीनला ५० वं वर्ष लागलं. बघता बघता सुवर्णमहोत्सवी वर्ष गाठलं.

'कॅम्लीन' हे नाव अत्यंत कल्पकबुद्धीने काकासाहेबांनी दिले आहे. कॅमल म्हणजे उंट. तर उंट हा प्राणी अत्यंत खडतर मार्ग सहज पार करतो. वैराण वाळवंटातूनसुद्धा धीमेपणानं आणि सहनशीलतेनं प्रवास करू शकतो. इंक म्हणजे शाई.

काकासाहेबांच्या अमृतमहोत्सवी आणि कॅम्लीनच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात मी प्रभुरामचंद्राला प्रार्थना करतो की या संस्थेला आणि तिच्या संस्थापकाला चैतन्यपूर्ण, गतिशील आणि यशसंपन्न आयुष्य लाभो ! ❋

# दुःख



अशोक वंजारी, द्वितीय वर्ष साहित्य

...आणि एकदाचा तो दिवस उगवला. माझा मॅट्रिकचा रिझल्ट होता त्या दिवशी. माझं भावी आयुष्य त्या दिवसाच्या पडणाऱ्या फासावर अवलंबून होतं. नापास झालो तर समोर अंधकारमय साम्राज्य उभं होतं. पास झालो तर भावी आयुष्याची चढण होती. आणि अशा ह्या संमिश्र वातावरणात तो दिवस उगवला.

मी धडधडत्या अंतःकरणाने शाळेत गेलो. माझ्या सारखे अनेकजण तिथं आले होते. काहींचे चेहरे खुलले होते. तर ..काहींचे चेहरे पडले होते. काळवंडले होते आमावास्येसारखे. मी माझी कशात गणना होणार ह्याचाच विचार करीत होतो व त्याच स्थितीत मी माझा रिझल्ट घेतला. मी अंधकारमय साम्राज्यावर विजय मिळवला होता. मी पास झालो होतो. मी कॉलेजला जाणार ह्या वेगळ्या नवीन स्वप्नांना मी रंगवायला लागलो होतो.

माझे स्वप्न साकार झाले. मी कॉलेजात जाऊ लागलो. नवे चेहरे, नवे मित्र, नव्या ओळखी ह्यांचं प्रमाण वाढू लागलं. सगळं काही नवीनच होतं.शाळेच्या वातावरणात व येथील वातावरणात जमीन अस्मानाचा फरक होता. शाळेत आम्हाला कोपऱ्यात बसावं लागत होतं ते पण घरून बारदानं आणून. पुढं बसण्याची आम्हाला परवानगी नव्हती. फक्त वर्षातून एकदाच मास्तरांचं आमच्याकडे लक्ष जात होतं. आम्हाला पुढं बसवलं जात होतं. शाळेची पाहणी करून इन्स्पेक्टर गेल्यावर आम्हाला पूर्वीच्याच जागी बळजबरीनं बसवलं जात होतं. आम्ही– पाच-सहा जण आपल्या पूर्वीच्याच जागी जाऊन गप्प बसायचो. एखाद्या कोंडवाड्यात कोंडल्यागत. आमचा अभ्यास मास्तरांनी पाटी हाती घेऊन कधी पाहिला हे मला तरी आठवत नाही. हा...आमचं चुकलं तर मास्तर छडी फेकून मारत होते. नंतर ती छडी उचलून तिच्यावर तांब्यातील कसलं तरी पाणी शिंपडून पुन्हा घेत होते.

दगड्या म्हणायचा की, त्या तांब्यात गाईचा मूत आहे. तो शिंपडल्यावर आपल्यापासून छडीला झालेला विटाळ नाहीसा होतो.

मला हे सगळं चमत्कारिकच वाटायचं. आमच्या स्पर्शाने ह्या छडीला विटाळ कसा काय होतो ? हे गूढ अजूनपर्यंत मला उलगडत नाही.

तसला प्रकार काही कॉलेजात नव्हता. 'अे तू, महारडा आहेस आमच्या जवळ येवू नकोस.' 'आम्हाला शिवून बाटवू नकोस' असली वाक्ये जी शाळेत ऐकायला मिळत होती ती येथे दुर्मिळ झाली होती. 'आम्ही सगळीच माणसं. माणसासारखेच वागू या.' ह्या तत्त्वाची येथे प्रचीती येत होती.

कॉलेजमध्ये मित्रमंडळी होती. माझ्या कुशाग्र बुद्धीमुळे अनेकांनी माझ्या सोबत मैत्री केली. त्यात अनिल देशपांडे नावाचा मुलगा मला फार आवडला. मैत्री करण्याजोगा वाटला. आमची दिवसेंदिवस मैत्री वाढत होती. सोबत पिक्चरला जात होतो. फिरायला जात होतो. हॉटेलिंग करत होतो. असे अनेक कार्यक्रम आम्ही कॉलेजला सुट्टी असताना किंवा कॉलेजमध्ये करीत असू. आमची मैत्री वाढत होती. कॉलेजच्या माझ्या मित्रमंडळीतील महत्त्वाचे स्थान अनिलने भूषविले होते. माझ्या होस्टेलच्या रूमवर तो नेहमी येवू लागला.

मी सुखावलो होतो. आपला सर्वांत जवळचा मित्र

ह्या सवर्ण आहे ह्याचा मला अभिमान वाढायचा. तसं बघायला गेलं तर अनिल ह्या दिसायला गोरापान. साहेबावानी, नाकी डोळी छान. तबियतीने मस्त. कोणालाही आकर्षित करील अशी देहयष्टी. आणि असा मित्र मला लाभला होता. आपण शहरातल्या कॉलेजात येवून शहाण्यासारखे वागलो ह्याची मला सारखी जाणीव होऊ लागली. ग्रामीण भागातील जीवनापेक्षा मला शहरी जीवन आवडू लागलं.

एकदा असाच तो माझ्या रूमवर आला. फारच खूष दिसत होता. " अरे सद्या ! गद्ध्या, आवर लवकर " मला त्याच्या नेहमीच्या घाईची सवय झाली होती.

" कारे... बाबा "

" सद्या... अरे मी दोन तिकिटं काढून आणलीत. मदर इंडियाची. चल आटप लवकर."

मी काही न बोलता तयारी केली. त्याच्याबरोबर पाचच मिनिटांत मी बाहेर पडलो. दिवसभर मस्त मजा केली.

'सद्या...इथे जवळच मी राहतो सदाशिव पेठेत. चल जरा घरी जावू. नंतर सोडतो तुला रूमवर.' मी पहिल्यांदा नकार दिला. परंतु त्याच्या हट्टापुढे माझा नाईलाज झाला. आम्ही घरी गेलो.

'नाव रे...काय तुझं ?' अनिलच्या आईने विचारलं.

'सदानंद कांबळे. मी × × तालुक्यात × × गावी राहणारा.'

'कांबळे म्हणजे 'हरिजन' ना रे...' माझ्या पायाखालची जमीन सरकल्याचा मला भास झाला. सर्व शरीर बधीर झालं. 'हरिजन' म्हणजे चक्क मायवरून दिलेल्या शिवीसारखाच शब्द की. झक मारली आणि आलो असं वाटू लागलं.

'छे ! वाटत नाही तू हरिजन असशील म्हणून. कित्ती...स्वच्छ राहतोस रे तू...एखाद्या वाण्या-ब्राह्मणासारखा की रे...' अनिलची आई असंच काहीतरी बोलत होती. माझ्या चेहऱ्यावरील भाव सरडयाच्या रंगासारखे बदलत होते, हे अनिलच्या आईच्या ध्यानी आलं असावं.

'तस्सं.. आम्ही जात वगैरे काही पाळत नाही हो...! आम्हाला ते मुळी आवडतच नाही...बघ... अरे विसरलेच की मी तुला पाणी वगैरे काही हवं का ?'

अनिलने पाणी आणून दिलं. मी वरूनच पाणी प्यालो. (मला सवय झाली होती वरून पाणी पिण्याची) अनिलने पेला घरात नेवून ठेवला.

'अरे ..अनिल...तो पेला तिकडे ठेव पाहू .. सकाळी आंघोळ करण्यापूर्वी घासून टाकीन' आतून... अनिलला उद्देशून केलेले अनिलच्या आईचे भाष्य माझ्या कानी पडले.

माझं काळीज ऊसाच्या चिपाडासारखं पिळवटून निघत होतं. मन आक्रोश करीत होतं. 'अरे आमच्यात काय कमी आहे? आम्हीसुद्धा तुमच्या सारखीच माणसं ना? मग आमच्याशी असं का वागता? आमच्यापेक्षा तुम्हाला जनावरं जवळची वाटावी ! आमच्या जवळ येण्यामुळे तुम्हाला विटाळ कसा काय होतो ?' मी आतल्याआत जीव तोडून ओरडत होतो.

'छे...आपल्या गावातच हे जातियतेचं खूळ नाही तर ह्या सगळ्या हिन्दुस्थानातच आहे. ह्यांनी किती पुरोगामित्वाचे बुरखे चेहऱ्यावर ओढले तरी ह्यांच्या हे जे जातियतेचं बीज खोलवर रुजले आहे, ते नष्ट होणे शक्यच नाही. आणि हे जोपर्यंत नष्ट होणे शक्य नाही तोपर्यंत हे माणसाला माणूस म्हणणार नाहीत. माणसाला अन्नावाचून उपाशी मारतील परंतु कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी घेऊन पळतील.' मन पेटून उठत होतं.

'जिथं आपल्याला माणूस म्हणून किंमत नाही तिथं का थांबावं ?'

'बरं . अनिल, मी निघतो. फारच उशीर झाला.' मी कसातरी बोलून जातो.

'बरं का सदा...नेहमीच येत जा ..हो ..मनात कसलाच संकोच करू नकोस. आम्ही तसलं काही मानत नाही. तुझ्यासारख्यांचा उलट अभिमान वाटतो...अरे .. तुम्ही स्वच्छ राहिलात...शिकलात तर कोण तुम्हाला जवळ करणार नाही ?'.. असंच काहीतरी अनिलची आई बरळत होती. आणि ते ऐकण्याची माझी इच्छा नव्हती. मी त्वरित बाहेर पडलो...

कॉलेजची सुट्टी संपली. दुसरं सत्र चालू झालं. सगळे मित्र भेटत होते. गप्पांना उधाण येत होतं. कमतरता भासत होती ती अनिलची, अनिल कॉलेजात येत होता

औपचारिक बोलत होता. आमच्यात सामील होत हसत होता. पूर्वीचा अनिल व आताचा अनिल ह्यात फारच बदल झाला होता. अनिलचं हे वागणं माझ्या हळू-हळू ध्यानी येऊ लागलं माझं व अनिलचं भांडण-सुद्धा झालं नाही, मग हा असा बोलण्याचा का टाळतो? भेटण्याचे का टाळतो ? असे नाना प्रश्न दत्त म्हणून समोर उभे राहात होते. ह्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा मी कित्येक दिवस प्रयत्न करूनसुद्धा त्याची उत्तरे मला सापडली नाहीत. ते प्रश्न आता माझ्यापासून खूप दूर गेले आहेत. जेवढा अनिल माझ्यापासून दूर गेला तेवढेच.

अनिल दूर का गेला ? हे गूढ अजूनपर्यंत मला उकललं नाही. परंतु कोणत्या मित्राने घरी नेण्याचा आग्रह केला तर मी साफ नकार देतो.

नाहीतर तिथेसुद्धा जात आडवी येवून त्याच्या दोस्तीलासुद्धा मुकावे लागेल ही भीती .

# हे प्रियतमा . . .

तू माझ्या फक्त स्वप्नीच ये
स्वप्नमहाली मी तुझ्यावर
गुलाबी रंग उधळिला परंतु. . .
माझ्या घरी येण्याचा
हट्ट धरू नकोस. कारण. . .
तिथे तू येऊ शकणार नाहीस
अग ! तिथे येण्याला जनावरं
नाकं मुरडतात.
तिथे तुला मी कशी नेऊ.
माझं सोड ! माझा जन्मच तिथं झाला
आणि मरणारही तिथंच्
मला सवय झालीय्. जनावरापेक्षा
भयंकर जिणं जगायाची. . . अगं. . .
सूर्याची किरणं तिथं येण्याला
घाबरतात. तिथं तुला मी कशी नेऊ.
हे प्रियतमा. . .
तू माझ्या फक्त स्वप्नीच ये.
स्वप्नभंगाचं दुःख परवडेल,
परंतु. . .
तुला धोका नको !
तुला धोका नको ! !

**अशोक वंजारी, द्वितीय वर्ष साहित्य**

# सुखावलास ?

' कविता कर ' म्हणालास,
म्हणून कागद समोर ओढले
पण कविता म्हणजे रेसिपी कारे ?
भाजणे, तळणे, शिजवणे की कविता !
विषयही काय तर म्हणे ' तू ! '
तुझ्यासारख्या अवाढव्य, गहन विषयावर का
कविता करणार ?
डोंबलं माझं !
तुझ्या रूपाकडे पाहून अवाढव्य नाही म्हटले !
आणि हिंदीत गहना म्हणजे दागिना !
तर तू म्हणजे—
म्हणू का ? माझ्या आयुष्याचे सुंदर वळण !
आहेस ना ? माझ्या जिवंत वहाण्यावरचा सुंदर
घाट !
होय ना? माझ्या सुंदरतेचा अतिसुंदर अलंकार!
खरे ना ? माझ्या जगण्याचे नितांत सत्य कारण
आणि, माझी अस्मिता, माझे व्यक्तिमत्त्व
फुलवणारी ठिणगी.
कारे हसलास ? सुखावलास का ?

**शुभांगी देशपांडे तृतीय वर्ष साहित्य**

# जौळ : एक आस्वाद

कु. सुजाता गानू (प्रथम वर्ष वाणिज्य)



'जौळ' ही रत्नाकर मतकरी यांची कादंबरी सत्य घटनेवर आधारित आहे. जास्तीतजास्त वास्तवतेकडे झुकताना मूळ मानवी स्वभावातील भेकडपणा प्रकर्षाने जाणवतो. एखाद्या शुल्लक कारणावरून उगीचच आततायीपणे स्वतःला मृत्यूच्या खाईत लोटणाऱ्या कितीतरी भेकड व्यक्ती आपण समाजात बघतो. तसाच एक 'प्रसाद' या कादंबरीचा नायक. उच्च राहाणी पण त्यामानाने फार मोठ्या महत्त्वाकांक्षा नसलेला तरुण. आपल्या आईने आपल्या वडिलांनंतर आपल्यासाठी खस्ता खाल्ल्या, अहोरात्र काबाडकष्ट करून आपल्याला वाढविला, शिकविला आणि मोठा केला. आज जे काही आपण आहोत ते केवळ आपल्या आईमुळे. 'सिंधूताईमुळे', या फार मोठ्या उपकाराच्या ओझ्याखालीच प्रसाद सतत वावरतो. जन्मदात्या आईची बाजू घ्यावी की जिच्याबरोबर जन्म काढायचा तिची, या संभ्रमात तो कायम सासूसुनेच्या भांडणात मनातच कुढतो. जिवलग मित्रांनासुद्धा तो घरातले हे उगीचच माजलेले वादळ सांगत नाही. मूकपणे कर्जाचे हप्ते फेडण्यासाठी ओव्हरटाईम करणारा 'प्रसाद' अन् जेवताना गाऱ्हाणी करणारी सासू, अन् बऱ्याच वेळा निमूटपणे ऐकून घेणारी पण काहीवेळा संतापून बोलणारी 'नयन'. सारेच अगदी वास्तव वाटते. मध्यमवर्गीय जीवनातील हाच तो संसार आपणास ठायी ठायी दिसतो. वीतभर खोलीत चाललेला हा संसार थोर सुखाचा हव्यास धरून सर्वांना दुःखी करतो. संबंध कादंबरीत 'प्रसाद' चा पुरुषी निग्रहीपणा, कर्तृत्व, जगण्याची अभिलाषा सारेच काही अदृश्य आहे. आणि म्हणूनच 'प्रसाद' एक सामान्य माणूस म्हणून मनापासून पटतो. लेखकाने ही व्यक्तिरेखा जाणीवपूर्वक उभी केली नसून अगदी सहजपणे वास्तवतेतून निर्माण झाली आहे. 'प्रसाद' चे हे अतर्क्य वागणे असामान्य वाचकांना मूर्खपणाचे व नेभळटपणाचे वाटते, पण अतिसामान्य वाचकांना मात्र पटते.


संपूर्ण कथा प्रसाद, नयन आणि सिंधूताईंच्या भोवती फिरत राहाते आणि प्रत्येकजण बरोबरच वागतो आहे असे वाटू लागते. मुलाला आपण वाढविले आणि त्याच्या व आपल्या प्रेमात दुरावा निर्माण करणारी सून म्हणून सुनेकडे सिंधूताई कधीमधी बघतात, तर आपल्या सुनेनं शिवणंटिपणं करावं अन् मुलाला मदत करावी म्हणून काही वेळा त्या आग्रह धरतात. पण 'नयनला' एखाद्या 'विधवेसारखे' काम करणे नको वाटते. नवऱ्याच्या बरोबर हिंडावे, हौसमौज करावी अशा विचारांची 'नयन', माहेरी अगदी लाडात वाढलेली असल्याने 'स्वप्नील' असते. सासूचे बोचरे बोल ती बऱ्याचवेळा मूकतेने सहन करते. पण शेवटी भांड्याला भांडं लागतं अन् क्षुल्लक त्रासाने ते तरुण जोडपे आत्महत्येस प्रवृत्त होते.

सिंधूताई, नयन आणि प्रसाद यांच्या व्यक्तिमत्त्वाचे स्वतंत्र पैलू त्यांच्या एकदा एक अन् दुसऱ्यांदा भलतेच या वागण्यातून मतकरी यांनी उत्तम प्रकारे रेखाटले आहेत.

सामान्य मनाचे मूर्तिमंत नमुने म्हणजे ही तीन पात्रे होत. त्यांच्या स्वभावाचे दर्शन अनपेक्षितरित्या प्रसंगांतून उतरते व वाचकांवर त्याच्या अनपेक्षित परिणाम होतो. मतकरी याची अंगभूत सहजता याही कादंबरीत प्रकर्षाने जाणवते. आपल्या लेखणीतून प्रसंग हुबेहूब सादर करण्याची अफाट ताकद वाचकांना चांगलीच विचलित करते. अन् सासूसुनेवरील ही कौटुंबिक, वास्तवदर्शक कादंबरी छेदून जाते. ती. शेवटच्या पुनरावृत्ती टाळणाऱ्या प्रसंगातूनच ! कारण नाहक एका चिमुकल्या जीवाचा बळी पडतो.

थोडक्यात प्रसादचा दुबळेपणा, नयनची असहायता आणि सिंधूताईंचा हेकेखोर स्वभाव, यातूनच सासूसुनेचा नाट्यमय संघर्ष या कादंबरीत आकार घेतो. पण तरीही सामान्य रसिकांना रुचणारी, पटणारी, कादंबरी म्हणून जौळ नक्कीच परिणामकारक वाटते. ●

# साहित्य–शाखेकडील माझे आकर्षण



सुषमा कुलकर्णी, १२ वी साहित्य

SSC चा निकाल जवळ आला होता. मनामध्ये विचारांचा गोंधळ चालला होता. पण काही क्षणांतच सर्व शांत झाले. एखादे कोडे सोडवत असावे आणि अचानक ते झटकन सुटावं तसंच झालं माझं. गणिताचा व शरीराच्या चिरफाडीचा मनापासून कंटाळा. तसेच काही विषयांचे जबरदस्त आकर्षण. यामुळे " कला " किंवा " साहित्य " शाखेकडे मनाचा ओढा होताच.

आजच्या जगात राष्ट्राची प्रगती व जागतिक राजकारणातील स्थान हे राज्यशास्त्राचा अभ्यास केल्यानंतर समजेल. इतिहासाचा खरा अर्थ, वर्तमानाचे भान ठेऊन जगायला शिकायचे असेल तर पहिला इतिहास तर कळला पाहिजे ! जीवनाचे तत्त्वज्ञान हे अभ्यासानेच समजेल नाही का? या तत्त्वज्ञानाचे कृतीत रूपांतर 'कला' या शाखेमुळेच शक्य आहे नाही का ? व्यावहारिक जगात यश मिळवून चांगले राहणीमान कसे मिळवावे हे अर्थशास्त्रच शिकवत नाही काय ?

आज जसे समाजाचे अनेक भाग आहेत तसेच अभ्यासाच्याही अनेक दिशा आहेत. सामान्य माणसाला पटेल अशा भाषेत राष्ट्रवाद सोप्या भाषेच्या सहाय्याने शक्य आहे. ती भाषा " कला " या शाखेमध्ये शिकायला मिळते. ज्या अनेक माणसांचा मिळून समाज व समाजांचे मिळून राष्ट्र तयार झालंय, त्या राष्ट्रातील माणसांचे स्वभाव, धर्म, वैशिष्टये हे सर्व मानस–शास्त्राच्या आधारे शोधून काढता येतील. समाजाची सर्वांगीण रचना, कार्यपद्धती, आधुनिकतेची दृष्टी यांची समज समाजशास्त्र आपल्याला देते.

अशांपैकी आपल्या आवडीच्या विषयात ज्ञान संवर्धनाच्या किंवा संशोधनाच्या दृष्टीनेही पाया घालण्याचे कार्य " कला " शाखा महाविद्यालयीन जीवनात करते.

समाजऋणाची जाणीव प्रत्येक आवडीच्या माणसाला व्हायला पाहिजे. या जाणीवेमुळे माणूस समाजाभिमुख होईल व राष्ट्र पुढे जायला वेळ लागणार नाही. ह्या समाजऋणाची व राष्ट्रकर्तव्याची जाणीव प्रत्येक माणसाला आपणच नको का करून द्यायला ? हे सर्व कला शाखेत शिकविल्या जाणाऱ्या सर्व विषयांमुळे शक्य होईल असे मला वाटते.

सर्वांगीण जीवनविकासाची, सर्वांगीण सामाजिक शास्त्रांची परस्परपूरक भूमिका कळण्यासाठी व वापरण्यासाठी आम्हाला ज्या " कला " शाखेमुळे वेळ उपलब्ध होऊ शकेल तिची निवड आम्ही करावी असे तुम्हाला नाही का वाटत ?

# महिमा 'साता'चा

संजय पां. मोरे, १२ वी साहित्य



लॅटिन व संस्कृत यांचा पाया एकच व सारखा आहे. सप्तम व सप्त हे सारख्याच अर्थाचे शब्द आहेत. त्या दोघांचा अर्थ सात.

साताचा आकडा गणितात देखील मूलभूत मानला आहे. संख्याशास्त्रात सात मानसिक किंवा आत्मिक ज्ञानाचा मित्र आहे असे समजण्यात येते. सर्व रुढ्या व धर्मामध्ये सात हा आकडा पवित्र मानला जातो.सातपट, सत्तरपट किंवा सातशेपट असा शब्दप्रयोग कुराण व बायबलमध्ये केला आहे. त्याचा प्रत्यक्षात तेवढाच अर्थ नसून अगणित असा आहे. 'सातवेळा सांगूनही तुझ्या लक्षात येत नाही !' असे म्हणताना त्याचा अर्थ अनेकवेळा असा असतो. पाश्चिमात्य राष्ट्रांसंबंधी बोलताना सातासमुद्रापलिकडे असा उल्लेख केलेला आढळतो.

सात या अंकाचा मानवी जीवनाशी घनिष्ठ संबंध आहे. मानसशास्त्रीयदृष्टचा मूल हे गर्भाशयात सात महिन्यांतच आकार घेत असते. मूल जन्मल्यानंतर सातव्या दिवशीच नाळ पडते. जन्मानंतर सातव्या महिन्यात मुलास दात येण्यास प्रारंभ होतो. मूल २८ (७ × ४) आठवड्यांनी चालण्यास सुरूवात करते.


बायबलप्रमाणे माणसाचे आयुष्य सत्तर म्हणजे साताच्या दहापट आहे. जन्मापासून मरणापर्यंत माणसाला सात योनींतून जावे लागते असे शेक्सपिअर म्हणतो. परंतु हा प्रवास आपल्यातील सर्वच लोक पूर्ण करतात असे नाही. काही अल्पावधीतच जग सोडून जातात, तर काही म्हातारपणी मृत्यु पावतात. निरनिराळ्या ग्रहांच्या फलज्योतिषानुसार प्रत्येक ग्रहाप्रमाणे सात दिवस जातात. रविवार हा सूर्याच्या, सोमवार चंद्राच्या, मंगळवार मंगळाच्या, बुधवार बुधाच्या, गुरुवार गुरूच्या, शुक्रवार शुक्राच्या, शनिवार शनीच्या फलज्योतिषाप्रमाणे जातो.

पृथ्वीमातेप्रमाणे हे सर्व ग्रह सात मार्गांनी सूर्याभोवती फिरत असतात असे कुराणात सांगितले आहे. सर्व धर्मांना सात स्वर्गाचे अस्तित्व परिचित आहे. सुखाच्या शिखरावर असलेला सातव्या स्वर्गावर असतो असे समजण्यात येते.

लग्नाच्या होमाभोवती फिरून नववधू सप्तपदी पार पाडते म्हणजेच सात पावले चालते. इंद्रधनुष्यात सात रंग असतात. जगात सात आश्चर्ये असून ती विशेष म्हणजे मानवनिर्मित आहेत व त्यामध्ये ताजमहालाचा समावेश आहे.

देवाने सहा दिवसांत हे जग निर्माण केले व सातव्या दिवशी विश्रांती घेतली असे बायबलमध्ये नमूद केले आहे. सातवा दिवस हा शनिवार होय.

# मर्यादित षटक–सामने...



इम्तियाज शेख (द्वितीय वर्ष साहित्य)

भारतीय क्रिकेट संघ कागदावर अतिशय बलाढ्य दिसतो. संघातील खेळाडूंची नावे सुद्धा मोठी मोठी आहेत. त्यामुळे निवडसमिती या नावाचाच पाठपुरावा करताना आढळते. पाच दिवसांच्या कसोटी सामन्या-बद्दल बोलायचे झाले तर भारतीय संघाची वृत्ती सामना बरोबरीत अथवा अनिर्णित कसा ठेवता येईल याकडे अधिक लक्ष देणारी दिसून येते. भारतीय संघाने फलंदाजीच्या जोरावर सामना जिंकला आहे असे भाकित करताना कोणताही तज्ज्ञ दिसत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे संथ व आत्मविश्वासाचा अभाव असलेली फलंदाजी. अशी फलंदाजी गोलंदाजांच्या परि-श्रमावर पाणी सोडते. या करिता देशात मर्यादित षटकसामने खेळले जाणे महत्त्वाचे आहे.

मर्यादित षटकांच्या सामन्यात यशस्वी होण्यासाठी ऑस्ट्रेलिया व वेस्टइंडीज हे जे तंत्र वापरतात तशा प्रकारचे तंत्र भारतीय खेळाडूंनी वापरले पाहिजे. विशेषतः गावस्कर, वेंगसकर यांसारख्या फलंदाजांनी, ज्यांच्यावर संघाची मदार आहे, अशा फलंदाजांनी सुरवातीपासून फटकेबाजी करण्याचा धोका पत्करु नये. ऑस्ट्रेलिया, वेस्टइंडीज संघाच्या फलंदाजीवर दृष्टिक्षेप टाकला तर आपल्याला असे दिसून येईल की, त्यांचे सुरवातीचे तीन चार फलंदाज संयमाने खेळून चांगली सुरवात करून देतात व नंतरचे म्हणजे मधल्या फळीतील व तळाचे फलंदाज फटकेबाजी करून धावा वाढवितात. याउलट सुरवातीलाच भारताच्या विकेटी पडल्यावर मधल्या फळीतील फलंदाजांना मनमोकळी फलंदाजी करता येत नाही.


फलंदाजीप्रमाणे गोलंदाजीतला कमकुवतपणाही भारताच्या अपयशास कारणीभूत आहे एकटा कपिल-देवच काय तो प्रतिस्पर्धी फलंदाजाना रोखू शकतो, दिलीप दोशी हाही बऱ्याच प्रमाणात यशस्वी झालेला आहे. परंतु इतर गोलंदाजाबाबत असे म्हणता येणार नाही. आज आपल्याकडे कपिलच्या तोडीचा, त्याला साथ देईल असा गोलंदाज नाही. म्हणूनच पर्यायी मदनलाल व घावरी यांचा यशस्वी प्रयोग करता येतो. अशा सामन्यांकरता लिली–थॉमसन नाहीत तरी निदान कपिलच्या तोडीचे दोन तीन गोलंदाज आपल्या संघात असणे आवश्यक आहे, तरच आपण प्रतिस्पर्ध्याला आव्हान देऊ शकू.

क्षेत्ररक्षण सुद्धा या सामन्यांचा आत्मा असतो. जगातील प्रसिद्ध क्षेत्ररक्षक सुद्धा कधीतरी गचाळ क्षेत्र-रक्षण करत होते हे विसरून चालणार नाही. त्यामुळे प्रत्येक क्षेत्ररक्षकास योग्य व्यायाम व मार्गदर्शन देणे महत्त्वाचे असते. भारतात सोलकर, वेंकटराघवन व टायगर पतौडी यांसारखे क्षेत्ररक्षक होऊन गेले. त्यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरू शकेल. इतर देशांचा विचार करता रेण्डाल, गोबर, मियादाद, बिन्नी, मदनलाल व ग्रिनीज यांचे क्षेत्ररक्षण नेत्रदीपक आहे.

सध्याचा काळ अष्टपैलूंचा आहे. प्रत्येक संघात दोन तरी अष्टपैलू खेळाडू असणे आवश्यक आहे. बोथम, कपिलदेव, इमरानखान, रिचर्ड हैडली व जेफ मिलर हे जगातील सध्यातरी मान्यवर अष्टपैलू आहेत. पूर्वी विनू मांकड, केंन बॅरींग्टन, टोनी ग्रेग, रेईलिंगबर्थ, सोबर्स सलिम दुराणी सारखे अष्टपैलू कसोटीवीर होऊन गेले. आज आपल्या संघाला मदनलाल पुन्हा लाभला आहे. रवि शास्त्रीच्या रूपाने भरवशाचा ऑलराउण्डर मिळाला आहे. तर घावरी संघात स्थान मिळविण्यासाठी झटतो आहे

देशात सध्या देवधर व विल्स करंडक हे दोनच प्रमुख मर्यादित षटकांचे सामने खेळण्यात येतात. वर्षा-तून पाच ते सहा तरी असे सामने होणे महत्त्वाचे आहे. या सर्व स्पर्धा उत्तर भारतात थंड हवेच्या ठिकाणी व्हाव्य.त. म्हणजे खेळाडूंना थंड वातावरणाचा सराव होईल. व ते इंग्लंड, न्यूझीलंड व ऑस्ट्रेलियाच्या वातावरणाबद्दल तक्रार करणार नाहीत. देशातील गुणी खेळाडूंना संधी व प्रोत्साहन लाभणे महत्त्वाचे आहे. हे निवडसमितीवर अवलंबून आहे. भारत हा प्रचंड लोक-संख्येचा देश आहे. त्यामानाने शारीरिक व कौशल्यपूर्ण खेळ खेळणारे अनेक क्रिकेटपटू देशात उपलब्ध आहेत. फक्त खेळात राजकारण न आणता, वशिलेबाजी न करता सूज्ञपणे निवड करणे हे समितीला भूषणावह ठरेल. व त्यावर मर्यादित षटकांच्या सामन्यांतील भार-तीय संघाचे स्थान अवलंबून असेल.

# क्युबातील क्रांती



विजय इथापे, (तृतीय वर्ष शास्त्र)

बऱ्याच वेळेला अत्याचार, विषमता, कमालीचा भ्रष्टाचार, जबरदस्त जुलूम यांची परमावधी होते, जुलमी आणि मग्रूर सत्ताधाऱ्यांच्या वागणूकीने सामान्य जनता भरडून निघते आणि डोक्यात विस्तव पेटलेला एखादा तरुण अत्यंत आडदांड आणि शक्तिशाली राजवटीला उलथवून टाकतो. हातातल्या बंदुकीने सूड घेतो, याचे सर्वसाक्षी उदाहरण– क्युबन क्रांती आणि याचा जनक फिडेल कास्ट्रो ! आपल्याकडे अमिताभ बच्चनच्या नावाला जी प्रसिद्धी आहे, जे वलय आहे, अगदी तशीच स्थिती सध्या लॅटीन अमेरिकन तरुणांना फिडेल आणि चे गव्हेरा यांच्याबद्दल वाटते. जीर्ण झालेल्या जुनाट जीन्स आणि शर्टस्, वाढलेल्या दाढ्या आणि केस ही आजची फॅशन लॅटीन अमेरिकन क्रांति-पर्वातूनच निर्माण झाली आहे.

१९५३ पासून क्युबा म्हणजे भ्रष्टाचार, जुलूम असे समीकरणच बनत होतं. तत्कालीन राज्यकर्ते चैनीत आणि सुख–उपभोगात ग्रस्त होते. अमेरिकन भांडवल-दारांनी क्युबाची अर्थव्यवस्था जवळ जवळ नष्ट केली होती. असल्या निराशाजनक अवस्थेतच फिडेल आणि त्याची दोस्त कंपनी उदयाला आली. जबरदस्त शारी-रिक ताकद आणि झटकन छाप पाडणारं व्यक्तिमत्त्व ह्या फिडेलच्या गुणांमुळे तर त्याला मित्र मिळतच पण अत्यंत धाडसी स्वभाव आणि कमालीचा आत्मविश्वास यामुळे एकदा झालेले त्याचे दोस्त कायमचे अनुयायी बनत. महाविद्यालयात तो उत्तम खेळाडू आणि चांगला वक्ता होता. परिस्थितीच्या अपरिहार्यतेने तो राज-कारणात ओढला गेला.

त्याच्यावेळेचा क्युबन सत्ताधारी होता बाटिस्टा नावाचा सैतान. बाटिस्टाची सत्ता उलथवून टाकण्या-साठी फिडेलने एक अत्यंत धाडसी योजना आखली. त्याने आणखी काही पदवीधर आणि भडक माथ्याच्या दोस्तांना घेऊन जीप्स मधून बाटिस्टाच्या लष्करी छावणीवर एका पहाटे छुपा हल्ला केला. अपरिपक्वता आणि थोडासा निष्काळजीपणा यामुळे हा हल्ला फसला आणि बहुतेक तरुणांना गोळ्या घालण्यात आल्या. योगायोगाने कॅस्ट्रो वाचला पण त्याला शिक्षा झाली. तुरुंगातून सुटल्यानंतर त्याने दुप्पट जोमाने आपलं कार्य सुरू केलं. क्युबात हालचाली करणं कठीण आहे असं दिसताच त्याने मेक्सिको गाठलं !

मेक्सिकोमधे त्यानं आपल्या गुप्त कारवाया चालू केल्या. एका अंधाऱ्या रात्री त्याची गाठ पडली एका महान क्रांतिकारकाशी. चे गव्हेरा ! या दोघांनी मिळून अवघ्या दोन वर्षांत इतिहास घडवला आणि जगभरच्या क्रांतिकारकांचं लक्ष वेधून घेतलं. चे गव्हेरा हे क्रांति-कारकांचं आराध्य दैवत बनलं. स्फूर्तिस्थान ठरलं ! त्याच्या गूढ मृत्युनंतर तर तो अधिकच प्रसिद्ध पावला.

पिळवणूक, विषमता, दारिद्र्य यांची त्याला जबर-दस्त खंत वाटे. आदर्श क्रांतितत्त्वावर त्याची विलक्षण श्रद्धा होती. त्याच्या जोरावरच बोलिव्हीयाच्या जंगलात त्यानं हसत हसत छातीवर गोळ्या झेलल्या. विलक्षण मानसिक सामर्थ्य आणि इच्छाशक्ती यांच्या जोरावर त्यानं यश मिळवलं. वयाच्या अवघ्या दुसऱ्या वर्षापासून ते शेवटपर्यंत त्याला दम्याच्या जीवघेण्या व्याधीनं जर्जर केलं, पण त्यानं कधीच हार मानली नाही.

क्युबासाठी लढताना जंगलात, दऱ्याखोऱ्यांत, पावसात, गनिमीयुद्धात त्याचा जुनाट दमा उफाळून येई पण तशा खडतर अवस्थेत देखील त्याची बंदूक शत्रूवर सतत आग बरसत असे.

फिडेल कॉस्ट्रोने मेक्सिकोत क्रांतिकारक जमवून एका बोटीतून क्युबन किनाऱ्यावर पाय ठेवला तो बाटीस्टा घालवण्याच्या जिद्दीनेच ! पण क्रांतिकारकांच्या कारवायाचा तपास त्याला अगोदरच लागला आणि त्यानं मशीनगनच्या आणि बॉंब वर्षावाच्या सहाय्याने निम्म्याहून जास्त क्रांतिकारकांना किनाऱ्यावरच ठार केले. उरले फक्त बारा जण ! पण याच बारा जणांनी अकल्पितरीत्या अगदी चित्रपटात शोभाव्यात अशा हालचाली करून जबरदस्त हालअपेष्टा आणि संकटं सोसत आपलं संख्याबळ वाढवत अमेरिकन शस्त्रांनी सज्ज अशा बाटिस्टाच्या फौजेला धूळ चारली.

सिएरा मेस्त्रा नावाचा क्युबातील अत्यंत घनदाट प्रदेश क्रांतिकारकांच्या हालचालीचं प्रमुख केन्द्र बनलं. भूक, तहान, वादळ वारं आणि मधून मधून शत्रूसैन्याशी चकमकी अशा अवस्थेत देखील क्रांतिकारकांची जिद्द तिळभर देखील कमी झाली नव्हती. त्यातला एकही दुबळ्या मनाचा किंवा कच्च्या दिलाचा नव्हता !

खडतर परिस्थितीशी मुकाबला करत शस्त्रसाठा आणि क्रांतिकारक वाढवत फिडेलने बाटिस्टाशी शेवटची लढाई सुरू केली. सर्वसामान्य जनतेने फिडेलला भरघोस पाठिंबा दिला. फिडेल खराखुरा हिरो बनला. काळजीपूर्वक योजना आखून सर्वशक्तीनिशी त्यानं बाटिस्टाच्या लष्करी ठाण्यावर हल्ले चढविले आणि एका पाठोपाठ एक शहर जिंकण्यास सुरवात केली. हे अर्थातच जनतेच्या पाठिंब्यामुळे आणि क्रांतिकारकांच्या धैर्याने घडलं.

नेहमीच घडतं त्या प्रमाणे एका ढिल्या क्षणी बाटिस्टा पूर्ण शरण आला आणि अमेरिकेला निसटला. क्रांतिकारकांचा अंतिम विजय झाला, पण बाटिस्टा निघून गेला. विद्यापीठात शिकणाऱ्या एका वरवर क्षुद्र दिसणाऱ्या २७ वर्षाच्या एका तरुणाने हे करून दाखवलं. क्रांतीनंतर अर्थातच फिडेल जनतेचा उत्स्फूर्त नेता बनला. शेकडो जुलमी लष्करी अधिकाऱ्यांना त्यानं शिक्षा दिल्या. लोकांची आवडती दुसरी व्यक्ती म्हणजे चे गव्हेरा— वाढलेली दाढी, विस्कटलेले केस, ढगळ कपडे आणि खांद्यावर बंदूक ! फिडेलने आपल्या मंत्रिमंडळात त्याला मानाची जागा दिली पण विनम्रपणे त्यानं ती नाकारली. सुखविलास त्याच्या रक्तातच नसावा.

त्याच्या क्रांतीचं क्षेत्र फक्त क्युबनपुरतं मर्यादित नव्हतं. त्याला संपूर्ण लॅटीन अमेरिकेत क्रांती हवी होती. अशाच एका प्रयत्नात त्याची आहुती पडली. सगळीकडे दु:खाची छाया पसरली. जगभरच्या क्रांतिकारकांचं आशावादी ठिकाण संपलं ! फिडेलचा सच्चा दोस्त गेला.

फिडेल कास्ट्रोबद्दल बाबा आमटयांच्या एका पुस्तकात एक सुंदर उल्लेख आहे. पेरू मधल्या भूकंपाला अमेरिकेने भरपूर मदत दिली पण फिडेल कास्ट्रोने काय दिलं असेल ? त्यानं आपल्या मनगटावर जखम करून एक बाटलीभर रक्त दिलं. विमान भरभरून अमेरिकेची श्रीमंत मदत. तर एक बाटलीभर रक्ताची कास्ट्रोची मदत; काय श्रेष्ठ ?

# अशी ही भ्रमंती

**रोहिणी दिकसंगीकर**, प्रथम वर्ष साहित्य

दिवेलागणीच्या वेळी, एखाद्या ओढ्याकाठच्या गावी हळुवारपणे उतरणारी सांज तुम्ही पाहिली आहे का ? माळरानातील रानफुले तुम्हाला खुणावताना कधी दिसली आहेत का ? धो धो कोसळणाऱ्या पावसात मनसोक्त ओलेचिंब कधी झाला आहात का ? सांज-ऊन्हात झाडाझुडपातून डोकावणारा पहाडापलीकडे जाणारा लालधमक सूर्य तुम्ही पाहिला आहे का ? काळ्याभोर रात्री आकाशघुमटात विखुरलेली, प्राजक्ताच्या फुलासारखी पांढरीशुभ्र नक्षत्रे तुम्हांला डोळ्यात साठविता आली आहेत का ?

हे सर्व आम्ही या वर्षी केलेल्या पदभ्रमणात, किंवा भ्रमंतीत म्हणा, अनुभवले आहे. 'दुरुन डोंगर साजरे.' असं म्हणतात. पण मला हे खरे नाही वाटत ! डोंगर लांबून जेवढे भयानक दिसतात, त्याहून जवळ गेले की फार साधे, प्रेमळ वाटतात. म्हणूनच आम्ही अनेक डोंगरांवर प्रेमाने बागडलो.

पहिले पदभ्रमण होते लोहगड–विसापूर. पावसाळी दिवस. ढगाळ वातावरण. त्या धो धो पावसात चालताना मन आपोआप गाऊन उठते, 'ये रे घना ये रे घना, न्हाऊ घाल माझ्या मना.' समोरच्या डोंगरावरून नाचत खेळत उतरणारे पांढरेशुभ्र झरे पाहिले की मनात आपोआप फुले उमलू लागतात. काळ्यानिळ्या ढगांच्या त्या रुपेरी कडा पाहिल्या की मनाची तार हळूवार छेडली जाते. त्या धुकाळ ढगातून तरंगत जाताना आपण स्वत:मधेच हरवतो, नाहीतरी चार दोन फुटांपलीकडचे काही दिसतच नसते. त्या लाल मातीत लोळत असलेला पालापाचोळा तुडविताना बालपणीचे हट्ट आठवतात ! शाळेतील भूगोलाच्या सुस्त व रुक्ष तासांना कानावर आदळणारी भाताची रोपे, डोंगरशेती, कौलारू घरे नको वाटतात, पण येथील डोंगरशेती, भाताची रोपे आपणांस नैसर्गिकपणे भूगोल शिकवून जातात.

दुसरे पदभ्रमण होते कार्लामाथा ते तुंगार्ली लेक. पुन्हा तसाच पाऊस, धुके. प्रत्येकवेळी मार्ग काढणे जड जात होते. कार्लामाथ्यावरून जाताना डोंगराच्या दोन्ही बाजूला दोन तलाव दिसत होते. एक 'शिरोटा' लेक व दुसरे (?) शिरोटचाला शंकरपाळे व दुसऱ्याला जिलेबी लेक असे नामकरण आम्हीच करून टाकले. येथे तुमच्या ज्ञानाला खो देणारे कोणी नसते. डोंगरातल्या उभ्या कड्याच्या बाजूने येताना एक अप्रतिम दृश्य पाहावयास मिळाले. पावसाचे पाणी कड्यावर आपटत होते व त्यातून मोत्यासारखे पांढरे शुभ्र जलबिंदू निर्माण होऊन त्यांचा वर्षाव आमच्यावर होत होता, जणु आमच्यावर अभिषेकच ! त्यांना आपल्यात सामाऊन घेण्याची ओढ निर्माण होई. त्यांना आपल्यात सामाऊन घेता येईल का ? रानफुलांवर पडलेले जलबिंदू म्हणजे पळू पळू पहाणारे डोळेच, कळायच्या आतच विरघळून जाणारे !

तिसरे पदभ्रमण होते ड्युक्सनोज व टायगर्स लीप. पुन्हा धुके, ते दूर व्हावे म्हणून सारखी मनधरणी. पण आपल्या मनाची चाहूल त्याला लागत नसावी!

दुसऱ्या सत्रामध्ये दोन 'ओव्हरनाईट' ट्रेक्स झाल्या. ओव्हरनाईट ट्रेक्स म्हणजे थोडेसे त्रासदायकच पण जास्त आनंददायक सुद्धा. त्रासदायक म्हणजे आपल्याला

सामान जरा जास्त घ्यावे लागते. अंथरुण, पांघरुण, कपडे-भांडी, खाण्याचे जिन्नस वगैरे.

आम्ही विद्यापीठ आयोजित माझेरी ते महाबळेश्वर या तीन दिवसांच्या पदभ्रमणात भाग घेतला होता. वरंधा घाटावरच्या माझेरी गावापासून पदभ्रमणास सुरूवात. रात्र तिथेच शाळेच्या मैदानात काढली. आकाश-घुमटात पांढऱ्या शुभ्र फुलांप्रमाणे पसरलेले तारे पाहा-ताना, आम्ही आमच्या नक्षत्राविषयक ज्ञानात थोडी भर घातली. वरंधा घाटातल्या नागमोडी रस्त्यावरून मोटारींचे दिवे अजगरासारखे सरपटून जाताना मधून मधून दिसायचे. समोरच्या डोंगरावरील 'कावळे' कडा आपल्या एकाकी पणाची साक्ष पुरवित होता. एकेकाळी मावळे तेथून, चौफेर प्रदेशावर आपली कावळचाची नजर ठेवित असत. पण आता त्याचा काहीच उपयोग नव्हता. पण तो आता मात्र एकाकी व असहाय्यच पण भक्कम दिसत होता.

सकाळी चहा घेऊन निघालो. शिवथर, तळघर, कीय ही गावे पार करून पिंपळवाडीला आलो. समोरच ऊंच मंगलगड दिसत होता. सामान खालीच ठेऊन थोडासा अवघडच मंगलगड चढून आलो. परत येऊन खिचडी खाल्ली, जे आले नव्हते त्यांनी आमच्यासाठी तयार करून ठेवलेली. परत पदभ्रमण सुरू. संधि-प्रकाशाच्या वेळी आम्ही महादेवाचा मुरा गाठला. उंच डोंगरावरचे दोन-चार घरांचे गाव. आता दिवसभर चालून चांगलीच दमछाक झालेली. खाणे कोण शिज-विणार ? आमच्या बरोबरच्या ब्रेड व जामवर भाग-विले व उघड्यावरच झोपली. रात्री त्या खोडकर घनाला मस्ती आली आणि आमची थोडी धावपळ झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी चहा न घेताच निघण्याचा हुकूम झाला. खांद्यावर ओझे घेऊन निघालो. आठ वाजता एका नदीकाठी आलो व मग चहा, नाश्ता झाला, पुन्हा पैलतीरी निघालो ते (नदीमध्ये पाणी नव्हतेच !) अंधार होण्याच्या आत 'ऑर्थर सिट' गाठण्याचे उद्दिष्ट ठेऊनच. रखरखीत ऊन आपली चुणूक दाखवत होतं. भरमाध्यान्ही ऑर्थर सिटच्या जवळ पोचलो. फक्त एका अवघड डोंगराला वळसा घालून वर जायचे होते पण हाच आमच्या पदभ्रमणातला सर्वात अवघड टप्पा होता. या टप्प्यामध्ये नकळतच आमचे ग्रुप्स पडले. या ग्रुप्समध्येही कसल्याच प्रकारचा संपर्क राहिला नाही. आमचा ग्रूप वाट चुकला. आम्ही एका वळणावर येऊन थांबलो. आमच्या सरांचा ग्रूपही मागे राहिला होता सरांना खूप हाका मारल्या पण उत्तर... प्रतिध्वनी. सरांची शिट्टी वाजत होती का पक्षाची हे ओळखण्यासाठी सुद्धा मनाला ताण देववत नव्हता. आता मात्र दमछाक चांगलीच जाणवू लागली होती. काहीजणांचे तर पूर्ण अवसान संपले होते, पण आता परत फिरणेही शक्य नव्हते. तहानेने सर्व व्याकूळ झालेले पण पाणी नाही. तेवढ्यात सरांची हाक ऐकू आली व आमचा जीव भांड्यात पडला. ते सुद्धा चुकलेलेच. पुढे एका पठारावर पाणी दिसले, तिथेच मुक्काम करायचा ठरविले. आर्थर सिटचा बेत रहीतच. सांज चांगलीच उतरली होती. सूर्यास्ताचे मनोहारी दर्शन होत होते.

कशीबशी थोडीशी खिचडी खाल्ली आणि एकदाचे अंथरूणावर पडलो. रात्री बोचरा वारा. त्या उघड्या डोंगरावर थंडी वाजणारच, झोप कोणाला येणार ? समोर काजवे चमकत होते. त्यांना आपल्या तळहातावर घेऊन तुम्ही पाहिले आहे का ? किती शीतल व मृदु स्पर्श ! पारदर्शक हिरवागार थंड प्रकाश ! माणसाला असे पारदर्शक हिरवे डोळे असते तर माणसाचे मन पारदर्शक झाले असते का ? घनाला आज अक्कल आली असावी, पण त्या दवामुळे आमची अंथरूण पांघ-रुणे ओली होण्यास सुरूवात झालेली. थोड्या वेळातच मध्यरात्रीच्या नीरव शांततेचा भंग करायला एकेकाने सुरूवात केली. ट्रांझीस्टरवर अनामिक सूर वाजू लाग-तात. कोणाची शेकोटी पेटवायची सूचना, पण या कातरवेळी काटक्या गोळा करायला कोण जाणार ! कशीतरी शेकोटी पेटविली ! सर्वांना भूक आठवली, फक्त बटाटेच शिल्लक. तेच शिजवायला ठेवले आणि अर्धकच्च्या बटाट्यांची सुकी भाजी केली. शिल्लक असलेल्या थोड्या शेवेबरोबर बटाटा शेव खाल्ली. पण चहाचे काय ? साखर संपलेली. गुळ शोधून काढण्यात येतो पण त्या चहाची रबडी करून टाकली करणाऱ्याने. असा चहा कोण पिणार ? चहाला अमृततुल्य का म्हण-तात ते येथे चांगले समजले.

आता महाबळेश्वरची सर्वांनाच जबरदस्त ओढ लागलेली. लवकरच निघून तासाभरात शेवटचा अवघड

कडा चढून आर्थर सिटवर पाय टेकतो, आणि येवढा आनंद होतो की तेवढा त्या आर्थरला सुद्धा झाला नसेल. डांबरी रस्त्याने वेण्णा लेकपर्यंत येतो. डोंगरच्या कुशीतला तो तलाव, गर्द झाडी, उंच उभे सुरूचे वृक्ष निलगिरीचा वास आणि पहाडावरचे टुमदार बंगले पाहिले की येण्याचे सार्थक झाले, असे वाटले.

दुसरे दोन दिवसाचे पदभ्रमण होते सिंहगड ते राजगड. बसने सिंहगडला आलो. मागच्या महाबळेश्वरच्या आठवणीत सिंहगड बिचारा बापडा दिसला. टी. व्ही. टॉवरमुळे आपलेपणा हरविलेला ! भराभर चढलो, वर जाऊन जेवलो आणि कल्याण दरवाजाकडून राजगडच्या दिशेने चालू लागलो. एव्हाना संध्याकाळ होऊ लागली होती. सांजऊन्हामध्ये माळरानातील सोनेरी गवत चमकताना पाहून आणि झुणझुण्या वाऱ्याने कानात साद घातल्यावर हात पसरून पळत सुटावेसे वाटू लागले. रानमळ्यातील सावळी सूर्यफूले पाहून लोळावेसे वाटले. या फुलांना शहरातील बागा व फ्लॉवर शो मधील फुलांप्रमाणे हताशपणे पाहाण्याचा प्रश्नच नसतो. इथे तुम्ही लोळू शकता, बिलगू शकता, तुडवू शकता. ते तसेच उभे असतात, अनभिज्ञ, ग्रामकन्येच्या टपोऱ्या डोळ्यांतील प्रश्नचिन्हांसारखे !

उतरत्या सांजी, दिवेलागणीच्या वेळी, नदीकाठच्या राजगडाच्या पायथ्याशी असलेल्या 'गुंजावणी' गावी येऊन पोचलो. तेथेच उघड्यावर मुक्काम. सर्वजण दमलेले. रात्री पडल्यापडल्या गप्पा. समोरच राजगड आणि त्याच्या एका बाजूला मोठे खिंडार दिसत होते. त्यालाच हत्तीचा डोळा किंवा 'निडल्स होल' असे म्हणतात. उत्तररात्री दुरून भजनाचे सूर ऐकू येत होते व हे सूर आमच्या हृदयास भिडत होते. गावची नित्यकर्मे भल्या पहाटेच सुरू होतात.

प्रजासत्ताक दिनाच्या सकाळी राजगड चढायला सुरूवात करतो, आणि उगवत्या सूर्याबरोबर राजगडावरचा तिरंगा मुक्तपणे फडकताना पाहिला. पद्मावती माचीच्या चोर दरवाजातून राजगडावर प्रवेश. आम्ही मध्यभागी असलेल्या बालेकिल्ल्यावर जातो. वरून तिन्ही दिशेला तीन माच्या दिसतात–संजीवनी, सुवेळा आणि पद्मावती. जणु त्रिकोणाची तीन टोके पण समोरच तोरणा आणि त्याच्या डाव्या बाजूला भाटघर जलाशय दिसत होते. पाण्याचे दर्शनच किती आल्हाददायक असते नाही का ! बालेकिल्ला उतरून सुवेळा माचीवर जातो. हत्तीच्या आकाराच्या कड्यावर येतो आणि हत्तीच्या डोळ्यात (हेच ते खिंडार !) बसून ऐलतील–पैलतीर पाहातो.

पुन्हा पद्मावती माचीकडे यायला निघतो. सर्वांमध्ये एकप्रकारचा मुक्तपणा निर्माण होतो. काहींच्या मनात आपणच शिवाजी असल्याचे वारे वाहू लागतात. काहींना 'लढाईचा' मूड येतो, तर काहीजण आपलीच आगगाडी बनवितात. मुक्त स्वच्छंद जीवन, हेच खरे स्वातंत्र्य !

तिरंग्याला शेवटचा सलाम ठोकून 'मार्गासनी'ला येतो. तेथून ट्रकने शहरात येतो. आतापर्यंत मनात बहरलेल्या बागेतून एक एक फुल कोमेजून हातात पडायला सुरुवात !

# ना ना ना

तिमिरातच राहिलो, प्रकाश साहवे ना
दु:खे किती भोगली, सुख आता पाहवे ना
काटे किती बोचले, फूलही जाणवे ना

निराशाच सर्व पाहिली, आशा आता कळे ना
अभागीच मी राहिलो, भाग्यही मिळे ना
कितीदा मनाने मेलो, भयही राहि ना.

संजय देशपांडे, तृ. व. वाणिज्य

# ' राजा, मेरा गाँव '

– प्रेमलता वि. चव्हाण, प्रथम वर्ष साहित्य

चित्रपट का गीत हो या कोई लोकगीत या किसी हिन्दी साहित्यकारों कि रचनाएँ वे यदि किसी गाँव का काव्य बिम्ब उभारती हैं तो मैं अपने गाँव की स्मृतियों में खो जाती हूँ।

पहाडियों की ढलान पर मेरा गाँव बसा है। कई मीलों तक वह लैण्डस्केप देखा जा सकता है। गाँव की ओर हर आनेवाले का मन किसी भी वाहन की गति की अपेक्षा क्षिप्र गति से गाँव की ओर दौडता है।

प्रातःकाल का समय जितना सुनहरा, मनोरम, एवं मनोहारी होता है, उतना ही शाम का शीतल, जैसे देखनेवाला बहुत शीत पेय पी गया हो।

धीरे धीरे सूर्य किरणें धरती पर पाँव धरती है। कवि तो इस समय सूर्य प्रियाओं की पायलों की रुनझुन सुनता है। जैसे किरणें पाँश्व धराती हैं वैसे धरती का रंग तलुओं के लाल रंग सा हो जाता है। मेरा गाँव तो अब केसर की क्यारियों में सजा लगता है। गाँव का घर–घर मानो कंचन के पानी में डुबकर सुनहर, चमकीला हो जाता है। पौधों–पौधों, पेड–पेड पर के फूलों का क्या कहना जैसे वे डाल की डोली में बैठे हों और उषा ने अभी–अभी चूमने के कारण लजाते, खिलते हो।

इधर गाँव की कुमारिकाएँ–गोरियाँ गीत गा–गा कर सरसों की गोद भरती हैं। बसंत की सुबह इनके लिए तो सपनों के साकार होते देखने की होती है। दूर से कोई अथितेय राजा दिखाई दें तो इन के गाल ऐसे लाल–लाल हो जाते हैं कि भँवरों ने इन के गालों को चूम लिया हो।

मेरे गाँव से बहनेवाली हवा की तो सुनो! ' कसम रूप की, कसम प्रेम की, कसम इस हृदय की, सुनो बात मेरी–मैं अनोखी हवा हूँ, बडी बावली हूँ। बडी मस्त–मोला हूँ, बेफिक्र हूँ। बडी निडर हूँ जिधर चाहूँ उधर घुमती हूँ। जहाँ से चलती हूँ सब को झुलाती हूँ। पहर दो पहर क्या अनेकों पहर तक मैं इसी में रहती हूँ। मुझे तो कईं बार खूब सूझता है। कहीं अलसी के शीश पर कलसी देखी कि उसे हिलाती–डुलाती हूँ। कभी महुआ पर चढती हूँ तो कभी थपाथप मचाती हूँ। धम्म से गिरती भी हूँ। खेतों में पहुँचकर लहर भी खूब मारती हूँ।

मेरे गाँव की हवा की बात सुन ली ?

गाँव की गोरियों को तो देखो! हाय! हाय! जी मचल जाएगा। गोरी का सौंदर्य किसी का भी जी मोह लेता है। वह आषाढ की घटा की सी है। उस की चाल तो देखो। कैसे इठलाती आती है। कभी वह अपना आँचल सरकाती है तो कभी अपनी लट खिसकाती है। कितनी चंचल! चितवन! ओ हो! विशाल नीले सागर पर दो हंस-पंछी प्रेम की उडान भर रहे हो। कभी इस दिशा में तो कभी! न जाने किस दिशा में। देखते–देखते न जाने किन लता–वृक्षों में वह अदृश्य हो जाती है।

आज मैं कई दिनों के बाद अपने गाँव आयी हूँ। मैं ही अपने आपको पहाडियों की ढलान पर उतरती चढती देख रही हूँ। मन तो चाहता है कि गाँव को पहाडियों के साथ अपने आँचल में उठा लूं। खेलूं खिलाऊँ।

आज मैं बहुत दिनों के बाद लहलहाती–सुनहली फसलों की मुसकान देख रही हूँ। मुसकान भी कितनी आत्मीय, जानी पहचानी है। बदन में एक थिरकब थिरक जाती है। धान कूटती किशोरियों की कोकीळ कंठी तान भी मैं आज जी भर सुन रही हूँ। फूलों को भी मैं जी भर सूंघ रही हूँ। शहर की ओर जाने वाली वह पगडंडी आज मुझे फिर गाँव की गोरी में ढाल रही है। उसकी चंदनवर्णी धूळ को मैं जी भर छू रही हूँ। फलों–कों जी भर चूसा, गन्नों के रस को जी भर पीया। शब्द, रस, गंध, स्पर्श और क्या रूप मैंने जी भर भोगा। मैं फिर गाँव की हो गयी कितने दिनों के बाद ' बाबुल ' से...!!

# साद देती हिमशिखरे

यशोधन बाळ, द्वितीय वर्ष वाणिज्य

आपल्या समजुतीपेक्षा हिमालयातलं ट्रेकिंग आणि माऊंटेनिअरिंग यांत खूप फरक आहे. हिमालयात म्हणजे मुख्यत: काश्मीर किंवा कुलू–मनालीत आमच्यासारखे ' भटके ' ट्रेकिंगला जातात. हिमालयात ट्रेकिंग हे एक साहस आणि काहीतरी वेगळं असं आहे. निसर्गसौंदर्य अर्थातच हिमाचल प्रदेशपेक्षा काश्मीरमध्ये जास्त आहे. पण संपूर्ण हिमालय हा अर्थातच सौंदर्यपूर्ण आहे आपल्याला जास्तीत जास्त बारा ते तेरा हजार फुटांपर्यंत जाता येतं. कारण त्यापुढे वर्षभर बर्फ असतं आणि त्यामुळेच १३०० फुटांनंतरचा भाग तितकासा सोपा नसतो. पण आपण आपलं त्याखालच्या भागात मनसोक्त भटकावं– हे अगदी सोपं असतं– म्हणजे आपण हिन्दी चित्रपटात ज्याला ' वादी ' म्हणतो ना अशाच भागात भटकायचं. अतिशय नयनरम्य परिसर असतो. पायाखाली तीन ते चार फूट रुंद पाऊलवाट असते. त्यावर बर्फ नसल्यानं घसरून पडायची भीती नसते. पायाखाली पाऊलवाट आणि डोक्यावर प्रचंड वृक्षांची सावली असते. या वृक्षांमध्ये आपल्याला सहसा कधीही न दिसणारे अनेक रंगी अनेक पक्षी असतात. आपल्याला चालायला हेच पक्षी ' रिदम' देत असतात. पण अशातच कधी कधी जरा जास्त चढ येतो आणि त्यावेळी त्या ' वादी'तून खळाळणारा ' झरना ' आपल्याला सुरेख साथ–संगत करतो.

गेल्या मे महिन्यात मी कॅम्प लीडर म्हणून ' कुलू–मनाली'ला ट्रेकिंगला गेलो होतो. आमचा बेस कॅम्प ' रायसन ' इथे होता. हे कुलू–मनाली हायवेवरचं ब-यापैकी गाव. तिथून आम्ही गेलो ' जाना ' नावाच्या गावी. ' जाना ' पर्यन्तचा रस्ता आमच्या माहितीप्रमाणे फक्त ' आठ ते नऊ कि. मी. चा होता, आणि प्रत्यक्षातही होता. पण चढ ? चढाचा जर विचार केला तर सलग चार ते पाच वेळा सिंहगड इतकं अंतर होतं. कारण अवघ्या सात किलोमीटरमध्ये साडेतीन हजार फूट चढण होती. पण या चढापेक्षा आमचा उत्साह जास्त होता. त्यामुळे मजा आली. सुरुवातीपासूनच अतिशय गर्द अशी वृक्षांची दाटी होती. त्यातून ' आलेखा ' सारखी वर जाणारी वाट होती. सोबतीलाही निसर्गच होता. म्हणजे पक्ष्यांचं काव्यगायन आणि त्याला नदीचं पार्श्वसंगीत. पोचल्यावर जेवण केलं आणि गाणी गुणगुणत झोपलोही.

दुसऱ्या दिवशी अगदी पहाटेच म्हणजे पाचच्या सुमारास निघालो. सुरुवातीला आमच्या भाषेत ' हायवे' म्हणजे अगदी सरळसपाट रस्ता होता. त्यामुळे वॉर्मअप झालो आणि एकदम तीन हजार फूट चढण सुरू झाली. चढावरची माकडं आणि त्यांच्या चेष्टा होईपर्यंत आम्ही साडेदहा हजार फूटांवरच्या ' ब्रिग्टा ' नावाच्या खिंडीत होतो. खिंड म्हणजे काय तर दोन दऱ्यांना जोडणाऱ्या डोंगरमाथ्यावर आम्ही होतो. वारा भणभणत होता. आम्ही निसर्ग पाहात होतो. नजर खाली गेली आणि थेट पाच हजार फूट खाली वाहणारा ' पार्वती ' नदीचा ' ओघळ ' आम्हाला दिसला. आता आमचा पुढचा मुक्काम होता ' मनीकर्ण ' या गरम पाण्याच्या कुंडांजवळ. आम्ही पाच हजार फूट खाली निघालो. आता मात्र फक्त डोंगर पाठीशी होता आणि झाडी नाहीशी झाली होती. आपल्या इथल्या हिवाळ्या-

तल्या उन्हासारखं ऊन होतं. आम्ही खाली चाललो होतो. थोडंच अंतर बाकी होतं आणि तो 'ओघळ' आता नदीचं अक्राळविक्राळ रूप धारण करत होता. 'मनीकर्ण' मध्ये आम्ही पोचलो. पण "मी एवढी थंड असताना ही माझ्या काठावरची पाण्याची कुंड गरम का ?" असं म्हणून रागावलेली नदी एकमेकांचं बोलणंही ऐकू येऊ देत नव्हती. खरंच, 'मनीकर्ण' म्हणजे एक आश्चर्य आहे. एवढा थंड प्रदेश, इतर पाणी एवढं थंड, हिवाळ्यात याचाच बर्फ होतो पण त्याचवेळी कुंडांमधलं पाणी मात्र १०० अंश सेंटीग्रेडच्या वरच. माझ्या सारख्यांनी त्याच्यावर विचार करून काहीच फायदा नव्हता. मग आम्ही गुरूद्वारात जाऊन सुरेख जेवण केलं आणि त्यासाठी आम्ही डोक्यावर वस्त्र घेऊन किंमत मोजली. दिवस मजेत 'चालत' होते.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणेच पहाटे सुरुवात केली. आज पाच हजार फूट ते आठ हजार आठशे फुटांवरचं मलाना गाठायचं होतं. निघालो चढण भारी होती. निसर्गसौंदर्य अप्रतिम होतं आणि थंडीही बोचत होती. 'मलाना'त पोचलो आणि गावचा अजब इतिहास, त्याच्या परंपरा समजल्या. अजब परंपरा किंवा रूढी म्हणजे अशा की, गावात 'चामडं' हा प्रकार चालत नाही. म्हणजे अर्थातच 'मेलेलं कातडं'. जर कोणाकडे 'चामडं' मिळालं तर नगद १८० ते २०० रुपये म्हणजे अर्थातच एका बोकडाच्या बळीची किंमत गावच्या प्रधानाकडे जमा करायची. दुसरी गोष्ट अशी की गावात कोणीही हात मागे बांधायचे नाहीत.

हात मागे याचा अर्थ 'कामचुकार' आणि असा 'कामचुकार' पणा केला तर पुन्हा नगद एक बोकड, आणि तुम्ही दोन्ही चुका केल्यात पण बोकड दिला नाहीत, तर 'तुमचं कातडं गावच्या देवीला' ते लोक वाहाणार याची खात्री बाळगायची.

पण सुदैवाने आमचं कातडं आमच्या बरोबर घेऊन दुसऱ्या दिवशी आम्ही 'चंद्रखणी पास' या साडेबारा हजार फुटांवरच्या खिंडीकडे निघालो. चढण नेहमी सारखीच होती पण आता आम्ही सराईत होतो. आज आमचे कपडे आणि इतर काही गोष्टी थोड्या बदलल्या होत्या, कारण आज आमच्या वाटेत बर्फ होतं. आम्ही बारा वाजता बर्फात पोचलो. आणि मग पूर्णपणे बागडायला सुरुवात झाली. तीन-साडेतीन तास गोळे, मारामारी, ग्लेस्लायडींग, स्केटींग असे फिलमी प्रकार करून चार वाजता पुढे निघालो. आता मात्र सर्व उतरण होती. आता साडेबारा हजार ते पाच हजार फूट म्हणजे गुडघ्यांची बोंब. झोंबणारी थंडी, प्रचंड उतरण आणि पाठीवर पंचवीस किलोचं वजन, त्यामुळे 'गुडघे' करकरत निदर्शन करायला लागले होते. पण आमची भटकंती संपत आली होती. समोर थोड्याच अंतरावर आम्ही जिथून सुरुवात केली ते 'रायसन' दिसायला लागलं.

आम्ही इतके दिवस ज्याच्या सहवासात होतो त्या वृक्षांची पानं सळसळत 'हळहळ' दर्शवत होती. पक्षी आर्त स्वरांत अलविदा करत होते. खळखळणाऱ्या पाण्याचा आवाज सवयीमुळेच पण 'शांत' होता. आपण त्यांना सोडून जाणार म्हणून मनात विचार घोळत होते, 'अरे एवढे खिन्न कशाला होता ? परत एकदा तरी येणार ही खात्री आहे आता.'

*

# स्मृती

शब्दांना रंग
अनुभवांचा गंध
हृदयातील लाटांचा
फुटला बंध

स्मृतींची शाई
शब्दांची घाई
आठवणींने तुझ्या
रडतो मीं आई

सुखातील पानें
ओलीच लोचनें
डोळ्यांतील अश्रूंनी
झालो मी अंध

**अशोक भालेराव, तृ. व. शास्त्र**

# " AN INTRODUCTION TO MICRO-COMPUTER "

Ashokkumar Nikam, M. Com. Part-II.

There is an enormous amount of literature available on ' Micro-Computers '. A small fraction of it has been collected and is being presented here for the benefit of the readers. It is a moderate effort to introduce the latest developments in the field of Micro-Computer.

This is a rapidly developing field. Many **of the routine activities in to-day's society** are being performed by computers. For example, when we go on holiday our plane seats are often reserved by computers, the traffic in some major cities is to a degree controlled by computers, the eggs which you might have had for breakfast may have been laid ( no, not by computer ! ) by a hen whose life history is on record on a computer file; many of the bills we pay ( rates, gas, electricity, telephone, insurance etc.) are calculated and printed by a computer.

As the name implies, a Micro-Computer is essentially a small and inexpensive computer. Micro-Computer is nothing but just like a T. V. Set but with the key-board. However, another implication of this word is that the heart of the Micro-Computer is a micro-processor. In fact, both these connotations are true in today's micro-computer scene. Micro-Computer is a device which must be capable of :—

i ) receiving input ( date and instructions )
ii ) performing computations ( arithmatic and logical ).
iii ) storing date and instructions.
iv ) displaying the results of any computations; and
v ) controlling all the devices that perform the above mentioned four tasks ( directly and indirectly ).

A device which enables a micro-computer to perform the first task is known as an input device. Typical input devices used are keyboards, paper tape-readers and toggle switches. A device which performs the second task is known as Arithmatic Logic Unit. In micro-computers, this task together with control ( task-V above ) is performed, generally by a singlechip micro-computer.

Storage of date and instructions is accomplished using memories. Several types of memories are in use. Semiconductor memories, which are fast, are the most commonly used ones. Cassettes and floppy disks are used together which Semiconductor memories in relatively large micro-computers.

The fourth task of displaying the results is done by out-put devices. The commonly used output devices are character printers, cothode ray tubes displays and light emittings diodes.

The above micro-computer developed by ' Hindustan computers Ltd.' is in the market. These computers have got such a simple operating system that even a typist can operate them.

**Floppy Disk :** The floppy disk is a compartively new storage device which has yet to pe developed fully. It is a small random access disk which, like all secondary storage devices, can be used both for input and output operations. Information is held on a flexible disk, encased in a cartridge about 8 inches square. The cartridge is rea-

dilly loaded into, unloaded from a drive unit. It is a law cost device particularly suited to supporting micro-computer system. Its storage capacity is small compared with other conventional disk devices, but impressive for its size. Typically the floppy disk has about 70 tracks on which information is stored, giving a capacity of between 2.50,000 and 5,00,000 characters. ( equivalent to 3,000 to 5,000 fully punched cards ).

**Programming Language** : BASIC ( Beginners All-purpose Symbolic Instruction Code ) is a high level language. The vocabulary of a programming language is limited to a small number of keywords ( commands ). The format and use of each command is governed by a set of precise rules and a programmer is forced to work withing this frame-work. In case of BASIC the syntax is simpler than that of most other programming languages. There are fewer keywords and constraints on their use. BASIC is a straightforward language which can be used very effectively without the need for developing the programming techniques associated with the efficient uses of so many other languages.

**Summary of BASIC Commands :–**

| Statement. | Function. |
|---|---|
| DATA | : Directs data to a block of store doing the compilation of the program so that the data is accessible when the program is executed. |
| GO TO | : Transfers control to a specified line number, thereby interupting the numbered sequence. |
| LET | : Assigns a value during program execution. |
| INPUT | : Enters data during program execution. At the command INPUT the program prints a question mark and waits for an item of information to be entered. |
| PRINT | : Prints out information. |
| READ | : Assigns values from the data block to the variables listed by the statement. |
| REM | : Insert remarks for the purpose of documenting the program. The statement is not an insruction which requires any action to be taken i. e. it is non-executable. |
| END | : Indicates the conclusion of the set of instructions and terminates program in execution. |

**Programme : ' Testing Operator Efficiency '**

```
1 REM ** TESTING OPERATOR EFFICIENCY
2 INPUT " DATE "; "TIME STARTED" " YOUR NAME "
3 OPEN "R", 1 "O PRATOR FIL"
4 FIELD 1, 8 As A(1), 8 As A (2)-A (10)
5 INPUT "NOS TO BE ENTERED"; K
6 FOR N=1 to K
7 LPRINT : LPRINT
8 INPUT "NOS IS"; y "END TIME"; E "TIME TAKEN"; M
9 KDPH : (EN - S W) 60/M
10 LPRINT "DATA"; DS/------ "TIME TAKEN (MIN)"; M
11 LPRINT "OPERATOR NAME"; N
12 LPRINT "ENTREES": K, "MISTAKES", W : "KEYDEP"; EN : "KDP" "EFFICIENCY" E
13 LPRINT, 14 END, 15 LPRINT : LPRINT" END OF JOB"
```

The number of computers in use in India is now more than a thousand——including 350 large systems and 700 mini and micro–computers. 60% of these compters are India-made; while 40% are imported. Another 500 computers–mostly in the mini and micro series–are likely to be installed during the current financial year. One company– " Hindustan Computers Ltd " alone is expected to produce 200 computers during the year.

The prices of mini and micro-computers range from Rs. 3 lakhs each to Rs. 10 lakhs each. Among the States, Maharashtra has the largast number of computers in use. Most of the computers in Bombay and neighbouring areas are being used for commercial purposes, while in New Delhi quite a few are being used by the Government Departments and public sector undertakings.

# मनोविकृती : प्रवाद आणि वास्तवता

सविता जोशी, मनीषा लेले, (११ वी साहित्य, ब.)

मनोविकृती किंवा अपसामान्याचे शास्त्र (अॅबनॉर्मल सायकॉलॉजी) ही मानसशास्त्राची उपयोजित शाखा मानण्यात येते आधुनिक काळात दैनंदिन जीवनातील मानसशास्त्राचे स्थान सर्वांना पटले आहे. अमेरिकेसारख्या विकसित, पाश्चिमात्य देशात तर याचे महत्त्व पराकोटीला पोहोचलेले आहे. पाश्चिमात्य देशात भौतिक सुखांची कमतरता मुळीच नाही. तेथे सर्व सुखसोयी, पैसा माणसापुढे हात जोडून उभे आहेत, पण तरीही तेथील माणसांना मानसिक स्वास्थ लाभत नाही. वास्तविक जेथे शारीरिक सुखसोयी आहेत तेथे मानसिक स्वास्थ्यही असायला हवे. पण पैशाने ही सुखे लाभतातच असे नाही. आधुनिक युगात शास्त्रीय प्रगती खूपच झालेली आहे. नवनवीन यंत्र–तंत्रज्ञानाचे शोध लागत आहेत. पण जर माणसाचे मन प्रसन्न, उत्साही व निरोगी असेल तरच या इतर गोष्टींना काही अर्थ आहे. आपल्याकडे जसा कुटुंबाचा डॉक्टर ठरलेला असतो तसा पाश्चिमात्य देशात कुटुंबाचा मानसोपचारतज्ज्ञ ठरलेला असतो. यावरून तेथील मनोविकृतींचे प्रमाण लक्षात येईल.

सामान्य माणसाच्या दृष्टिकोनातून बघितल्यास मनोविकृतिशास्त्राबद्दल अनेक गैरसमजुती असल्याचे दिसून येईल. विशेषत: इतिहासातील उदाहरणे व साहित्यातून वाचलेल्या अशा गोष्टी यांमुळे या गैरसमजुती वाढल्याचे आढळून येईल. वाङ्मयात अशा गोष्टींचे दाखले दिलेले असतात व त्या गोष्टी अतिरंजित करून रंगविलेल्या असतात, त्यामुळे आपल्या मनात निष्कारण भीती उभी राहते व गैरसमजुती वाढतात.

विसाव्या शतकात बऱ्याच व्यक्तींना स्वत:च्याच मानसिक आरोग्याविषयी शंका येऊ लागल्या आहेत. 'मी सोडून प्रत्येकजण चांगला आहे' असे सर्वांना वाटू लागले आहे. सामान्य (नॉर्मल) असणे, या संबंधी प्रत्येकाच्या मनात जी व्याख्या असते त्यानुसार आपले वर्तन आहे किंवा नाही यासंबंधी प्रत्येकजण जरूरीपेक्षा जास्त जागरूक राहू लागला आहे. खरे म्हणजे, प्रत्येकाजवळ आपण संपूर्णपणे सामान्य व्यक्तित्वाच्या निकषात बसत आहोत असा आत्मविश्वास असणे आवश्यक आहे. ही प्रत्येकाच्या मनातील भीती निरर्थक आहे.

बऱ्याचवेळा असेही आढळते की, सर्वसामान्य व्यक्ती जितक्या सहजपणे शारीरिक इलाजांसाठी डॉक्टरकडे जातात तितक्या सहजपणे मानसिक इलाजांसाठी जात नाहीत. मानसिक विकृती हा एक कलंक आहे अशी लोकांची समजूत असते. खरे म्हणजे, एखाद्या मानसिक विकृतीला ती विशिष्ट व्यक्तीच संपूर्णपणे जबाबदार नसते. समाजातील व्यक्तींचा, अनुवंशाचा व परिस्थितीचाही दोष थोडाफार असतोच.

लोकांची अशीही समजूत असते की, मनोरुग्णालयामध्ये राहणारे सर्वच मानसिक रोगी हे काहीतरी विलक्षण, वेडयासारख्या कृती करीत असतात. त्यांना वेळकाळचे भान नसते. पण हा एक गैरसमज आहे. मानसिक रोगी हे आपल्याला होणाऱ्या मानसिक त्रासाविषयी, औषधोपचारांविषयी डॉक्टरांशी सहजपणे बोलू शकतात. त्यांना आपण कुठे आहोत, आजूबाजूला काय चालले आहे याचे भान बरेचदा असते.

मानसिक रोगांविषयी आणखी एक गैरसमज म्हणजे सामान्य व्यक्ती आणि अपसामान्य व्यक्ती यांच्यात खूपच फरक असतो व अपसामान्य व्यक्ती सहज ओळखू येऊ शकतात. परंतु हे सत्य नाही. मानसिक विकृती असलेल्या बऱ्याच व्यक्ती स्वत:ला समाजात समायोजित करू शकतात. एखाद्या गटात जर एखादी मनोविकृत व्यक्ती असेल तर ती ओळखू येणे सहज शक्य असतेच असे नाही. त्या व्यक्तीच्या विकृतीचा आपल्याला अनुभव आला तरच आपण असे म्हणू शकतो. ज्या

व्यक्तीच्या मनोविकृतीचे प्रमाण तीव्र असते त्यांनाच मनोरुग्णालयात ठेवावे लागते.

मानसिक विकृती आनुवंशिक असते अशीही एक समजूत असते. त्यामुळे घराण्यात एखादी व्यक्ती जर मानसिक रोगी असेल तर त्या व्यक्तीशी संबंधित एखाद्या व्यक्तीशी लग्नासारखे संबंध जुळवायला लोक तयार नसतात, कारण त्यांची मुलेही अशीच निपजतील अशी भीती त्यांच्या मनात असते. पण यात संपूर्ण तथ्य नाही. एखादी अशी व्यक्ती आढळलीच तर तिची विकृती ही अनुवंश आणि परिस्थिती यांच्या संयुक्त परिणामावर अवलंबून असते.

असाही एक प्रवाद आहे की, ज्या व्यक्ती अती-बुद्धिमान किंवा प्रतिभाशाली असतात त्यांच्यात एखादी मानसिक विकृती सापडतेच. निसबेट व इतर लेख-कांनी इतिहासातील अशा व्यक्तींची उदाहरणे देऊन या गैरसमजुतीला पाठबळ दिले आहे. परंतु प्रायोगिक अभ्यास करता यात बहुतांशी तथ्य नाही असे आढळून आले आहे. यामागचे शास्त्रीय कारण असे की, इतर सामान्य व्यक्तींच्या समाजात अशा प्रतिभाशाली व्यक्तींचे समायोजन होणे कठीण पडते. त्या व्यक्ती-सारख्याच इतर व्यक्ती असलेल्या गटात ती व्यक्ती सहज सामावू शकते.

याबाबतची आणखी एक गैरसमजूत अशी की, मानसिक विकृती हा एक असाध्य रोग आहे. ज्या व्यक्ती रुग्णालयातून पूर्णपणे पूर्ववत होऊन येतात, त्यांच्या वर्तनाबाबत संशय घेतला जातो. त्यांच्याकडे बघताना पूर्वग्रह दूषित दृष्टीकोन ठेवला जातो; ही समजूत अतिशय चुकीची आहे व त्यामुळे अनेक धोके उत्पन्न होऊ शकतात. त्या व्यक्तीमध्ये न्यूनगंड निर्माण होतो व त्या व्यक्ती समाजात नीट समायोजित होऊ शकत नाहीत. वास्तविक मानसिक रोग्यांपैकी ७० ते ८० टक्के रोगी पूर्णपणे बरे होऊ शकतात. त्यामुळे ही समजूत फारशी बरोबर नाही.

अशा तऱ्हेने मनोविकृतशास्त्र ही अनेक गैरसमजुतींना बळी पडलेली शाखा आहे. आधुनिक युगात त्याचा अधिकाधिक, सखोल अभ्यास केला जात आहे. लोकांच्या मनातील गैरसमजुती दूर व्हाव्यात यासाठी प्रयत्न केले जात आहेत. पण त्यासाठी समाजाने सहकार्य देणे आवश्यक आहे. पण सामान्य मानवापेक्षा मनोवैज्ञानिकांचे विकृततेविषयी काय दृष्टिकोन आहेत हे बघणे आव-श्यक आहे. विकृततेची विशिष्ट अशी व्याख्या करता येत नाही. मानसशास्त्रज्ञांनी त्यासाठी काही निकष लावले आहेत.

(१) संख्याशास्त्रीय निकष :– बहुजन समाजापासून ज्या व्यक्तींचे वर्तनात्मक विचलन झालेले असते त्या व्यक्ती अपसामान्य होत. या दृष्टीने बघितल्यास एखादी प्रतिभावान व्यक्तीसुद्धा एखाद्या मनोविकृत व्यक्ती-इतकीच अपसामान्य ठरते कारण ती चारचौघांपासून वेगळी असते. एखादी प्रामाणिक व्यक्ती अप्रामाणिक व्यक्तींच्या गटात अपसामान्य ठरते. आज जिला आपण सामान्य म्हणतो ती व्यक्ती पुढच्या काळात इतर व्यक्तींच्या पार्श्वभूमीवर अपसामान्य ठरू शकते.

(२) व्यक्तिगत समायोजन :– माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. तो समाजातच आपले जीवन जगत असतो. त्यामुळे समाजात प्रत्येकाने आपले समायोजन करणे आवश्यक असते. ज्या व्यक्ती विषमसमायोजित अस-तात त्या अपसामान्य ठरतात. त्या सतत आपली संर-क्षण यंत्रणा वापरतात, त्यामुळे त्यांचा वास्तवतेशी संबंध तुटतो.

(३) व्यक्तित्वसंघटन :– सामान्य व्यक्तीच्या व्यक्तित्वात अनेक मूलगुणांचे संघटन झालेले असते. अपसामान्य व्यक्तीमध्ये देखील असे मूलगुण असतात, पण त्यांचे संघटन विस्कळीतपणे झालेले असते. व्यक्तीच्या भावना, प्रेरणा विचार व तिची कृती यांच्यात सुसूत्रता असावी लागते. व्यक्तीच्या मनातील संघर्षाचा परिणाम तिच्या वर्तनावर पडतो. तो जर जास्त प्रमाणात पडला तर ती व्यक्ती अपसामान्य ठरू शकते.

(४) व्यक्तिगत प्रगल्भता आणि विकास :–व्यक्तीची वाढ ही जन्मपूर्व अवस्थेपासून सुरू होते. जरी प्रत्ये-काच्या वाढीचा वेग भिन्न असला तरीही प्रत्येकाकडून प्रत्येक अवस्थेची वैयक्तिक कार्ये पार पाडली जाणे आवश्यक असते. काही विशिष्ट वयानंतर व्यक्तीत प्रगल्भता येणे आवश्यक असते. ती जर आली नाही, कालिक वयाबरोबरच मानसिक वय वाढले नाही तर व्यक्ती अपसामान्य ठरू शकते.

अशा तऱ्हेने आधुनिक काळात गैरसमजुतींना बळी न पडता हे शास्त्रीय निकष लावूनच व्यक्ती विकृत आहे किंवा नाही हे ठरविले जावे.

# वृत्तपत्रे : शोध व बोध

विवेक भालेराव, संतोष शर्मा व चंद्रशेखर कन्हाडकर, प्रथम वर्ष वाणिज्य

" वृत्तपत्रे ही समाजाची रखवालदार आहेत " असे कोणीसे म्हटले आहे त्यात थोडीही चूक नाही. एखादे दिवशी वर्तमानपत्र आले नाही तर आपल्याला काहीतरी नित्यकर्म राहिलेले आहे असे वाटत राहते. वृत्तपत्र हा आपल्या जीवनाचा एक अविभाज्य घटक बनलेला आहे. सरकार, संसद व न्यायालये हे लोकशाहीचे तीन आधारस्तंभ आणि चौथा आधारस्तंभ म्हणजे वृत्तपत्रे. म्हणूनच कॉमर्स असोसिएशनने जेव्हा ' प्रकल्प अहवाल स्पर्धा ' जाहीर केली तेव्हा आमच्या डोळ्यांपुढे पहिला विषय आला तो ' वृत्तपत्रे ' आणि तोच आम्ही निवडला.

१९८१ हे साल पुण्यातील वृत्तपत्रसृष्टीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरले; कारण याच वर्षी ' केसरी'ने आपले शतक पूर्ण केले; ' सकाळ ' व ' प्रभात'ने आपल्या सुवर्णमहोत्सव साजरा केला तर ' तरुण भारत'ने पंचविशी ओलांडली आहे. या पार्श्वभूमीवरही हा विषय निवडणे उचित ठरते.

हा अहवाल तयार करताना आम्ही शास्त्रोक्त पद्धतीने वाटचाल केली. प्रथम आम्ही कोठेकोठे भेटी दयायच्या ते ठरविले. ' सकाळ ' हे पुण्यातील सर्वांत मोठे वृत्तपत्र; ' प्रभात ' हे मराठीतील स्थानिक वृत्तपत्र ' आज का आनंद ' हे हिंदीतील तर ' महाराष्ट्र हेराल्ड ' हे इंग्रजीतील वृत्तपत्र. अशी प्रातिनिधिक वृत्तपत्रे आम्ही निवडली. तसेच वृत्तपत्रांशी संबंधित अशा ' यू एन्. आय ' व ' पी. टी. आय.' या संस्था निवडल्या. पत्रकारितेचे प्रशिक्षण देणारी पुण्यातील एकमेव संस्था म्हणजे पुणे विद्यापीठ, म्हणून विद्यापीठाचा ' वृत्तपत्र विद्याविभाग ' अभ्यासला. वृत्तपत्रांविषयीची आकडेवारी मिळविण्यासाठी आम्ही पी. आय. बी. (प्रेस इन्फर्मेशन ब्यूरो) कडे गेलो. पुढची पायरी प्रत्यक्ष मुलाखती घेणे. या कामासाठी आम्ही एक प्रश्नावली तयार केली; परंतु ती फक्त मार्गदर्शक म्हणूनच वापरली. त्याआधारे आम्ही ऐनवेळी तयार करूनच प्रश्न विचारले. ही स्पर्धा ठेवण्याचा कॉमर्स असोसिएशनचा एक हेतू म्हणजे जगाचा बरा-वाईट अनुभव विदयार्थ्यांना यावा. हा हेतू मात्र आमच्या बाबतीत सफल होऊ शकला नाही; कारण आम्हाला ' वाईट ' तर नाहीच परंतु ' बरा ' ही अनुभव आला नाही. तर आमचे सर्व अनुभव ' चांगले ' च होते ! मुलाखती उरकल्यावर आम्ही पुस्तकांतूनही आवश्यक ती माहिती मिळविली. यानंतरची पायरी म्हणजे कच्चा अहवाल तयार करणे. तो तयार झाल्यानंतर सादर करण्याचा पक्का अहवाल व्यवस्थित सजावटीसह तयार केला. हा अहवाल आम्ही वृत्तपत्राच्या स्वरूपात सादर केल्याने तो नाविन्यपूर्ण तर झालाच पण त्यात भरपूर मजकूरही बसला.

या सर्व मुलाखतींवरून आम्हाला जे समजले ते पुढे देत आहोत.

सर्वसाधारणपणे वृत्तपत्रांचे विभाग व कामे पुढीलप्रमाणे : १) संपादकीय–सर्व प्रकारच्या बातम्या व लेख संपादित करणे, २) जाहिरात–जास्तीत जास्त जाहिराती मिळविणे व जाहिरातीविषयक सर्व कामे पाहणे, ३) छपाई–वृत्तपत्र छापणे, ४) वितरण–वृत्तपत्र पोचविण्याची व्यवस्था करणे. वृत्तपत्रे काही अपवाद वगळता Sale or Return Basis वर विकली जात नाहीत.

वृत्तपत्रांमध्ये मक्तेदारी युक्त स्पर्धा (Mono–polistic competition ) आहे असे दिसून

येते. त्यामुळे खप वाढविण्यासाठी जाहिरात किंवा इतर मार्ग वृत्तपत्रांद्वारे हाताळले जात नाहीत व हाताळूनही उपयोग होत नाही.

वृत्तपत्रांचे महत्त्वाचे उत्पन्न किंमत व जाहिरात यांतून येते. त्याखेरीज रद्दी कागदाची विक्री हीही एक उत्पन्नाची छोटीशी बाब आहे. वृत्तत्राचा सर्वांत जास्त खर्च होतो तो कागदावर (एकूण खर्चाच्या ६०%). याखेरीज सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन, लेखकांचे मानधन, वृत्तसंस्थांची वर्गणी वगैरे खर्चही असतात. वृत्तपत्रांचा उत्पादनखर्च झपाट्याने वाढत असल्याने जाहिरातीचे प्रमाणही वाढते आहे. सध्या सर्वसाधारणपणे वृत्तपत्राचा ६०% भाग जाहिरातींनी व्यापलेला असतो. वाढणाऱ्या उत्पादन खर्चात कागदाच्या वाढणाऱ्या किंमतीचा सिंहाचा वाटा आहे. (सध्या कागद ७,००० रु. टन आहे) वृत्तपत्राची किंमत ठरविताना स्पर्धकाची किंमत, जाहिरातीपासून येणारे उत्पन्न व उत्पादन खर्च या बाबी विचारात घेतल्या जातात. किंमतीतून कागदाचा खर्च भागावा अशी अपेक्षा असते.

सर्वसाधारणपणे लहान वृत्तपत्रे फाईल्स ठेवून वृत्तपत्रांचे रेकॉर्ड ठेवतात. तर आर्थिक सुस्थितीत असणारी वृत्तपत्रे कात्रणे व मायक्रोफिल्मींगचे तंत्रही वापरतात असे दिसून आले.

कोणतेही वृत्तपत्र आपल्याविषयीच्या वाचकांच्या प्रतिक्रिया अजमावण्यासाठी खास प्रयत्न करत नाही असे आढळले.

बहुतेक सर्व वृत्तपत्रे बातम्या मिळविण्यासाठी वृत्तसंस्थांवर मुख्यत्वेकरून अवलंबून आहेत हे ' सकाळ ' सारख्या बड्या वृत्तपत्राकडे देखील केवळ वीसच पत्रकार आहेत यावरून दिसून येईल. बातम्या प्रामुख्याने टेलिप्रिंटरवर येतात. तार व टेलिफोन यांचाही उपयोग बातम्या पाठविण्याच्या कामी केला जातो. बातम्या मिळण्याची खात्रीशीर ठिकाणे म्हणजे पोलिस, हॉस्पिटल्स, सरकारी व खासगी पत्रके, रेल्वे व एस्. टी. स्थानके, आमदार, खासदार, जनसंपर्क इ. आहेत. वृत्तसंस्थांनी पाठविलेल्या बातमीदारांना सत्यासत्यतेची जबाबदारी त्या वृत्तसंस्थांकडे जाते. बातमीदारांना सांकेतिक क्रमांक दिलेले असल्याने इतरांकडून खोट्या बातम्या येण्याची शक्यता नसते. बरेचदा वेगवेगळ्या वृत्तपत्रांत कमीअधिक उशीरा बातम्या येतात. याचे कारण म्हणजे बातमीदारांचा आळस व वृत्तपत्रात जागा नसणे. काहीवेळा एखादी बातमी दोनदा येणे किंवा एकाच दिवशी दोन ठिकाणी छापलेली असणे यांसारख्या चुका दिसतात. त्या दर पाळीला बदलणाऱ्या उपसंपादकामुळे होतात. पत्रकाराचे कामाचे नियम, वेतन व कामाचे तास इ. बाबी पालेकर अहवालाप्रमाणे असतात. परंतु या क्षेत्रात घड्याळ बघून काम करणारी मंडळी सापडत नाहीत. " असे लोक या क्षेत्रात अद्याप घुसलेले नाहीत हे सुदैव ! " असे एक संपादक आमच्याशी बोलताना म्हणाले.

पूर्वी मथळ्याला जे महत्त्व होते ते आता राहिलेले दिसत नाही. पूर्वी ' सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ?' यासारखे मथळे बरेच गाजले. तसे मथळे आता सापडत नाहीत. तरी देखील काही मार्मिक मथळे दिसतात. उदा. मुख्यमंत्री अंतुले पदावरून गेल्यानंतर दुसऱ्याच दिवशी 'प्रभात' ने " 'आमदार' अंतुले दिल्लीत " असा मथळा दिला होता.

लेख मिळविण्याच्या दोन पद्धती असतात. पहिली म्हणजे अनाहूत येणारे लेख व दुसरी म्हणजे मागविलेले लेख, लेखांच्या लेखकांना मानधन देण्याचे धोरण प्रत्येक वृत्तपत्रांच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून असते. काही वृत्तपत्रे सर्व लेखांना मानधन देतात; काही फक्त मागविलेल्या लेखांना देतात, तर काही कोणत्याच लेखांना मानधन देत नाहीत.

भारतात, स्पर्धा असण्यासाठी एकापेक्षा जास्त वृत्तसंस्थांची गरज आहे हे जरी खरे असले तरी त्या दोनतीनहून अधिक असण्याची आवश्यकता नाही; कारण कितीही वृत्तसंस्था असल्या तरी त्या सारख्याच बातम्या देणार आणि त्यामुळे सर्वच वृत्तसंस्थांच्या धंद्यावर विपरित परिणाम होईल. सर्व वृत्तसंस्थांची कार्यपद्धती सारखीच आहे, ती म्हणजे सर्व ठिकाणचे पत्रकार मुख्य ऑफिसला बातम्या पाठवितात व मुख्य ऑफिस त्या भारतभरच्या सर्व वृत्तपत्रसभासदांना पुरविते. यामुळे वृत्तपत्रांना भयंकर प्रमाणावर बातम्या बाजूला टाकाव्या लागतात. यामुळे वेळ, पैसा व श्रम यांचा नाहक अपव्यय होतो. हे टाळण्यासाठी वृत्तसंस्थांच्या मुख्य ऑफिसचे विकेंद्रीकरण करणे जरूर आहे. ही ऑफिसेस प्रदेशवार असावीत आणि त्यांनी प्रादेशिक बातम्यावर भर द्यावा. भारतात १९७६ मध्ये

५,००१ ते १५००० खप असणारी १५८ वृत्तपत्रे होती, तसेच ५,००० पेक्षा कमी खप असणारी ३५२ वृत्तपत्रे होते. म्हणजेच भारतात छोटया वृत्तपत्रांची किंवा स्थानिक वृत्तपत्रांची संख्या मोठी आहे. या दृष्टिकोनातूनही प्रादेशिक बातम्यांवर भर देण्याची गरज आहे.

आम्ही घेतलेल्या मुलाखतींवरून सेन्सॉरशिपविषयी सर्वांचेच मत प्रतिकूल पडले. तसेच श्री. अटलबिहारी बाजपेयी यांनी तर बातमीदारावर बातमी कोठून मिळाली हे देण्याचेही बंधन असू नये असे मत व्यक्त केले आहे परंतु त्याचबरोबर त्यांनी वृत्तपत्रांनी स्वतःच आचारसंहिता तयार करून ती पाळावी असे म्हटले आहे ते लक्षात घ्यावे. तसेच सांगली येथे डिसेंबर १९६१ मध्ये महाराष्ट्र पत्रकार संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना श्री. अनंत भालेराव यांनी "राजकीय पक्षांपेक्षाही आधी वृत्तपत्रांना आचारसंहिता लागू करणे आवश्यक आहे" असे म्हटले होते. हे एका पत्रकाराचे उद्गार मननीय आहेत. आज 'विश्वसनीय गोटातून', 'माहितगार सूत्राकडून', 'आतील वर्तुळातून' वगैरे नावाखाली बेदिक्कतपणे खोटया पण सनसनाटी बातम्या दिल्या जातात. या पार्श्वभूमीवर बातमी कोठून मिळाली हे सांगण्याचे बंधन घालणारा कायदा आवश्यकच आहे.

पुणे विदयापीठाच्या वृत्तपत्रविदयाविभागाबद्दल सर्वत्र प्रतिकूल प्रतिक्रिया आढळली. विदयापीठ केवळ २७ विदयार्थ्यांसाठी एक स्वतंत्र विभाग स्थापन करून त्यावर भरपूर पैसा खर्च करीत आहे ही आश्चर्याची बाब आहे. हा विभाग सुरू झाल्यापासून आजपर्यंत म्हणजे १७ वर्षांत केवळ ३०० विदयार्थी येथून पदवी घेऊन बाहेर पडले आहेत. या सर्व बाबी लक्षात घेता येथील शिक्षण समाजाभिमुख करावे असे म्हणावेसे वाटते.

भारतात १९७५ मध्ये ८३५ वृत्तपत्रे होती. ती १९७६ मध्ये ८७५ झाली. परंतु १९७५ मध्ये एकूण खप ९३ लाख ८३ हजार होता तो १९७६ मध्ये ९३ लाख ३८ हजारांवर घसरला. म्हणजेच वृत्तपत्रांची संख्या जरी वाढलेली असली तरी एकूण खप घसरला आहे. याचे मुख्य कारण वृत्तपत्रांची वाढती किंमत हे आहे. तसेच घसरता दर्जाही याला कारणीभूत आहे. घसरणारा खप ही बाब चिंताजनक आहे. याचा वेळीच सरकार व वृत्तपत्रांच्या संघटनांनी विचार करावयास हवा.

---

# हे असेच चालत राहणार !

हिरवेगार दिसत होते दोन्ही काठ
फुलत होती कमळे लालीलाल
घेत होता विसावा थवा पक्ष्यांचा
एका नदीच्या काठावर, पाण्यावर !
पण आज ...
तीच नदी, मानवही तोच.
दिसत नाहीत कमळे
नाहीत दिसत काठ हिरवेगार
दिसत आहे मात्र तेथे हिरवेगार शेवाळ
आणि धूर ओकणारी धुराडी
उंच माना करीत
आकाशाला चुंबणाऱ्या इमारती
तृषार्त पक्षी विहरत होता गगनी
शोधत होता पाणी
मुद्रा केविलवाणी
उतरला अवनीवरती
चुळकाभर पाण्यासाठी
आणि दुसऱ्याच क्षणी
मान टाकली अवनीवरती
लांबविले पाय, पसरले पंख
आणि सोडिला प्राण
दिसत आहे, पहात आहे !
तीच नदी ! मानवही तोच !
हे असेच चालत राहणार, असेच.

यशोधन पतकी, द्वितीय वर्ष शास्त्र

# ' हॅलो.... हॅलो.... '

शुभांगी देशपांडे, तृतीय वर्ष (साहित्य)

एक आपला साधासुधा, सरळ दिवस. घड्याळाच्या काट्यावर नाचायला लावणारा. ऑफिसमधील ड्युटी नामक परम कर्तव्य पूर्ण करून ' राजेश्री ' घरी परतत होत्या. पण या एवढ्याशा मेंदूला काय झाले समजत नव्हते ! भयंकर संताप आला होता त्या माणसाचा. आणि काहीही करू न शकणाऱ्या पांढरपेशी जगण्याचा. तर प्रसंग असा होता. संध्याकाळचे सात वाजले होते. नेहमीसारखे फोन खणखणणे, लाईन एंगेजचे लॅम्प, तर जळणारे दिवे आणि भरगच्च कॉलच्या पसाऱ्यात मी होते. माझ्या हातात एक कॉल होता. मोठ्या अक्षरात (डेथ इमर्जन्सी) लिहिलेल्या कॉलवर बुक करणाऱ्या ऑपरेटरची कॉल लावण्यासंबंधीची सूचना होती. सगळे काम सोडून तो कॉल त्या स्टेशनच्या ऑपरेटरला विनंती करून त्याच्या माणुसपणाला आवाहन करून लावला आणि तो कसा काय सुरू आहे म्हणून एक मिनिटाने लाईनवर गेले. कॉलवर छान मालाच्या किंमतीच्या चढउतारासंबंधी बोलणे चालू होते. या पैशाच्या जगात माणसाच्या मृत्यूचासुद्धा बाजार करतात.

असे हरघडी नित्य नवे प्रसंग अनुभवायला मिळतात. या जगात येथे नंबर आणि आवाजाचाच पसारा असतो. नंबर एंगेजचा आवाज वेगळा तर तो नादुरुस्त किंवा अस्तित्वात नसण्याचाही आवाज वेगळा एंगेजनंबरही ऑपरेटरला मिळू शकतो आणि ऑपरेटरचे ऐकणे, याला चोरून हा शब्दच वापरत नाहीत कारण तशी खास सोय असतेच. अशा संभाषणाविषयी आम्हा लोकांना फारसे कुतुहलही नसते. कारण रोजचेच झाल्यावर कोण ऐकणार ?

यंत्रयुगात माणसं दुरावली हे अक्षरशः खोटं ठरतं ते टेलिफोनमुळे. दोन मिनिटांत जगातल्या ५० हून अधिक देशांत नंबर डायल करून आपण बोलू शकतो. म्हणून अमेरिकेतील अमेरिकन पत्नी परदेशी आलेल्या आपल्या नवऱ्याला हजारदा आय लव्ह यू म्हणते आणि तोही तसाच प्रतिसाद देतो. (त्यांना बहुधा खात्री नसावी किंवा त्या क्षणाची तरी ते खात्री पटवून घेत असावेत.)

आईबापांनी मुलांसाठी खस्ता खायच्याच असतात. त्यांना मोठं करायचंच असतं अशा कल्पनात वाढलेली मी, जेव्हा कुणी एक इंग्लंडची ' रोझा ' आपल्या आईबापाला जेव्हा Thank you very much mummy daddy for sending me in India and giving me opportunity to study here ! असे म्हणताना ऐकते तेव्हा थक्क होते आणि असं जर मी घरी म्हणाले तर काय होईल या कल्पनेने मला हसू येते.

कुण्या आईबापांनी आपल्या बुद्धिमान पोरांना थोटकी क्षितिजे लाभू नयेत, म्हणून कौतुकाने अमेरिकेला पाठविलेले असते. सारं आयुष्य पणाला लावून फॉरीन रिटर्न्ड मुलाची, जावयाची स्वप्न पाहिलेली असतात. पण जेव्हा collect call चे पैसे भरायला तयार झालेली ' लग्न न झालेल्या ' आपल्या मुलाची अमेरिकन बायको फोनवर त्यांना भेटते तेव्हा त्यांच्या काळजाबरोबर माझ्याही काळजाचे पाणी होते. पुढच्या काही दिवसांनी केलेल्या कॉलमध्ये वडिलांच्या एकसष्टीला एकसष्ट डॉलर्सचा चेक मिळाला म्हणून आई फोन करते आणि जोडप्याचे अभिनंदन करते.

तुझ्यासाठी इतकं करूनही तू तुझ्या लग्नाविषयी मोकळेपणाने बोलावं इतकाही विश्वास आईबाप म्हणून आम्ही मिळवला नाही असं म्हणत प्रगल्भ मनाची ती डॉक्टर असणारी दु:खी आई फोन ठेवते. मी फक्त डोळे पुसते आणि निर्विकारपणं पुढचा नंबर डायल करू लागते.

रोज ठराविक वेळी एक यू. एस्. ए. कॉल बुक होत असे. बुक करणारा अधिर आवाजात बोलायचा 'कॉल टु पिकी.' या कॉल बुक करणाऱ्या रोमीओची ज्युलियट असते स्टेटसला. रोजच्या रोज हा माणूस ठराविक वेळी कॉल बुक करायचा. रोज तेच सारं तसंच बोलायची दोघंजण, आणि विरहाचा एक एक दिवस काढायची. शेवटी अचानक कॉल बुक होईनासा झाला, तेव्हा मी समजूत करून घेतली, युगायुगानंतरचे त्यांचे मिलन झाले असावे.

माणसाच्या अनंत जाती असतात हे मला प्रथमच जाणवले, फोनवर अनेक माणसांना भेटल्यावर. काही फारच उर्मट आणि उद्धट असतात. काही नको इतकी मऊ बोलणारी, आपलं सारंच चुकतं असं वाटणारी, काही फारच कडक आवाजाची, सगळ्या जगाला अट्टल घडवू शकतो असा रुबाब असणारी, काही अतिशय लाघवी, मृदु तर काही निर्लज्ज, ओशट बोलणारी. पोरीचा फक्त आवाज ऐकून पाघळणारी मूर्ख माणसंही इथे भेटतात. त्रास देतात. 'क्रिया–प्रतिक्रियांचा' न्यूटनचा नियम माणसामाणसांतील व्यवहारालाही लागू पडतो. तुम्ही जसे बोलाल तसेच प्रत्युत्तर तुम्हाला मिळते. will you please म्हटल्यावर काय बिशाद माझी कॉल न लावण्याची. माणसाच्या पहिल्या वागण्यातूनच त्याच्याशी कसे बोलले पाहिजे हे सूज्ञ ऑपरेटर जाणते. आणि त्यात काहीही विशेष नाही. तुम्ही Polished English बोललात की yes pardon ! असे प्रत्युत्तर तुम्हाला येणारच.

मानवी संबंधाचा एक चालता बोलता (नव्हे ऐकता बोलता !) अनुभव म्हणजे माझी नोकरी. टेलिफोनची भाषा खूप खरी भाषा असते असे नाही. पण आमने सामने नसल्यामुळे इथे एक खुली भाषा असते. मानवी मनाचे अनेक रंग, अनेक पदर इथे उलगडताना मी पाहिले आहेत.

घटस्फोटासाठी कोर्टात केस लढणारे पती, पत्नी एक पुण्यात व एक सिकंदराबादला असताना समझोत्याचे बोलतात. पती पत्नीला परत घरी येण्यासंबंधी सांगतो. मुलांचे फुलासारखे चेहरे कसे कोमेजून गेलेत हे सांगत राहतो. आपली चूक कबूल करून, पुन:पुन्हा माफी मागतो पण अस्मिता दुखावलेली पत्नी 'विचार करून सांगते' असे म्हणत राहते. जुळत येणारे संबंध असेच लवकर जुळावेत असे म्हणत मी लाईन डिसकनेक्ट करते.

इथे एक व्यापारी जग असते. ते रोज इकडच्या तिकडच्या भावांची चौकशी करून आपल्या मालाचा भाव ठरविते. लाखोंनी उलाढाली करणारी ही माणसे ५–१० रु. साठी आमच्याशी वाद घालतात. आणि अशीही व्यापारी मंडळी आहेत की ती ब्ल्यू डायमंड मधून सिंगापुरला नाहीतर कुवेतला अर्धा पाऊणतास बोलतात आणि बिल किती देतात माहीत आहे ? प्रत्येक तीन मिनिटांस ९४ रु. करा हिशोब. साखरेची टेंडर फुटणार असली की साखरकारखान्यांच्या कॉलला ऊत येतो. ही माणसं साखर स्वस्त देण्यासारखं मंत्र्यासारखं आश्वासनही देतात.

सतत साडेतात तास मनात असो वा नसो दर आवाजाला सौम्य आवाजात, शांतपणे उत्तर द्यावे लागते. समोरच्या माणसाचं कितीही चुको, तुम्हाला सहन करावे लागते. सहनशक्ती वाढविण्याचा हा सततचा प्रयोग एक प्रयुक्त म्हणून स्वत:वर करवून घ्यावा लागतो. पण कधी कधी दिलखुलासपणे बोलणारी, नर्म विनोद करणारी माणसे भेटतात. कुणी छोटचा, सारखा एकच नंबर डायल करून फोन करायला शिकत असतो आणि सांगतो– "मी छोटा अमिताभ बोलतो. तू आमच्याकडे टी. व्ही. पाहायला ये" असे आमंत्रण देतो.

तर या दुनियेत पैसे मिळविण्याबरोबर स्वत:ला यंत्र बनविण्यापलिकडे मी साधलंय माणसं पहाणे, अनुभवणं ! कारण समोर एक वाक्य निळ्या निऑन लाईट मध्ये चमकत असते.

"Efficiency in ones work is yoga"

# मॉडर्नच्या आम्ही खोखोच्या मुली !

नंदिनी कुलकर्णी, तृ. व. शास्त्र



खो खो हा भारतीय मैदानी खेळांतील एक अतिशय महत्त्वाचा खेळ. किंबहुना गेल्या काही वर्षांत पुण्याच्या डेक्कन जिमखान्याच्या प्रयत्नाने त्याला अत्यंत नियमबद्ध स्वरूप प्राप्त झाल्याने त्याचे महत्त्व आता अखिल भारतात सतत वाढते आहे. फार थोड्या वेळात अधिक सरस, सर्वांगीण आणि उपयुक्त व्यायाम मिळण्याच्या दृष्टीने त्याची बरोबरी दुसऱ्या कोणत्याही खेळाला करता येणार नाही. चपळता व धडाडीचा पाठलाग, रबराप्रमाणे सतत ताणलेली व्यग्रता आणि दमछाक होऊ नये म्हणून परिश्रमपूर्वक अंगी बाणलेला चिवटपणा इत्यादी गुणांमध्ये साऱ्या भारतीय मैदानी खेळांमध्ये आज खोखो हा खेळ श्रेष्ठ आणि सरस ठरला आहे.

या खेळाची कर्मभूमी महाराष्ट्र ही असली तरी विद्येच्या माहेरघरी म्हणजे या आमच्या पुण्यपत्तनात त्याची जोपासना विशेष केली जाते. सरस्वती, सन्मित्र, आर्यक्रीडोद्धारक यांसारखे एकापेक्षा एक बलाढ्य संघ खोखो-मध्ये अखिल भारतीय पातळीवर स्वतःचे स्थान टिकवून आहेत. एकेकाळी आट्यापाट्यांच्या खेळात अग्रस्थानी असणारे पुणे आता खोखोत अग्रस्थान बाळगून आहे. आट्यापाट्याच्या खेळातील क्लिष्टता, गुंतागुंत आणि अनेकलक्षी व्यग्रता यांमुळे तो खेळ मागे पडत गेला आणि त्याची जागा आज खोखोने घेतली आहे. मागच्या पिढीतील गोडबोले, शंकरराव पाटणकर, हरीभाऊ साने त्यांच्या अविरत प्रयत्नाने आणि आताच्या पटवर्धन, शिंदे, आंबेकर, कोल्हटकर, इ. व्यक्तींमुळे हा खेळ आता वेगाने नवी क्षितिजे काबीज करीत आहे. मॉडर्नच्या श्रीरंग इनामदार आणि गिरीश दंडे यांनी या खेळामुळे अखिल भारतीय कीर्ती मिळविली आहे.

आम्ही काही मैत्रिणी शाळेत असतानाच योगायोगाने या खेळाकडे ओढले गेलो आणि या खेळाच्या चांगल्याच प्रेमात पडलो. दररोज संध्याकाळी खोखोचे मैदान आम्हाला खुणावू लागले आणि दहावीपर्यंत या खेळाने आम्हाला अभ्यासाबरोबर एक जबरदस्त ओढ निर्माण केली.

दहावीनंतर खोखोतल्या वेगवेगळ्या संघांतल्या मुली मॉडर्नमध्ये एकत्रित आल्या. निशा अंबिके, मिथिला जबडे, वसुधा तुमपल्लीवार, संगीता ताटके, सुनीता देशपांडे, मी. जयश्री साने अशा खोखोवेड्या मुली एकत्रित आल्या-नंतर मॉडर्नमध्ये खोखोची मुलींची एक जबरदस्त टीम निर्माण झाली नसती तरच नवल !

आम्ही या महाविद्यालयात प्रवेश घेतला तेव्हा शाळेतून याविश्वात येताना मनात उत्सुकतेबरोबरच थोडी भीती पण होती. या एवढ्या कॉलेजमध्ये आमच्या खेळाचे कोण कौतुक करणार, आमच्या अडचणी कोण समजून घेणार असा प्रश्न आम्हाला पडला होता. जरा भीतभीतच आम्ही लागूसरांकडे जाऊन कलरची मागणी केली. आणि आश्चर्य म्हणजे आम्हाला लगेच कलर मिळाला सुद्धा ! लगेचच आम्ही आंतर महाविद्यालयीन सामन्यांत कॉलेजला विजेतेपद मिळवून दिले. आमच्या या विजयाची नोंद केवळ पी. टी.च्या लागूसरांनीच नव्हे तर प्राचार्यांनी पण घेतली. आमचे कौतुक केले, आम्हाला बक्षीसे पण दिली. या कौतुकाने आमचा आनंद द्विगुणीत झाला. लगेचच आम्ही

विभागीय व राज्य स्तरांवरील सामन्यांमध्येसुद्धा विजय मिळवला व चाचणीस्पर्धेत भाग घेण्याचा हक्क मिळवला. तीन दिवस पुण्यात भरलेल्या या चाचणी स्पर्धेतून राष्ट्रीय पातळीवर अमृतसर येथे खेळल्या जाणाऱ्या महाराष्ट्र-संघाची निवड झाली. मॉडर्न कॉलेजच्या सुनीता देशपांडे हिची कर्णधार म्हणून निवड झाली. तसेच आमची (निशा, मिथिला, वसुधा, संगीता व मी) महाराष्ट्राच्या मुलींच्या संघात तर अश्विन पुंडलीक व अतुल वाकणकर यांची मुलांच्या संघात खेळण्यासाठी निवड झाली. मी व संगीता आम्ही दोघी प्रथमच राष्ट्रीय सामने खेळणार होतो. बाकी सर्वजण जुने व नामवंत खेळाडू होते. सर्वांनी मोठ्या उत्साहाने अमृतसरला कूच केले.

अनेक ठिकाणे पाहातपाहात, मजा करत आम्ही अमृतसरला पोहोचलो. अमृतसर जवळ आल्यावर सर्वत्र बुरखे व फेटे यांचे राज्य सुरू झाले अमृतसर हे पंजाबमधील एक अत्यंत श्रीमंत राज्य. सुबत्ता व समृद्धी अगदी ओसंडून वाहात होती. अशा या अमृतसरला इतर सर्व संघांना हरवून आम्ही २४ व्या राष्ट्रीय स्पर्धेत अजिंक्यपद पटकावले. बऱ्याच वर्षांनी हे विजेतेपद महाराष्ट्राला मिळाले होते. या विजयामुळे आमचा संघ सर्व भारतात अजिंक्य ठरला. त्यातच भर म्हणून महाराष्ट्राचे इतर सर्व संघ–कबड्डी, बास्केटबॉल, टेबल–टेनिस इ. साखळी सामन्यांमध्येच पराभूत झाले. फक्त खो–खो मुले व मुली अंतिम सामन्यांपर्यंत पोहोचू शकले व दोघांनीही अजिंक्यपद पटकावले. त्यामुळे आमचे खूपच कौतुक व लाड झाले. आम्हाला नेताजी सुभाषचंद्र बोस राष्ट्रीय क्रीडा शिष्यवृत्ती मिळाली. ही शिष्यवृत्ती प्रत्येक खेळातील नामवंत खेळाडूंना मिळते.

अमृतसरच्या या सामन्यांमध्ये आम्हाला मिळालेला हा विजय अत्यंत अनपेक्षित होता. कारण येथे अनेक नामवंत संघ आले होते. प बंगाल, गुजरात, पंजाब तसेच अत्यंत बलाढ्य इंदूरचा संघ येथे आले होते. पंजाबने तर आपला संघ जिंकावा म्हणून सामन्याच्या आधी एक महिना सराव–शिबीर आयोजित केले होते. तसेच त्या मुली अत्यंत धटिंगण होत्या. आम्ही त्यांच्यापुढे खूपच लहान दिसत होतो. त्यातच भर म्हणून तो यजमान संघ ! त्यामुळे जेव्हा उप–उपान्त्य सामन्याला आमची त्यांच्याशी गाठ पडली तेव्हा आम्ही जरा घाबरलोच होतो. सामना पाहायला खूपच गर्दी होती आणि पहिल्यापासूनच पंजाबच्या संघाला लोक प्रोत्साहन देत होते. 'सत् अकाल' इ. आरोळ्या जोरजोरात उठत होत्या व लोक उत्साहाने ओरडत होते. पण खो–खो हा खेळ असा आहे की ज्याला शक्ती उपयोगी पडत नाही तर चापल्य लागते. म्हणूनच त्या उंच व धष्टपुष्ट मुलींवर आम्ही मात केली. जेव्हा तेथील प्रेक्षकांना समजू लागले की ते सामना हरत आहेत तेव्हा त्यांचा उत्साह थंडावला. उत्साहाची जागा संतापाने घेतली. ते आमचा निषेध करू लागले, चिडून ओरडू लागले. पण आम्हाला सामना खेळणे भाग होते. हळूहळू ते लोक संतापून मैदा-नाच्या दोऱ्या तोडून आत घूसू लागले व त्यांनी जवळजवळ अर्धे मैदान व्यापून टाकले. आम्हाला अक्षरशः सामना खेळणे अवघड होऊन बसले. तेवढ्यात सामना संपल्याची शिट्टी झाली. आम्ही सुटकेचा निःश्वास टाकला व मैदानातून बाहेर पडू लागलो. पण त्या संतापलेल्या लोकांनी आम्हाला घेराव घातला. ते आम्हाला काही केल्या बाहेर पड देईनात. आमच्या टोप्या त्यांनी चक्क पळवल्या. अंगावरच्या क्रमांकाच्या फिती ओढायला लागले. त्यांच्या जोरकस, धिप्पाड, लालबुंद आणि तगड्या मुलींचा पराभव करण्याचा आम्ही मोठाच गुन्हा केला होता ! मराठी जोंधळ्याने पंजाबच्या सकस गव्हाचा केलेला हा जणू अपमान होता. त्यांच्या आक्रमक पवित्र्याने आम्ही साऱ्या घाबरून गेलो. शेवटी पोलीस आले व त्यांच्या बरोबर आमची सुटका झाली !

याच्या बरोबर विरुद्ध अनुभव आम्हाला दुसऱ्यांच दिवशी आला. आम्ही रस्त्यातून बडबड करत चाललो असताना एका स्त्रीने आमचे मराठी बोलणे एकले व रस्त्यातच आम्हाला थांबवले आणि विचारले की, तुम्ही महा-राष्ट्रातून आलात का ? जेव्हा आम्ही हो म्हणून सांगितले तेव्हा तिला खूपच आनन्द झाला, कारण तिथे मराठी माणूस सुद्धा भेटणे मुश्कील मग मराठी बोलणे, ऐकणे तर दूरच. बऱ्याच दिवसांनी आपल्या प्रांतामधील माणसे भेटण्यामुळे झालेला आनंद तिच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहात होता. तिने आमची चौकशी केली, आग्रहाने आम्हाला तिच्या घरी घेऊन गेली व आमची खूप सरबराई केली. आम्हाला सुद्धा जवळजवळ महिनाभर घरचे सुग्रास अन्न

मिळाले नव्हते. हॉटेलचे खाणे खाऊन कंटाळा आला होता. त्यामुळे न लाजता, न संकोचता आम्ही व्यवस्थित पोट-पूजा केली. त्या गडबडीत तिचे नाव, गाव काहीसुद्धा विचारायचे भान आम्हाला राहिले नाही. त्यानंतर ती रोज आपल्या मुलांना घेऊन आमचे सामने बघायला येऊ लागली. सामना जिंकल्यावर आवर्जून आमचे अभिनंदन करू लागली खरे म्हणजे खो–खो मधील तिला काही म्हणजे काही सुद्धा कळत नव्हते. पण आपली माणसे म्हणून तिने जी आत्मीयतेची आम्हाला वागणूक दिली, त्याने आमचे मन भरून आले.

अमृतसर हे शहर भारत व पाकिस्तान यांच्या सरहद्दीवर वसले आहे. तेथून अगदीजवळ सरहद्द आहे भारत व पाकिस्तान यांच्या सरहद्दीत शिरण्याची दोन छोटी छोटी द्वारे समोरासमोर उभी आहेत. अलीकडचे दार भारताचे तेथे भारताची हद्द संपते, तर पलीकडचे दार पाकिस्तानचे तेथून पाकिस्तान सुरू होते. दोन्हीकडे शिपायांची कडक गस्त चालू असते. या शहराचे वैशिष्टच म्हणजे येथील शिखांचे सुवर्णमंदिर. हे मंदिर संपूर्णतया सोन्याचे असून चारही बाजूने पाण्याने वेढलेले आहे. तेथील एक गोष्ट प्रामुख्याने जाणवली ती म्हणजे स्वच्छता ! मंदिर अत्यंत स्वच्छ. मंदिराबाहेर भगवे कपडे असतात. आत शिरताना ते नीट डोक्याला गुंडाळून मगच आत जायचे. केस कधीही मंदिरात उघडे ठेवायचे नाहीत, अशी तेथील प्रथा आहे. मंदिरात ठिकठिकाणी शिखांचा पवित्र ग्रंथ ' ग्रंथसाहेब ' चे भक्तिभावाने पठण चालले होते. कचरा तर सोडाच पण धुळीचा कण सुद्धा कुठे दिसत नव्हता ! हे सर्व पाहून मन प्रसन्न झाले. रात्री चंद्रप्रकाशात तर ते सुंदर झगमगते सुवर्णमंदिर पाहून डोळ्यांचे पारणे फिटले.

अशा तऱ्हेने अमृतसरला घवघवीत यश संपादून आम्ही परत आलो. तेथे मिळालेल्या विजयाच्या धुंदीत व कॉलेजात झालेल्या कौतुकाच्या वर्षावात एक वर्ष कसे निघून गेले ते कळले सुद्धा नाही. पुढच्या वर्षीसुद्धा मागील-वर्षीप्रमाणे आम्ही कॉलेजला विजेतेपद मिळवून दिले. राज्यस्तराच्या सामन्यांसाठी मॉडर्न कॉलेजचा संपूर्ण संघ निवडला गेला. हे सामने अहमदनगर येथे भरवलेले होते कॉलेजने छाब्रासरांना आमच्याबरोबर व्यवस्थापक म्हणून पाठवले. हे सामने आमच्या सर्वांच्या फारच लक्षात राहिले. कारण आम्ही सर्वजण पुणे जिल्ह्याकडून खेळण्यासाठी अहमदनगरला चाललो होतो. वाटेत आम्हाला दौंड येथे गाडी बदलायची होती. दौंड स्टेशन अगदी जवळ आले होते. आम्ही सर्व सामान आवरून गाडी थांबायची वाट पाहात होतो. मुले तर सामान घेऊन डब्याच्या दारात उभी होती. आणि इतक्यात खो–खोच्या मुलांच्या संघातील माधव वझे दारातून अचानक खाली पडला. बघेबघेस्तोवर त्याच्या दोन्ही पायांवरुव रेल्वे गेली. तो आत्तापर्यंत पुण्यात काही सामने खेळला होता. पण बाहेरगावी खेळण्यासाठी तो प्रथमच चालला होता. राष्ट्रीय सामन्यांसाठी आपली निवड होईल असे स्वप्न तो पहात होता. पण नियतीने निष्ठुरपणे त्याच्या स्वप्नांचे पंख कापून टाकले ! रेल्वे पायावरून गेल्यामुळे माधवचे दोन्ही पाय कापावे लागले. चपळतेने खो–खो खेळणाऱ्या वझेला त्याच्या पायांनी कायमचा खो दिला. त्यामुळे सर्व सामन्यावर दुःखाचे सावट पसरले होते. त्यातच भर म्हणून आम्ही अहमदनगरला पोहोचलो आणि तेथे अक्षरशः धो–धो पाऊस पडू लागला. शेवटी माती घालून चिखलातच सामने खेळवले गेले. मैदानात गेले की पाय घसरायचा, पण तशाच चिखलात खेळून आम्ही सामने तर जिंकलेच पण खेळण्यापेक्षा जास्त चिखलात बागडून घेतले. तोही एक आनंदाचाच खेळ होता !

या वर्षीपण आमची, सहाजणींची काश्मीरमध्ये होणाऱ्या २५ व्या राष्ट्रीय सामन्यासाठी निवड झाली. यथावकाश आम्ही श्रीनगरला रवाना झालो. गेल्या वर्षाचा अनुभव व आत्मविश्वास पाठीमागे असल्यामुळे या वर्षी आम्ही अत्यंत सहजपणे विजयश्री खेचून आणली. या वर्षीसुद्धा महाराष्ट्राने फक्त खो-खोमध्ये विजेतेपद मिळवले होते. बाकी सर्व खेळांमध्ये अंधारच होता. त्यामुळे चहूकडून आमचे कौतुकच कौतुक होत होते, जणु कौतुकाच्या गालिच्यावर आकाशातून तरंगत आहोत, असे वाटत होते. गंमत ही की, श्रीनगर येथील स्थानिक वाढपी आमची जेवणाची, नाश्त्याची व्यवस्था करीत, ते रोज आम्हाला विचारत, " बेबी, क्या हुआ ? जीत गया ना ? " आणि जेव्हा आम्हीच जिंकल्याचे सांगत असू, तेव्हा कौतुकाने ते आम्हाला सफरचंदे बक्षीस देत. सर्व काश्मीरमध्ये आम्हाला हे आढळले.

येथे मुलींचे सामने जेथे खेळवले गेले तेथे कडक बंदोबस्त होता. पुरुषांना तेथे प्रवेश नव्हता ! मुली सामने खेळतात यांचे तेथे खूपच अप्रूप दिसत होते. त्यामुळे आम्ही जाऊ तेथे आमचे कौतुक ! आम्ही जिंकल्यामुळे आम्हाला श्रीनगर इ. ठिकाणे दाखवण्यात आली. दाल सरोवर, निशात, शालिमार बागा की जिथे निसर्गाने आपल्या सौंदर्याची मुक्त लयलूट केली आहे, अशा निसर्गरम्य ठिकाणांच्या पार्श्वभूमीवर तेथील लोकांचे दारिद्र्य फारच जाणवत गेले. महापूर, दारिद्र्य आणि मागासलेपणा यामुळे मन अस्वस्थ झाले. पाकिस्तानचे सावट तर त्यांच्यावर काळ्या ढगा-प्रमाणे पडलेले दिसत होते. वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर परत आम्ही आंतरमहाविद्यालयीन सामने जिंकले. तिसऱ्यांदा आम्ही हे अजिंक्यपद मिळवित होतो. तसेच विभागीय सामन्यांत विजय मिळविल्यामुळे पुणे विद्यापीठाच्या संघात आमची निवड झाली. यावर्षी आमची मैत्रीण मेधा अवधानी सुद्धा निवडली गेली. त्यामुळे पुणे विद्यापीठाच्या संघात मॉडर्नच्या सात खेळाडूंचा समावेश झाला. औरंगाबाद येथे झालेल्या आंतर विद्यापीठ स्पर्धेत मोठमोठ्या नामवंत संघांनी भाग घेतला होता. बलाढ्य इंदूर विद्यापीठाच्या संघाशी चुरशीची लढत देऊन आम्ही निसटता विजय मिळवला. या विजयामुळे आम्ही लागोपाठ तिसऱ्यांदा भारतात अजिंक्य ठरलो.

या आमच्या यशस्वी वाटचालीमध्ये कॉलेजने आम्हाला खूपच सहकार्य, प्रोत्साहन दिले. लागूसर, छात्रासर मॅचच्यावेळी स्वतः हजर राहात. मॅच जिंकल्यावर आमची खाण्याची चंगळ असे. खेळताना झालेल्या चुका सांगत. इतकेच नव्हे तर स्वतः गंभीरसर आमच्याशी वेळात वेळ काढून संपर्क साधत व जिंकल्यावर २ पेढे (प्रत्येकाच्या) हातावर ठेऊन तोंड गोड करीत. बाहेरगावी गेल्यामुळे आमची प्रॅक्टिकल्स नेहमीच बुडत, ती सर्व आम्हाला व्यवस्थित करायला मिळतील याची काळजी डॉ. गाडगीळ यांनी नेहमीच घेतली. कॉलेजने एवढी आमची आस्थेने विचारपूस केली. कौतुक केले, प्रोत्साहन दिले म्हणूनच आम्ही इतकी यशस्वी वाटचाल करू शकलो.

## शिवछत्रपती पुरस्कारविजेत्या खोखोपटू


सुनीता देशपांडे



निशा अंबिके

आमच्या या यशात सुनीता देशपांडे आणि निशा व नीता अंबिके-भगिनी यांनी मानाचा तुरा खोचला आहे. सुनीता देशपांडे हीस १९७७–७८ चा शिवछत्रपती पुरस्कार मिळाला. सुनीता ही पुण्याच्या सरस्वती कन्या संघाची आघाडीची खेळाडू. ती आपल्या जबरदस्त स्टॅमीना व नागमोडी पळतीच्या खेळासाठी प्रसिद्ध आहे. तिने अत्यंत समर्थपणाने संघाची जबाबदारी पेलली. अमृतसर येथे तिने आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये महाराष्ट्राचे कर्णधारपद पटकाविले व अत्यंत कौशल्याने निभावले. आत्तापर्यंत तीन शालेय, दोन खुल्या राष्ट्रीय स्पर्धा व अनेक अखिल भारतीय सामन्यांमध्ये सुनीता चमकली आहे. उत्कृष्ट पळतीसाठी अनेक बक्षिसे तिने मिळवली आहेत. अंबिके–निशा व नीता–भगिनींना तर खो-खोत फारच मोठे स्थान आहे. निशा पहिली राष्ट्रीय स्पर्धा वयाच्या १४ व्या वर्षी खेळली. तेव्हा ती राखीव खेळाडू म्हणून निवडली गेली होती. त्यानंतर तिने अत्यंत झपाट्याने आपली प्रगती केली. पंधराव्या वर्षी निशा हिमाचल प्रदेश येथे भरणाऱ्या राष्ट्रीय सामन्यांसाठी कर्णधार म्हणून निवडली गेली. नंतर लगेचच निशा खुले राष्ट्रीय सामनेसुद्धा खेळू लागली. एकाच वर्षी शालेय व खुल्या राष्ट्रीय स्पर्धा फारच थोडे खेळाडू खेळतात. त्यांपैकी निशा एक आहे. त्याच्या जोडीला आर्यक्रीडोद्धारक संघ या पुण्याच्या एका आघाडीच्या संघातून निशा प्रथम तुकडीची पळतीची खेळाडू म्हणून खेळत आहे. निशा ही तिच्या अष्टपैलू खेळासाठी प्रसिद्ध आहे. क्षणात नागमोडी, एकाआड एक अशी पळती तर क्षणात चौघींत साखळी पद्धतीने पळती. असा विविधरंगी पण अत्यंत आत्मविश्वासपूर्वक खेळ निशा पळत असताना पाहावयास मिळतो. समोरच्या गड्याला सुंदर हूल देऊन जमलेल्या असंख्य प्रेक्षकांची वाहवा तर निशाने अनेकवेळा मिळविली

आहे. पण केवळ पळती हेच निशाचे वैशिष्टय नाही. निशा, पळती इतकेच सुंदर, किंबहुना पळतीहूनही अधिक सुंदर आक्रमण करते. अत्यंत चपळ व गतीमान हालचाली व समोरच्या गड्याला गाफील ठेऊन बाद करणे हा तर तिचा हातखंडाच. कित्येक वेळा ती इतके सुंदर आक्रमण करते की, क्रीडांगणाच्या बाहेर गेल्यावर सुद्धा खेळाडूला निशाने आपणास कसे बाद केले हे समजत नाही ! नागमोडी आणि दीर्घ वर्तुळाकार अशा आतल्या खेळात ती जशी उठून दिसते तशीच हुलकावण्या देऊन ती बाहेरील खेळातही रंग भरते. पाठलाग आणि हुलकावण्या, Chasing & dodging या दोहोंतही प्रवीण म्हणजे निशाच ! अशा या अष्टपैलू खेळामुळे निशाने उत्कृष्ट आक्रमक, संरक्षक व सर्वोत्कृष्ट खेळाडूची अनेक पारितोषिके मिळवली आहेत. आत्तापर्यंत चार शालेय, चार खुल्या राष्ट्रीय स्पर्धा, एक महिला राष्ट्रीय स्पर्धा व संघाकडून अनेक सामने निशा खेळली आहे.

मार्च १९८० मध्ये तिला पतीयाळा येथे राणी लक्ष्मीबाई पारितोषिक मिळाले. नंतर लगोलग निशाने १९७८–७९ चा श्रीशिवछत्रपती पुरस्कार मिळविला. या सर्व प्रवासात आमचे सर अरविंद पटवर्धन यांनी तिला मार्गदर्शन केले.

तिच्याच पावलावर पावले टाकून तिची धाकटी बहिण नीता हिने खो-खो क्षेत्रात पदार्पण केले व मोठ्या बहिणीच्या कीर्तीत भर टाकली. नीता अत्यंत सुंदर, अत्यंत सावध अशा पळतीच्या खेळासाठी प्रसिद्ध आहे. अतिशय छोट्या चणीची असूनसुद्धा ती अत्यंत दमदारपणे, चपळतेने व आत्मविश्वासाने खेळ करते. सामन्याची सात मिनिटे नाबाद खेळण्याचा विक्रम करून प्रेक्षकांच्या कौतुकाला पात्र होण्याचे प्रसंग तर तिला खूपच आले आहेत. इतकेच नव्हे तर सामन्याच्या दोन्ही डावांत ७–७ मिनिटे नाबाद खेळण्याचा विक्रम नीताने केला आहे. नीताची खेळण्याची शैली अत्यंत सुंदर आहे व सामन्यांची ७ मिनिटे ती सहजपणे खेळून काढते. तीसुद्धा निशाप्रमाणेच आर्यक्रीडोद्धारक संघाची खेळाडू आहे. दोघी भगिनी अत्यंत आत्मविश्वासपूर्वक क्रीडांगणावर खेळत असतात दोघी प्रथम तुकडीच्या पळतीच्या खेळाडू आहेत. व एकमेकींच्या साहाय्याने सुन्दर खेळ करतात. नीता पळत असताना निशा तिला अनेक सूचना देते. अनेकदा नीता दमली असेल तर स्वत: मध्ये जाऊन स्वत:वर पाठलाग ओढवून घेते व तिला विश्रांती मिळवून देते. नीतासुद्धा शांतपणे पळून आपल्या वाटेचा वेळ पळून काढते एकूण अशा या दोघी बहिणी ! एकमेकींना खो न देता एकमेकींना संभाळून खोखोची प्रतिष्ठा वाढवीत राहतात. निशाच्या मागोमाग लगेच पुढच्याच वर्षी नीताने इचलकरंजी येथे भरलेल्या राष्ट्रीय सामन्यात राणी लक्ष्मीबाई पारितोषक मिळविले आहे. आता पर्यंत राणी लक्ष्मीबाई पारितोषिक मिळवलेल्या सर्व मानकन्यांमध्ये नीता वयाने सर्वांत लहान आहे. निशासारखेच यश मिळवीत तिची पुढे वाटचाल सुरू आहे.



# तुकारामांची अभंगवाणी

सौ. माधवी गंधे, तृतीय वर्ष साहित्य

तुकारामांच्या अभंगांविषयी मराठी माणसात अत्यंत जिव्हाळा व आपुलकी वाटते, त्याची अनेक कारणे आहेत. त्यांपैकी सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे तुकारामांच्या वाणीतून मराठी माणसाचे खरेखुरे मन जाणवते हे होय. ज्यास आजकाल अस्मिता असे म्हणतात, ती महाराष्ट्राची अस्मिता प्रातिनिधिक स्वरूपात कुठे जाणवत असेल तर ती तुकोबांच्या अभंगवाणीतूनच. या अभंगातील आत्मप्रत्ययाची धार जितकी तीव्र आहे, तितकीच त्या पाठीमागे असलेल्या मनाची तीव्र संवेदनशीलता क्षणाक्षणाला मन वेधून टाकते. तीव्र संवेदनशीलता आणि उत्कट भावानूभूतीचा परीसस्पर्श झालेली ही वाणी, उच्चारताच मराठी मनाच्या कानाकोपऱ्यात झंकारत राहते.

प्रतिष्ठित सांसारिक जीवनाचा दैवाने पुरा विस्कोट केल्यानंतर तुकाराम मुमुक्षू बनले आणि परंपरागत चालत आलेल्या विठ्ठलभक्तीचा मार्ग स्वीकारून आपल्या सामर्थ्याने भागवतसंप्रदायाचा कळस होऊन चिरंतन रूप पावले. या धडपडीमध्ये त्यांच्या मनातील आंतरिक संघर्षाचे बाह्य विश्वाशी असलेले नाते त्यांनी बरोबर ओळखले एकीकडे विश्वस्वरूपाचे भान ठेवून त्याची विठ्ठलभक्तीशी सांगड घालताना त्यांनी त्यांच्या काळात उपलब्ध असलेले भारतीय संस्कृतीचे विचारधन स्वानुभवाच्या कसोटीवर पारखून घेतले. संतांच्या उत्तरात त्यांना खराखुरा जीवनादर्श दिसून आला. त्यामुळे गीता, भागवत, ज्ञानदेव, नामदेव, एकनाथादी संतांचे खोल संस्कार त्यांच्या वाणीतून हुंकारत राहिला. आपुलाचि आपण मनाशी संवाद करीत, आपल्या अवतीभवती घडणाऱ्या घटनांच्या संदर्भात त्यांचा अर्थ त्यांनी शोधून काढला आणि तोच त्यांच्या अभंगवाणीतून उत्स्फूर्तपणे प्रकटत राहिला. ' वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा ' किंवा ' घोटविन लाळ ब्रह्मज्ञान्याहाती ' किंवा ' अणुरेणूहून थोकडा, तुका आकाशाएवढा ' अशा साक्षात्कारी सत्पुरुषाचा हुंकार त्यांच्या वाणीतून मोठ्या आत्मविश्वासाने निघाला आणि त्याने मराठी मनाचे संतांनी करीत आणलेले प्रबोधन पूर्णत्वास नेले.

तुकारामांच्या अभंगांतील एक विलोभनीय विशेष म्हणजे विरोधाभासात्मक (parodoxical) जीवन-प्रणालीचा त्यांनी ठायीठायी आविष्कार करून जीवनाच्या वास्तवस्वरूपाचा त्यांनी घेतलेला वेध. एकीकडे ' वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ' म्हणणारे निःस्पृह तुकोबा दुसरीकडे समाजातील ढोंगधत्तुऱ्यावर घणाघाती प्रहार करतात. संतांची त्यांनी रेखाटलेली सारी चित्रे अशीच विरोधाभासात्मक आहेत. त्यांच्या मते द्वैत, अद्वैत, हाही विरोधाभासच आणि म्हणूनच परमेश्वराच्या सगुणसाकार स्वरूपाचे भक्तियुक्त गान ते उत्कटतेने गाताना आढळतात.

' सुंदर ते ध्यान उभे विटेवरी कर कटावरी ठेवूनिया' असे म्हणून देवाला ते दृढ आलिंगन देतात. त्याच्याशी गुजगोष्टी करतात. या शक्तीमुळे सर्व जग ' विष्णुमय ' होते. म्हणजेच अद्वैत स्थिती आली तर भक्ती करण्याचे सुख हरपेल. ' भक्ती म्हणजे लाचारी किंवा दीनवाणेपणा नव्हे तर भक्ताचे व्यक्तित्व अधिकाधिक सकस व संपन्न बनविणारी ती एक प्रेरणा आहे ' असे गं. बा. सरदार यांनी म्हटले आहे. विठ्ठलाला ते माऊली म्हणून साद घालतात. तो त्यांचा प्राणसखा आहे. सर्वस्व आहे.

तुकाराम हे महाराष्ट्रातील भागवतधर्माचे एक प्रभावी प्रवक्ते होते. त्यांचे समाजातील अवलोकन इतके तीव्र होते की, समाजात चालणारा ढोंगीपणा, ढोंगधत्तुरा, बुवाबाजी, समाजकंटकांच्या कारवाया यांवर त्यांनी प्रखर हल्ला केला. तो हल्ला करताना मेणाहुनी मऊ असलेले ते कठोर बनले. त्याबाबतीत कोणाचीही पर्वा त्यांनी बाळगली नाही.

भक्तीचा प्रचार करताना प्रापंचिकानी कसे वागावे हेही त्यांनी सांगितले. ' जोडोनिया धन उत्तम वेव्हारे, उदास विचारे वेच करी ', लौकिक जीवनात पैशाला महत्त्व आहे किंबहुना पैशाशिवाय प्रपंच करताच येणार नाही याची जाण त्यांना आहे. पण हा प्रपंच ' उदास विचारे ' केल्यास परमेश्वर दूर नाही. या अभंगात ' निष्काम कर्मयोग ' सांगितला आहे. आदर्श गृहस्थ कसा असावा हे ते या अभंगात सांगताना दिसतात.

साधुत्वाचे लक्षण सांगणारा प्रसिद्ध अभंग ' जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा ' हा होय.

' आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ' किंवा ' आपुलिया बळे नाही मी बोलत, सखा भगवंत वाचा त्याची ' या अभंगावरून कवित्व ही ईश्वराची देणगी आहे असे त्यांना वाटत असे.

तुकोबांचे अभंग म्हणजे उत्कट भावगीतेच आहेत असे प्रि. वा. ब. पटवर्धन यांनी केव्हाच म्हणून ठेविले आहे. कारण तुकोबांचे अभंग वाचीत असताना त्यातील प्रतिमा डोळ्यासमोर उभ्या राहतात. त्यांची वाणी खास मराठमोळी आहे. सोपे पण साधे शब्द वापरून नेमका आशय डोळ्यासमोर उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेत आहे. मनातला अर्थ थोडक्यात विशद करून आपली कल्पना ते समर्पक रीतीने मांडतात. उदा. ' साधुसंत येती घरा, तोचि दिवाळी दसरा ', ' विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ', ' दया तिचे नाव भूतांचे पाळण, आणिक निर्दाळण कंटकांचे ' अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. त्यांच्या अभंगांच्या अनेक ओळी मराठीतील सुभाषिते होऊन गेली आहेत

तुकारामांच्या अभंगांचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, संसारातील हास्यरस त्यांनी जागोजाग टीपला आहे पंढरपूरला जाणारी सासू वेशीपासून परत घरी येते. तिची संसाराची माया सुटत नाही हे परिणामकारकतेने सांगितले आहे.

तुकारामाच्या अभंगात प्रपंच आहे, परमार्थ आहे व काव्य आहे. त्यामुळेच त्यांचे काव्य श्रेष्ठ ठरले आहे.

तुकारामांच्या अभंगाचे महत्त्व प्रा. वा. ब. पटवर्धन, ल. रा. पांगारकर, शं. गो. तुळपुळे, वा. ल. कुलकर्णी, गं. बा. सरदार, रा. ग. जाधव इत्यादिकांनी मोठ्या परिणामकारकतेने वर्णिले आहे. चटकदार, आटोपशीर, ओजस्वी वाणी, त्यातील सूत्ररूपता आणि अल्पाक्षररमणीयता, खणखणीतपणा, त्यांच्या वचनांत आढळून येणारी सुभाषितातील अंतर्बाह्य सुससंगती, सुव्यव्यस्था आणि तालबद्धता आणि भावनेचा उत्कट आणि उत्स्फूर्त उद्‌गार यांची त्यांनी गाठलेली परिसीमा इ. वैशिष्टचे त्यांचे अभंग वाचताना पुन:पुन्हा जाणवतात. इतक्या साऱ्या वैशिष्टयांनी क्वचितच काव्य असते.

म्हणून ' अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ' असे म्हटले जाते.



# ॥ कविता ॥



## किंमत

एका उदास संध्याकाळी
मीच होते ती
नि:शब्द, अगतिक
तुमच्याच स्नेहासाठी ...!!
त्यावेळी तुमच्या स्वप्नांना दिशाच नव्हती !
आता भर उन्हात
पाठ फिरवून
मी अनवाणी रस्ता शोधते
तेव्हा तुम्हाला आश्चर्य वाटते
माझ्या वेदनांना पाय कसे नाहीत ?
सर्वांनाच नाकारलेय मी
खऱ्या खोट्या भावनांच्या संभ्रमात
मी आता अडकणार नाही
कारण दोस्तांनो,
किंमत शब्दांना नसते,–
ती असते माणसांना !!

सविता कुलकर्णी
तृ. व. शास्त्र

## शाप

प्रत्येक पाखराचे
आकाशाशी नाते असते,
हे आपले उगाचच
सांगणाऱ्याबद्दल आदर
वगैरे दाखवायचा,
म्हणूनच खरे मानायचे !
नाहीतर एरवी,
विसरलेल्या शपथाच
प्रश्नांची मालिका का बनतात ?
आणि
माझ्या भटक्या एकटेपणातच
माझ्या स्वप्नांना शाप का मिळतात ?

सविता कुलकर्णी
तृ. व. शास्त्र

# काटा

गुलाबाच्या काटचा असा रडतोस कारे ?'
काय सांगू मित्रा, माझी कहाणी
एक होती कळी
माझ्याच खांदयावर बागडाची खेळायची
आणि आम्ही दोघे हवेच्या मंद झुळकावर
नाचायचो
नंतर ती कळी उमलली आणि फूल झाली
आता तिला मी नको झालो
कारण तिचे मित्र आता बदलले होते
तिला हवे होते स्वर्णभ्रमर
जे तिच्यावर मुग्ध होते
ती माझा तिटकारा करायची
कारण मी तिच्या स्वर्णभ्रमरांना बोचायचो
आता सांग मित्रा मी काय करू ?'
'धीर धर मित्रा
जेव्हा ते स्वर्णभ्रमर तिचा
मधुरस शोषून निघून जातील
तेव्हा ती तुझ्याच बाहुपाशात पडेल

सतीश कांबळे, तृ. व. शास्त्र

# दिवास्वप्ने

सगळेच झाले ...
आश्वासनं देणारे, आशा लावणारे
माणसानं ...
किती व्यवहारी बनावं ?
आणि ...
आणि ...
निराशेतच पिचून जावं ? ?
दूरच जायचं होतं
तर वाटेतच यायचं नव्हतंस
प्रेमच करायचं होतं
तर विसरायचं नव्हतंस
शेवटी तूही एक प्रवाहच ठरलास
बांधलेलं घरटं मोडणारा
आणि ...
मीही वेडी विसरले
की,
वाळूची घरटी ही
प्रवाहाबरोबर वहात जायची
शेवटी तीही स्वप्नंच
कधीही प्रत्यक्षात न येणारी
दिवास्वप्नंच ...

शुभदा थिटे, तृ. वर्ष साहित्य

# नवकवि

'पद्य' नामक पंक्तींतून धडपडत
अनर्थाच्या दिवारी खडचा करणारा
विदूषकी करायची
शाब्दिक कोलांटचा मारायच्या
गगनकळीही तोडायची
अरेरेऽरे उप्परवाल्या,
जो तो कविता वाचताच म्हणतो
अर्थाच्या गल्लीबोळात डोकावून
मी एक नवकवि!
आखूड कुजक्या पदयावलींवरून
बुटकी प्रतिभा घेऊन
बस्स हाच आमचा धंदा !
कुठून बरे मी मारली झक !
'अॅन्सीनच हवी.'

अशोक भोसले प्र. व. साहित्य

# अडीच शब्द

शब्दांच्या जळत्या प्रेतावर
फुलती शब्दांचे निखारे
जन्म घेती शब्दज्वाला
शब्द जाळती घरे दारे

शब्द पोळचांना चिकटती
मधु--मक्षिका का हचा व्यर्थ
अज्ञानी मानव करीसी
शब्दास्तव केवढा अनर्थ ?

उदार दाता कर्ण कुठे
किती निपजती दानशूर
पाऊस पैशाचा शब्दासाठी
शते रक्ताचे होती दूर

स्वाभिमानाची आहुती
देऊनी पसरती झोळचा
दीन दुबळे उचलती
उच्छिष्टांच्या पत्रावळचा

तुरुंगवास हा शब्दांचा
शब्द भिंती अन शब्द कडे
शब्दाच्या वर्तुळात जसे
गुंडाळती रेशमी किडे

कोण धर्म काय वर्ण
एकच रक्त अन मांस दाडे
केवळ सापळे शब्दांचे
मानवा हाच का, विसर पडे ?

राजेंद्र पारसकर, द्वि. व. साहित्य

# सी. रामचंद्रकी यादमें

बहाते है आंसू तेरी यादमें
तू गया हमे तेरे गीतोंका सहारा
उजड गया दुनियासे चमकता सितारा
गीत नहीं दर्द था वह तेरा
तू नहीं गीत हैं तेरे साथ हमारे
पल-पल याद दिलाते रहेंगे दर्दभरे अफसानें
दर्दभरे अफसाने.....

--एस्. पी. मोरे १२ वी 'कला'

# ‘भास’

हे ग्रिष्मातलं
भर दुपारचं भयंकर ऊन
त्यात, तू म्हणालीस
‘गुड आफ्टर नून’
अन् मग नूनचे
क्षणात झाले स्वीट मून

**बी. एच. थोरात, प्र. व वाणिज्य**

# आक्रोश

आमच्या निर्जीव नजरांच्या पलीकडे
आमच्या मनात पेटलेल्या
भयावह वादळांची चाहूल
तर, आमच्या पावलांनादेखील लागत नाही !
येथे रस्त्यावर–प्रत्येक क्षणी
जेव्हा माणुसकी मातीमोल होत असते,
तेव्हा आम्ही रंगवित असतो
सॉफिस्टिकेटेड स्वप्नं !
कधी त्याचवेळी
स्वत:ला निराशेच्या कोषात गुंडाळून
उबवित असतो आम्ही
अंधारपुत्राचीच अंडी ! ! !
क्वचित कोठेतरी
युगानुयुगे आमच्यासारख्याच
षंढांची जोपासना करणाऱ्या
‘त्या महान संस्कृतीचा’ जयजयकारही ! !
माझ्या डोळ्यातील पाणी . . .
अरे लहान्या, तुझ्या वेदनेसाठी नव्हते !
ते तर होते, माझ्या दुबळेपणासाठी !
प्रस्थापित सत्याविरूद्ध,
समाजाविरूद्ध, व्यवस्थेविरूद्ध
जाण्याची माझी ताकद जेव्हा संपते,
तेव्हा माझ्याही मनाचा
चालू असतो
पिळवटून टाकणारा
आक्रोश ! !

**सबिता कुलकर्णी**
तृ. व शास्त्र

# हे जग

त्रासलेल्यांना त्रास देते हे जग
डुबताहेत त्यांना डुबवते हे जग
आपल्या घरात मात्र करते दिवाळी
पण, गरिबांचे दिवे विझवते हे जग
हे ईश्वरा किती दुष्ट आहेत हे तुझे जगवाले
बाहेरून आहेत प्रकाशमय परंतु आहेत मनातून काळे
जाणून आहोत आम्ही, हे जग आमचं नाही
इथे गरिबांचा कोणी कैवारी नाही
आमचे सुख हिरावून घेते हे जग
कोणताही दिवस आमचा सुखाचा नाही
सांग हे भगवंता,
असं किती काळ रहाव लागेल आम्हाला !
तुझ्याकडेच आमची तक्रार आहे ! !

**अशोक गावडे**
तृतीय वर्ष वाणिज्य

# साधू ! साधू !

मागच्या महिन्यात शेजारी आमच्या
एक मोठे साधू आले
आल्याआल्याच त्यांनी सर्वांना
फार मोठे उपदेश केले
त्यांच्या त्या उपदेशांनी
चाळीतले लोक भारावले
दिवसभर साधूंच्या सहवासात
भजनकीर्तनभोजन केले
त्यानंतर एक तास
साधूंचे प्रवचन झाले
प्रवचनात त्या साधूंनी
श्रीकृष्णाचे उदाहरण दिले
लोणी दही कसा चोरायचा
सर्वांना नीट पटवून दिले
संध्याकाळी दर्शन घेवून
सर्वजण परत गेले
आणि त्याच रात्री त्या साधूने
शेजाऱ्यांचे घर रिकामे केले !

**राजन वडगांवकर**, तृ. व. शास्त्र

# पदवी आणि त्या !

तुला मिळवण्याकरता
वयाची २२ वर्षे वाया घालवली
दिवसरात्र एक केले
सारी अक्कल वाया घालवली
प्रयत्न खूप करूनसुद्धा
एकेका वर्गात दोन वर्षे घालवली
२२ वर्षांच्या खटपटीनंतर
तुला मात्र मी मिळवली
तुला मिळवल्यानंतर पण......
नोकरी आणि छोकरी
पण 'त्या' नाही मिळाल्या,
मिळणे कठीण आहे

**राजन वडगांकर**, तृ. व. शास्त्र

# चीज़ बुरी

चीज़ बुरी इश्क भी
चीज़ बुरी शराब भी
प्यास दोनों की बुरी
पीनेवाले की किस्मत बुरी
सीने से लगी दिलमें उतरी
बहुत पी जाओ बनी छुरी
नशा दोनों का बहुत जहरी
हवस से उतारे दुनिया सारी
इस में है गम-ए-मौत भरी
मत पियो यारों
ये चीज़ बुरी.

इमतिया शेख, द्वि. वर्ष, साहित्य



# ' भविष्य '

तुम्हारी खुबसूरती और
मेरी काबिलियत का
न मेल है
न कोई समाधान है
इस समस्या का
न मैं माली
और न दे सकता गाली
छुऊँ तो जलने का डर है
देखूँ तो चकाचौंध से आँखे मूँदती है
प्यार तो प्यार है
उस का क्या भविष्य ?
नसीब किसका ?
बालों का ?
चरण का ?
शाहा सेज का ?
या कुम्हलाने का ?
क्या भविष्य है तुम्हारा !
क्या ना जाने भविष्य भी ?

सुनील पवार, तृ. वर्ष साहित्य

## फर्क

फूल
उसपर भी गिर रहे थे
फूल
मुझपर भी गिर रहे थे
संगी
उसके भी थे
साथी
उसके भी थे
सिर्फ फर्क
इतनाही था कि
वो डोलीमें थी
मैं जनाजे पे था।

सुनील शहा, द्वि. वर्ष, वाणिज्य

## कर्मठ

उसकी दबी, घुटी आवाज
पहाडों से टकराकर रह जाएगी।
उसके टूटे बिखरे मोती
समेट कर लाने के लिए
कोई नहीं आएगा।
उसका खडा रहना
रेत के ढेर-सा है
फिर भी वह टूटना नहीं चाहता
न ढहना न बहना चाहता है।
वह जानता है
झूठी सहानुभूति और खोखली सान्त्वना को
नफरत है उसे इन सब की
कोरे दिखावे की।
उसे पूर्ण विश्वास है
चुकाना अभीभी बाकी है
किरणों का संदेश दूर-दूर तक पहुँचाना
वह पहचानता है रात को
जबतक रात है तब तक सुबह के लिए
रुकना है उसे।

– शैवालिनी गोस्वामी, तृ. व. विज्ञान

## सोवेनियर


जिन्दगी के कारवाँ की
आनेवाली मंजिलों को
सब मिलकर सहेज के
आओ,
प्रण कर ले हम आज
मानवता, प्रेम, अनुराग
के माथेपर चुम्बन अंकित कर
खींच दे चाहत की लक्षण रेखा
कोई न कह सके फिर
कि रेत के सूखे बियाबान में
साहिल नहीं मिला करते।

– एम्. अरिफ शेख, तृ. व. विज्ञान

## ' चाहत '

न चाहत मुझको चन्द्रमा को छूने की
न चाहत मुझको सितारों को तोडने की
चाहत है मुझको शीतलता तक पहुँचने की
चाहत है मुझको रोशनी में चलते रहने की
मधुबन में स्थान के बजाय पंकज बनकर
खिलना है मुझको
प्रदीर्घ जीवन के बजाय चन्दन बनकर
जीना है मुझको।

**शैवालिनी गोस्वामी**, तृ. व. विज्ञान



## होना जरूरी है !

होना जरूरी है,
दिये में बत्ती का, चाय में पत्ती का।
होना जरूरी है,
बच्चों में खेल का, पकौडी में तेल का।
होना जरूरी है,
लडाई में तलवार का, नाव में पतवार का।
होना जरूरी है,
आकाश में हवा का, अस्पताल में दवा का।
युद्ध में वीर का, धनुष्य में तीर का,
राटाय में शरणार्थी का, शिक्षालय में विद्यार्थी का,
होना जरूरी है।
होना जरूरी है !!

**वन्दना आगरवाल**, एफ्. वाय् जे. सी.

## दुःख

मैंने ओंस की बूँदों को
किसलयों से गिरते देखा है
तुम्हारा सुलभ सौन्दर्य
मुझे दुःख देता है।
मैंने बादलों को सँवरते–बरसते दोखा है
तुम्हारी खुशबु
तन मन की असीम गहराई तक
छा जाती है
मैंने कली को निखरते देखा है
तुम्हारी छुअन
मेरे भीतर अकुलाने लगती है।

**एम्. आरिफ**, तृ. वर्ष विज्ञान

# अनाथ

रेणु आयंगार, द्वितीय वर्ष शास्त्र

दुपारचा तीनचा चहा झाल्यापासून ती खूपच अस्वस्थ झाली होती. ऑफिसमध्ये आज तिचे लक्षच लागत नव्हते. ती सारखी समोरच्या घड्याळाकडे केव्हा चार वाजतात याकडे बघत होती. तेव्हा शेजारच्या टेबलावर बसलेल्या वीणाने तिला विचारले,

'अंजली, काय झाले तुला ?'

'कुठे ? काही नाही गं !'

'मग अशी खोयीखोयीशी का ?'

'चल काहीतरीच काय ?'

परंतु तिचे लक्ष ठिकाणावर नव्हते. आज जवळजवळ आठवड्यानी तिला अतुल भेटणार होता. मागचे सहा दिवस तो कंपनीच्या कामामुळे गावाला गेला होता. परंतु अंजलीला हा विरह अगदी सहन झाला नाही. आपला जीव त्याच्यात गुंतलाय याची तिला जाणीव झाली. खूप उत्सुकतेने ती आजच्या दिवसाची वाट पाहात होती.

तो दिवसही अखेर उजाडला. त्याला यायला फक्त एकच तास होता. साडे तीनला पुन्हा तिने तोंड धुतले व हलकासा मेकअप केला. आज आपल्याला घरी यायला थोडा उशीर होईल असे ती सांगून आली होती. आता चार वाजायला काही मिनिटे कमी असताना ती ऑफीसमधून बाहेर पडली. बसस्टॉपसमोरच अतुल उभा होता. तिला पाहताच त्याने स्कूटरची किक् मारली आणि ती मागे बसली हे पाहून त्याने स्कूटर स्टार्ट केली दोघे बागेत आले शब्दांनी आणि स्पर्शांनी बरेच बोलून झाले होते. तरीपण अजून बोलायचे राहिले होते.

'अंजू, मी मम्मीजवळ बोललोय, तुझ्याबद्दल.'

'काय, सांगितलेस ?'

'फक्त लग्न करणार आहे, एवढेच नाही सांगितले.'

'बरं, मग ते कधी सांगणार ?'

'तुला घरी नेईन, तेव्हा ! सांग कधी येतेस ?'

'कधीही चालेल, आतासुद्धा चालेल.'

'का ग ! लग्नाची एवढी काय घाई आहे ?'

'ए, तू माझ्याबद्दल काही सांगितलेस का घरी ?'

'अं हं ! बिलकुल नाही.'

'का ..?'

'भीती वाटतेय का ?'

'. ......'

'अशी गप्प का ? आई–बाबा नको म्हणतील ?'

'तसे नाही, पण तुझ्याकडून अगोदर हो म्हणू दे.'

'म्हणजे...'

'हो असेल तरच, मी आईला विचारू शकेन.'

'अंजू, माझ्या घरी नाही म्हणण्याचा प्रश्नच नाही. आमच्या घरी स्वतंत्र वातावरण आहे. मी म्हणेन तिच्याशी मी लग्न करू शकतो.'

'बरं, ठीक आहे मग मी लवकरच विचारीन.'

'मग, उद्या येतेस आमच्याकडे.'

'हो, नक्की येईन.'

'मी तुला घ्यायला येईन.'

'अच्छा'

अतुलच्या मम्मी–डॅडीना अंजली खूप आवडली. नाही म्हटले तरी अतुलची पसंती होती. त्यांनी अगदी मनापासून तिचे स्वागत केले. अंजूलाही सगळे काही आवडले होते. ती घरी आली अगदी खुशीत. पण आईबाबांना अतुलबद्दल सांगण्याचा धीरच नव्हता. मनातल्या मनात दररोज विचारायचे ठरवायची. पण शेवटी दुसरेच काही तरी बोलायची. आता मात्र

अतुलला खूपच घाई झाली होती. ही का सांगत नाही हेच त्याला कळत नव्हते.

रविवारी, अंजू न्हायलेले केस वाळवत गाणे गुण-गुणत बसली होती. 'आयेगा आनेवाला...' इतक्यात तिची छोटी बहीण मंजू, धावतच आली आणि अंजूला म्हणाली.

'तायडे, तुला भेटायला कोणीतरी स्कूटरवर आलेय.'

अंजलीला एकदम कळून चुकले की अतुलच असणार. ती बाहेर आली तर अतुल अंगणात बसला होता. त्याला नमस्ते करून ती आत आली. आईला काही तरी करायला सांगितले आणि बाबांना अतुलशी गप्पा मारायला. नंतर ती स्वतः बाथरूममध्ये येऊन रडत बसली. काही वेळ तसाच गेल्यावर अंजू अजून बाहेर आली नाही हे पाहून आईने दार उघडायला सांगितले. परंतु तिने उघडले नाही. शेवटी अतुल आल्यावर तिने दार उघडले. आणि रडता रडता हसू लागली. नंतर आईनेही अतुलला जेवल्याशिवाय सोडले नाही. कारण जावई होणार होता तो. अंजूच्या घरातील सर्वांना अतुल आवडला होता.

आता अतुल कुठे गावाला असेल तर पत्रे, गावात असेल तर फोनवर संभाषण होई. त्यानंतर हॉटेल, शॉपिंग, सिनेमा, नाटक...आणि दोघे एकमेकात केव्हा गुंतली हे दोघांनाही कळले नाही. शेवटी दोघांच्या घरचा पाठिंबा मिळाला होता. आता फक्त साखरपुडा आणि मग लग्न.

साखरपुड्याची तारीख नक्की झाली होती. त्यानंतर एक महिन्याने लग्न. दोन्ही घरांमध्ये धावपळ सुरू झाली तयारीची. अंजूने ऑफिसमधून सुट्टी घेतली दोन महिन्यांची. नंतर एके दिवशी अंजली अतुलबरोबर सिनेमा बघायला गेली होती. आई घरामध्ये एकटीच होती. बाबा घरी आले ते अगदी घामाघूम होऊन ! त्यांना असे पाहून आई खूप घाबरली. ते निवांत झाल्यावर तिला जरा बरे वाटले.

'काय झाले हो तुम्हाला ?'

बाबा काही बोलले नाहीत परंतु मनापासून हसले नाहीत.

'अंजू कुठे आहे ?'

'बाहेर अतुल बरोबर गेली आहे.'

'मला काही सांगायचंय तुला. माझा मित्र सुनील, त्याला मी अंजूच्या लग्नाची बातमी सांगितलीय.'

'तोच, का जो अनाथाश्रम चालवतो.'

'हो, तोच. त्याने माझे अभिनंदन केले व त्याबरोबर एक गोष्ट सांगितली, परंतु माझा त्यावर विश्वासच बसला नाही. शेवटी त्याने मला ऑफिसमध्ये नेऊन पुरावा दिला. की जेव्हा अतुल पाच दिवसांचा होता, तेव्हा तो अनाथश्रमात होता. एक महिना झाल्यावर मम्मी–डॅडीनी त्याला दत्तक घेतले व त्याला परके वाटू दिले नाही.

हे ऐकून आई तर खालीच बसली व म्हणाली,

'आपले घराणे खानदानी आहे, मी हे लग्न होऊन देणार नाही. त्याच्या आईबाबांचा पत्ताच नाही.'

हा संवाद होत असताना अंजली घरी आली. जेव्हा तिने ऐकले तेव्हा ती म्हणाली,

'पण बाबा, मी जात-धर्मापेक्षा माणुसकीला जास्त महत्त्व देते. अतुलला अनाथ करणाऱ्या आई-बाबापेक्षा त्याला सांभाळणारे मम्मी-डॅडीच श्रेष्ठ आहेत.'

'तू काही आम्हाला शिकवू नकोस. हे ऐकायला ठीक, परंतु आचारणात आणणे अशक्य आहे. आपण खानदानी माणसे, रस्त्यावरच्या त्या माणसाशी नाते जोडायचे '


'हे शक्य नाही बाबा, अतुलच माझे सर्वस्व आहे !'

'मग आमच्या शिवाय जग, अगदी सुखाने संसार कर.'

'अंजली, तुझे बाबा जे म्हणतात ते ठीकच आहे. आम्हाला कोणी मुलगा नाही. तर तुझी मुलंबाळे खेळवत सुखाने डोळे मिटले असते'

हे सारे सहन न होऊन अंजली रडू लागली. काय करावे तिला कळतच नव्हते. एकीकडे तिला अतुलला सोडणे शक्य नव्हते. आणि दुसरीकडे आई-बाबांनाही ! मधल्यामधे तिचे काय ? दोष कोणाचा होता ? अतुलला जन्म देणाऱ्या आई-बाबांचा का समाजाचा हे विचार मनात असताना तिला नुकत्याच तिच्या पोटात रुजलेल्या अतुलच्या बीजाची आठवण झाली. त्या जीव फुटलेल्या बिजाला अनाथपणाचे कुंपण लवकरच लाभणार होते ! ! पण·····

# 'एफ्–१६' फायटिंग फाल्कन



दीपक बिचे, तृतीय वर्ष वाणिज्य

'एफ् १६' हे विमान अमेरिकेत जनरल डायनॅमिक्स कंपनीने तयार केले आहे. या विमानाची किंमत १५ कोटी रुपये आहे.

विमानात फक्त एक वैमानिकच बसू शकतो. याच्या पंखाचा आकार अर्धत्रिभुजाकृती असून विमानाच्या बुंध्याची व पंखाची सांगडसुद्धा विमानाला हवेत तरंगायला मदत करते. पंखाच्या समोरच्या बाजूला असलेले स्वयंचलित क्लॅप्स कॉम्प्यूटरद्वारा वरखाली होतात. त्यांचा उपयोग मुख्यतः विमान जेव्हा उच्च अँगल ऑफ अॅटकने उड्डाण करते तेव्हा होतो. पंखांच्या शेवटच्या भागात क्लॅपरॉन आहेत. त्यांचा जास्तीत-जास्त वेग प्रतिसेकंदाला ८० अंश आहे.

विमानाचे एंजिन प्रॅट आणि व्हिटनीचे एफ्–१०० पी. डब्ल्यू–२०० असून त्याची शक्ती २५००० पौंड आहे. इंधनाच्या टाक्या पंखात व बुंध्यात आहेत. त्यात एकंदर ३१६२ किलो वजनाचे इंधन नेता येते. बाहेरील तीन स्थानकांवर विमानाची ये-जा करण्याकरता प्रत्येक पंखाखाली १४०० व बुंध्याखाली ११३६ लिटरच्या टाक्या बसविता येतात.

टेकस्टार कंपनीने पॉलीकारबोनेट या अत्याधुनिक प्लास्टिकपासून बनविलेल्या छत्रातून (कॅनपी) वैमानिकाला चौफेर दिसू शकते. वैमानिकाचे आसन क्षितिजपातळीपासून ३० अंशाचे कोन करते. विमानाची रूंदी ९.४५ मी. लांबी १४.५२ मी. व उंची ५.०१ मी. आहे. रिकाम्या विमानाचे वजन ६८६६ किलो, अशा अजस्त्र व वेगवान धुडाचे नियंत्रण 'कंट्रोल कान्फिगर्ड व्हेईकल' या तत्त्वावर केले जाते.

रडार, रेडिओ, मित्रशत्रू ओळखण्याचे यंत्र, विमानाची ये-जा करण्यास लागणारी विविध यंत्रे, विमाना बाहेरील रडारच्या लाटा आल्यास मिळणारा संकेत, हेड अप डिस्प्ले अशा विविध यंत्रांनी हे विमान परिपूर्ण झालेले आहे.

जनरल इलेक्ट्रिक कंपनीची एम ६१ ए–१ नावाची २० मि. मी. व्यासाची अनेक नळकांड्यांची एक तोफ एकेवेळी ५०० काडतुसे नेऊ शकते. ही विमानाच्या डाव्या बाजूला पंख व बुंध्याच्या जोडात बसविलेली आहे. शस्त्रात्रे नेण्याकरिता पंखांच्या टोकांवर दोन विमानभेदी क्षेपणास्त्रे नेण्याची सोय आहे. त्याचप्रमाणे बुंध्यांच्या खाली एक व पंखांच्या खाली सहा स्थानकांवर शस्त्रात्रे नेता येतात. विमानातील आतल्या इंधनाच्या टाक्या संपूर्ण भरल्या असताना सुमारे ५४४३ किलो वजनाचा दारूगोळा या विमानाद्वारे नेता येतो. इतक्या इंधनाची जरूर नसल्यास, ते कमी करून ६८९४ किलो वजनाचा युद्धाचा माल नेता येतो.

युद्धाला सुसज्ज अशा विमानात, पंखांच्या टोकावर दोन साईड वाईंडर विमानभेदी क्षेपणास्त्रे असतील. पंखाच्या बाह्यस्थानकावर प्रत्येक पंखाखाली एक अशा १४०० लिटरच्या दोन इंधनाच्या टाक्या, बुंध्याच्या खाली एक ११३६ लिटरची इंधनाची आणखी एक टाकी किंवा एक २२०० पौंडी बॉंब, तर बुंधा व उजव्या पंखाच्या जोडात मार्टिन मरिएटा कंपनीचा एक 'पेव्ह पेनी लेसर ट्रॅकर' असते. तसेच आतील चार स्थानकांवर निरनिराळ्या प्रकारचे बॉंब किंवा जमिनीवरील अथवा समुद्रावरील लक्ष्ये टिपण्याची क्षेपणास्त्रे किंवा अग्निबाण असतील. शत्रूच्या रडारला भुलविण्याकरिता इलेक्ट्रॉनिक 'जॅमर' बसविण्याची सोय केली आहे.

त्याचप्रमाणे रडार नियंत्रित स्पॅरो 'वे स्कायफ्लॅश' विमानभेदी क्षेपणास्त्रे, टी. व्ही. द्वारे नेमबाजी केलेली 'माव्हेरिक' भू किंवा जलावरील लक्ष्यभेदी क्षेपणास्त्रे, जी बी यू–१० आणि जी बी यू–१६ नावाचे लेसरद्वारे नेमबाजी केलेले बॉंब यांची चाचणी यशस्वी झालेली आहे.

याचा पल्ला, विमान जर एका पासून दुसऱ्या टोकापर्यंत न्यायचे असेल तर (बाहेरील इंधन टाक्यांसह) ३८९० कि. मी. आहे. युद्धात ते ९२५ कि. मी. दूर असलेले लक्ष टिपू शकेल. पंख क्षितिजाला समांतर असताना याचा जास्तीतजास्त वेग २ माक आहे.

# नायकांच्या अभिनयाने दुर्दैवी ठरलेली चित्रपटसृष्टी !



नीलिमा शिकारखाने, तृ. व. वाणिज्य

ध्वनीच्या आगमनाने भारावलेल्या चित्रपटांनी दोन लोकप्रिय नायकांना जन्म दिला. एक पृथ्वीराज कपूर— तगडे व्यक्तिमत्त्व, ' रोमन ' चेहरा, पठाणी आविर्भाव व खास खर्जातला आवाज यांमुळे पृथ्वीराज गाजला. खरे पाहता आवाजाच्या पट्टीत अभिनय कधी बसलाच नाही. दुसरा नायक म्हणजे कुंदनलाल सैगल—अगदी साधा, सरळ. स्वाभाविक असे भारतीय व्यक्तिमत्त्व पण अभिनयापेक्षा गायनशैलीनेच तो खरा लोकप्रिय ठरला. मात्र दोघांचाही भारतीय चित्रपटाबाबत विचार करता, त्यादृष्टीने हानीच झाली. आवाजाला व गाण्यास अतिरेकी महत्त्व देऊन चित्रपटाचे लोकनाटच करण्यात या दोघांनी भर घातली.

' अशोककुमारच्या ' किस्मतमुळे चित्रपटनायकाचा एकूण अवतारच बदलला. प्रेम व चोरी हा धंदा असलेला रंगेल नायक, पोलिसांना मूर्ख बनवणे, कायदा मोडणे अशा प्रकारच्या नायकाच्या प्रतिमा त्याने रंगवल्या. आजपर्यंत पलायनवादी चित्रपटांची ' नायक–प्रतिमा ' त्यामुळे पोसली गेली. पण सदाबहार ठरलेला हा नट मात्र त्यात फिट बसला नाही.

प्रेक्षकांचे मनोरंजन अनेकांनी केले, पण त्यांच्याच जगण्यातला जिवंतपणा साकार करणारा मोतीलाल हा एकमेव नायक ठरला. भरभर चालीचा, अभिमानी नट असंख्य तरुणींना वेड लावून तसाच भर्रकन निघून गेला. याच काळात उदास दिवास्वप्ने पाहणाऱ्या प्रियकराची भूमिका सुरेंद्रने साकारली.

चौथ्या दशकाच्या शेवटी दिग्दर्शकांनीच नायकाच्या भूमिका वटवल्या. व्ही. शांताराम, आवाजकी दुनियावाले दोस्तोंको सलाम ठोकणारा सोहराब मोदी, दुष्ट स्वभावाच्या नायकाची प्रतिमा उभी करणारा किशोर शाहू व लोकांना आवडणाऱ्या भूमिका रंगवणारे गजानन जागिरदार. यानंतर पाचव्या दशकाच्या प्रारंभी नायकाची पोकळी निर्माण झाली होती पण राजकपूर, देवआनंद, दिलीपकुमार या त्रिमूर्तींच्या आगमनाने ती भरुन निघाली.

अचूक पण किमान अभिनय, संवाद उच्चारांची खास शैली यांद्वारे दिलीपकुमारने प्रेक्षकांस ग्रासून टाकले व चित्रपटशौकीनांवर प्रभुत्व मिळवले. स्वतःच्याच दुःखात हरवलेल्या, सलत्या भावनांशी हितगुज करणाऱ्या अंतर्मुख नायकाशी त्याने नाते जोडले. त्याच्या ' नायका'च्या कारकीर्दीतील महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे सामान्य लोकांच्या न्यायासाठी झगडणाऱ्या संतप्त तरुणाची भूमिका. उदा. ' गंगा–जमुना ', ' नया दौर '; हिंदी चित्रपटातील तो पहिला बंडखोर नायक ठरला. अभिनयाच्या सीमारेषा त्यानेच आखून दिल्या. नेहमीच खेडूताची भूमिका त्याने केली, तर देवआनंदने शहरी छैलाबाबूच्या भूमिका रंगवल्या राजकपूरने देवआनंदशी पूर्णतः विरोधाभास साधून वेगळीच पण वैशिष्टयपूर्ण भूमिका रंगवली. देवआनंदने भारतीय ' ग्रेगरी पेक ' उभा केला, तर राजकपूरने चार्ली–चॅपलीनच्या ' ट्रॅम्प ' प्रतिमेची उसनवारी केली. दरिद्री, भोळा-भाबडा असा

प्रेमिक, कारुण्यपूर्ण हास्य, पण विदूषकी पेहराव अशी मूर्ति साकारली.

दुसरे महायुद्ध, स्वातंत्र्य–फाळणी या परिवर्तनामुळे सामाजिक मूल्ये बदलली व त्याचा परिणाम चित्रपटावर झाला. हा परिणाम पेलण्यासाठी गुरुदत्त, बलराज सहानी यांनी आधार दिला. दोघांनीही उराशी बाळगलेल्या उच्च जीवनधारणेच्या प्रेरणेतून असामान्य व विलक्षण भूमिका साकार केल्या. निखळ प्रामाणिकपणे केलेले प्रयत्न म्हणून त्यांचे विशेष कौतुक केले पाहिजे. संवेदनशील कलावंताव्यतिरिक्त गुरुदत्तने वेगळेपणा दाखवलाच नाही. तर रेखीव देखणेपणा, आकर्षक शारीरिक बनावट नसतानाही बलराज सहानीचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केला गेला, तो त्याच्या अभिनयाच्या बुलंद शक्तीमुळे.

१९६०–७० या काळात ढेपाळलेल्या गंभीर नायकाची प्रतिमा प्रथमच शम्मीकपूरने खोडून काढली. त्यानेही तत्कालीन एक जमाना दणाणून सोडला. त्यानंतर मात्र एका महान ' मदर इंडियाने ' महान नटांना जन्म दिला, ते म्हणजे–राजेंद्रकुमार, सुनीलदत्त, राजकुमार. अनाठाई प्रसिद्धीने गाजलेले हे महान चित्र–पुत्र होत.

राजकुमारने बाह्यस्वरूपात कठोर (चेहऱ्याच्या ठेवणीप्रमाणे) पण अंतर्मनात हळूवारपणा जपण्याची कोशीश केली. ज्यास समाजाने लाथाडले आहे व त्याचसाठी सारे पचवून समाजातील काही स्वार्थी व तुच्छ प्रवृत्तींना मोठ्या रुबाबात नाचवले अशी प्रतिमा साकार केली, पण त्यामुळे त्याच्या अभिनयाचा कस लावणे जमले नाही.

सातव्या दशकाच्या सुरवातीला गाजलेला पण अभिनयाशी फारकत असलेला हिरो म्हणजे धर्मेंद्र. त्याच्या जोडीला माकडचेष्टा करणारा जीतेंद्र, 'भारत' हे टोपण नाव घेऊन स्वदेशभक्तीचा झेंडा फडकावणारा मनोजकुमार व मधूनमधून चमकणारा शशीकपूर एवढ्यांचेच वारे वाहात होते. काही काळ लोटल्यावर आशेचा एक किरण चमकला–राजेश खन्ना. हसतमुख चेहरा, जुने व स्वतःचे असे ' ग्रेट मिक्सर ' त्याने सादर केले. एकाच प्रतिमेपासून दूर जाण्याचा त्याने प्रामाणिक प्रयत्न केला पण तो अपयशी ठरला. व्यक्तिरेखांची विविधता असूनही हा नायक जुन्या परंपरांचा एक नवा पोषकच ठरला.

कमीतकमी काळात प्रसिद्ध होणारा केवळ अमिताभच. केवळ सहाफूट उंची एवढेच भांडवल, पण चालू जमान्याशी तादात्म्य राखून अभिनय त्याला जमतो. अमिताभयुग अजूनही चालूच आहे. मल्टीस्टारचे युग असूनही एक अभिनेता मात्र अभिनयासाठी प्रख्यात आहे–संजीवकुमार. कोणत्याही भूमिकेत स्वतःस विसरून तीच व्यक्तिरेखा जिवंत करणारा समर्थ कलावंत. मात्र ठिसूळ दिग्दर्शन, उथळ कथानक यांमध्ये त्याचा अभिनय हरवतो आहे.

या साऱ्यांवरून लक्षात येते की, राज–देव–दिलीप सारखे युग की ज्यांच्या श्रेष्ठत्वासाठी लोक हमरी–तुमरीवर येत ते सारे संपले. कारण झटकन स्वीकारून पटकन् फेकून देण्याचा हा काळ आहे. थोडक्यात, लोकप्रिय नायकांच्या लाटा आता येणार नाहीत, कारण केवळ उडत्या गाण्यांवर उड्या मारणाऱ्या नायकांच्या गर्दीनेच निखालस, हलकं–फुलकं, जिवंत अभिनयाचे प्रामाणिक विश्व संपुष्टात आणले आहे.

# Bioluminescence

**Narendra M. Naidu, T. Y. B. Sc. Zoology.**

Beyond the east the sunrise, beyond the west the sea, and East & West the wander-thirst that will not let me be; It works in me like madness dear, to bid me say good-bye; for the seas call, and the stars call, and oh ! the call of the sky !

– Gerald Gould.

Nature's beauty lies in its unrevealed mysteries. She has been tempting mankind since ages to dive deep into her precious treasurers.

The twinkling sparks seen in a pitch dark forest at night or the shining, lashing waves of the sea have been one of the most fascinating events of nature. What is this exactly that brings about all this ? The twinkling sparks in, the dark are nothing but fire-flies, the tiny insects. In the case of the sea also it is found that certain animals living in the waters give out light, thus giving a brilliant, shiny appearance to the tossing waves.

The great waves of the Atlantic sweep storming on their way, shining green and silver with the hidden herring shoal;

The phenomenon by which certain animals have the capacity to emit light without producing heat is known as **Bioluminescence.**

(Bio : living organisms; Luminescence : emission of light).

Mostly animals dwelling in the sea waters are found to show this property, especially many fishes show luminescence.

There are different ways and means by which the animals produce light. It can be due to certain luminescing particles present all over the body in very tiny animals which cannot be seen by the naked eye. Sometimes a few animals like certain earthworms produce light by luminescent bacteria associated on their body which give out light.

A question naturally arises as to-How these animals can produce light and that too in such a variety of colours ?

To-doy, we know that there is a substance called **Luciferin** present in these animals. An enzyme called **Luciferase** brings about the oxidation of luciferin, thus emitting out light as a result. Such light emission is frequently found in the animals of sea-waters and no doubt it is interesting to man; but a rational mind wants to know the 'why' of things. Why the Bioluminescence ? Luminescence has probably many roles to play but few of which man could undertand and prove are :-


**Sexual attraction/Mating signals :-** Fire-flies and glow-worms use their light flashes as a mating signal. Even certain female fishes use the 'glowing' to attract the males.

**Production :-** Some sea-animals called **squids** give out luminous material to dazzle the enemy and thus escaping safely.

**Attraction of prey :-** Few insect larvac spin out long, sticky, glistening threads which tenyt the prey on which they leed. Also few deep sea-fishes have luminescent organs that attract the prey.

**Cohesion :** Certain animals like shrimps or fishes use the light to keep the colony together at night or in dark ocean depths.

One thing is certain that 'Bioluminescence'- though an interesting phenomenon has yet secrets unrevealed, specially the mechanism and the functions are the two important aspects which still demand work.



# यदि समाचार–पत्र न हों

संजीवनी कुलकर्णी, द्वितीय वर्ष साहित्य

सुबह मेरे जागने के लिए घडी का अलार्म बेकार है। समाचार–पत्रवाले द्वारा जब कुंडी खटखटायी जाती है तभी मैं जागती हूँ। " प्रभाते कर दर्शनम्..." आदि नहीं। प्रभाते समाचार पत्र दर्शनम्। जागते ही समाचार पत्र पर मैं वैसे ही झपट पडती हूँ जैसे बिल्ली चूहे पर। जब–जब भी पत्रवाला असमय आया है तब–तब मैं देर से ही जागी हूँ। जिस दिन समाचार पत्र बन्द होता है उस दिन जहाँतक मुझे याद है मैंने बोली टुचकारे, गालियाँ तक सुनी हैं। जिस दिन वृत्तपत्र नहीं निकलता उस दिन मेरे लिए दिन ही नहीं निकलता।

मेरी ही नहीं कितनों की सुबह चाय समाचार पत्र के साथ ही होती है। उनके लिए समाचार का और चाय के घूंट का क्रम रात–दिन का क्रम है। समाचार पत्र न हों तो इनके जीवन में मानो कयामत ही आ जाती है।

मेरे जागनें की बात छोडिए साहब ! समाचार पत्र न हो तो सारा देश न जागृत होगा न जागृत रहेगा। वर्तमाल काल में समाचर पत्र के बिना सम्पूर्ण देश में अन्धेरा छा जाएगा। 'केसरी' आदि समाचार पत्रों ने भारतीयों में वह चेतावनी तथा ऐसा जागरण पैदा किया जिससे भारत ने स्वाधीनता की सुबह देखी। वह कितनी मूर्खता है कि यदि कोई कहे 'आजाद होने के बाद अखबार न हों। स्वातंत्र्योत्तर काल में चीन तथा पाकिस्तान के जो आक्रमण हुए तब समाचार पत्र न होते तो देश की पुकार जनता तक कैसे पहुँचती ? आज भी आक्रमण का भय बराबर बना हुआ है। आज भी मुकाबले की ताकत सामाचार पत्र द्वारा पैदा हो सकती है।

एक जमाना था जब राजाओं का दरबार लगा करता। जनता दरबार में जाकर अपनी शिकायतें अत्याचार–अन्याय का ब्योरा देतीं। बीसवीं सदी में यह सम्भव कहाँ ? वृत्तपत्र ही आज ऐसा वाहक या दूत है जो जनता को दिल्ली तक पहुँचाता है। विशाल, भारत में जन–नेताओं को भी समाचार पत्र ही जनता तक पहुँचाता है। समाचार पत्र न हो तो जनता और शासक एक दूसरे के लिए बेगाने हो जाएगे। अखबार–रीढ की हड्डी के अभाव में लोकतन्त्र की देह कूबडी ही हो जाएगी। चुनाव भी समाचार पत्र के बल पर ही लडे जाते हैं। आपत्काल के बाद भारतीय केन्द्रशासन में जो परिवर्तन हुआ उसने दुनिया के सामने ऐसी मिसाल रखी कि लोकतन्त्र सचमुच लोगों द्वारा, लोगों के लिए एवं लोगोंका होता है। जमाना यह कैसे भूलेगा कि समाचार पत्र न होता तो क्या यह हो पाता ? समाचार–पत्र राजनीति–सागर का मन्थन करने वाला मेरु है।

भारत केवल आर्थिक मामले में विकसनशील देश नहीं है। सामाजिक या सांस्कृतिक परिवर्तन की माँग भी इस देश के वर्तमान की माँग है। कहाँ कन्याकुमारी और कहाँ काश्मिर ! क्या भाषा, क्या रहन–सहन, क्या परम्पराएँ ! कितने धर्म और सम्प्रदाय ! कितनी विचार प्रणालियाँ और कितना मतान्तर !! विविधताएँ ! यदि समाचार पत्र न होते तो विविधताओं में भी एकता या भारतीयता बनी रहती ? समाचार पत्र एकता का अध्यापक है। शिक्षक के बिना न शिक्षा

पूर्ण हो सकती है और न उसका निरीक्षण–परीक्षण। अखबार न हों तो एक समाज, एक संस्कृति का विवरण विश्लेषण अन्य समाज–संस्कृति तक कौन पहुँचाएगा ?

समाचार पत्र रोज का इतिहास होता है। वह समसामयिकता का, परिस्थिति, परिवेश का दर्पण है। समाचार पत्र न हों तो देश गूँगा हो जाएगा। बहरा हो जाएगा। भारत भारतीयता, समय, प्रगति से कट जाएगा। समाचार पत्र ने ही आज तक अन्यान्यता, समय एवं अपने बेगानी की दूरी को दूर किया है। आज कहीं भी रेल–दुर्घटना हो या कि बाढ का संकट हो, त्योहार–उत्सव की खुशियाँ हो कि उद्‌घाटन, संमेलन का आनन्द हो, वहाँकी जनता के प्रति सुदूर बसे भारतीय की सहानुभूति–संवेदना दिन ब दिन गहरी होती जा रही है। आज का भारतीय देश की समस्याओं के प्रति जितना भी सजग है वह वृत्तपत्र के कारण ही। समाचार पत्र न होता तो क्या भारतका भाग्य निर्माण इतना हो पाता ?

अथा तो ब्रह्म जिज्ञासा नहीं, अथा तो समाचार जिज्ञासा ! भारत का यह नया दर्शन है। अखबार के अभाव में भारतीय अपने जीवन से कट कर रह जाते। वैसे झटपटाते जैसे बिन पानी मछली। समाचार जिज्ञासा मनुष्य की प्रवृत्ति है। महाभारत का संजय हो कि लोगों में फैलती लोकवार्ताएँ–कथाएँ। समाचार पत्र यही परम्परा निभा रहा है। इसके अभाव में मनोविकृति का डर है।

समाचार पत्र जीवन का अंग है। अखबार हाथ में होना या पढते पाया जाना आधुनिकता और सभ्यता का लक्षण है। वृत्तपत्र न होंगे तो क्या इन प्रतिष्ठितों के पैर तले की जमीन नहीं हिलेगी ! बस स्टॉप पर यात्रा में हमारा टाईम पास भी तो नहीं होगा। जो बेचारे समाचार पत्र पढकर तथा समाचार सुनाकर नहीं थकते उनका तो जीवन ही रुक जाएगा। समय का या जीवन का रुक जाना एकाकीपन का ही शाप है। अपरिचितों से ताजाखबर की बात चलाकर या अखबार माँग कर उनसे परिचय बढाने का और कोई सस्ता और आसान साधन भी तो नहीं है। आपके घर आए हुए को अखबार पढने के लिए दे दीजिए और आप आराम से और निश्चिन्त होकर अपने कामों में लग जाइए। फुरसत से आइए। आपकी व्यस्तता भी प्रकट हो जाएगी और उसके क्रोध से भी आप बच जाओगे। अखबार न होते तो क्या लोग ऐसा कर पाते ?

समाचार पढते रहकर किसी की राह देखना गैर नहीं माना जाता। जिसकी ओर आप खुले आम नहीं देख सकते उसकी ओर देखने के लिए आप समाचार पत्र में छेद बना ले सकते हैं। आम के आम और गुठली के दाम। वृत्तपत्र सचमुच हिंसा से आपको दूर रखता है। समाचार पत्र अपने पास रखिए और बिना झगडे रेल आदि की भीड में आसानी से जगह पा लीजिए।

वैसे समाचार पत्र नित्योपयोगी वस्तु है। समाचार पत्र न हों तो बच्चे सुबह आपको या आपकी देवी को चिन्ता में डुबो देते हैं, ऐसी चिन्ता जैसे लंका लूट गयी। मन्दिर सभा–सम्मेलन के मण्डपों में या धार्मिक स्थानों पर जूते–चोरों से समाचार पत्र न होते तो आपका बचना मुश्किल ही था समझो ! अपनी चप्पलें–जूतें अखबार में ढंक लीजिए और शान से चल दीजिए। लोगों की बेअक्ल पर आप हँसोगे और लोग मानेंगे कि कितना प्रसन्न व्यक्तित्व है। आपके हाथ में बण्डल देखकर समझेंगे कि आप कितने खुश किस्मत हैं कि रोज कुछ न कुछ खरीदते ही रहते हैं।

# How to Achieve Mental Health ?

**Narendra Naidu,** T. Y. B. Sc.

Man craves to achieve, what he has not. Therefore, when we now pose a question ' How to achieve mental health ?' implies the present unhealthy condition of our mind.

Remedy for a disease can be suggested only when the disease is properly diagnosed. So it is necessary for us, to first understand the unhealthy condition of the mind.

At this juncture we are bound to pause and think as to-what exactly is Mind ? Unless you know the machine in and out, you dare not go in for its repairs !

What is Mind ? Let us analyze-

We find that when our mind is happy, we are happy; when our mind is excited; we are excited——Anger, lust, love, hatred all such feelings gurgle out of our mind. Could we then say that——' Mind is emotions or mind is thought. ' But this is not conclusive, because in deep sleep there are no thoughts and therefore, there is no mind.

No doubt, however, that thoughts and mind are interrelated; Calm, thoughts, calm mind; Hopeful thoughts, hopeful mind Agitated thoughts, agitated mind.

Mind is nothing, but a flow of thoughts.

( A river is water flow——Mind is thought flow-a continuity of thoughts ).

As the thoughts so the Mind !

Great thinkers of the past have studied the Mind carefully and enlisted four functional expressions of the mind. They are :—

1) Doubt, 2) Decision, 3) Memory, 4) Sense of Doership. Even modern psychologists are astonished to note this precise analytical data !

Now that we know the equipment, we will probe into its illness-cautiously dissecting out the unhealthy condition of the mind.

We are not at peace with our Mind because our mind is constantly in pieces-it is shattered. We are restless, insecure, gripped by vulgar thoughts, condemned by guilt-because our mind is diseased. ( diseased-not at ease ). In short the Mind is Unsteady and impure.

Why the Unsteadiness and Impurity ?

**Unsteadiness** could be due to two reasons-

1. External Stimuli - certain good/bad experiences in the world.

2. Agitation in the mind ( Internally ) due to saturated thoughts.

**Impurity** of mind is due to the accumulation of negative impressions of the past, which mostly bear a feeling of shame or guilt.

Though this explanation may be swallowed one doubt lingers—' Why the **constant** restlessness ?

A restless mind is nothing but a dissipated mind, unable to conserve one's dynamic energy. There are three basic outlets/leakages

through which our energy drains out, thus exhausting the mind. They are :-

Regrets/worries of the past

Unintelligent anxieties for the future.

Excitements af the present

All of us are engrossed in the unwanted recollections of the past and Utopian imaginations of the Unknown future, thus missing the precious Present Yesterday and tomorrow have literally crushed our today.

Due to such a critical condition all of us are incompetent to face the present–Here and Now-so the constant restlessness !

Having known the machine and its faults we can confidently prescribe the remedy. From the above discussion we have realized that the hitch lies in the ' thoughts.'

As the thoughts, so the mind,

As the mind, so the man !

The remedy includes 3 basic points :-

—Reducing Quantity of thoughts.

—Changing Quality of thoughts.

—Channelizing/Directing the thoughts towards an Ideal.

Let us give a thought to each point in brief.

A river with more water has a vigorous fiow.

Similarly a mind with numerous thoughts gushing forth is bound to be agitated.

Many thoughts—maximum agitation – Less agitated mind. Steady thoughts–almost no agitation – steady/calm mind.

A river with clean water is a clean river, a river with muddy water is a muddy river. Similarly the quality and texture of thoughts will decide the calibre of the mind.

Bad/Vulgar thoughts—vulgar mind—vulgar man.

Noble/Good thoughts—Good man.

Thus a transformation in thoughts will lead to transformation of mind and subsequently a transformation in the personality of an individual. Last but not the least, is the direction towards the Ideal/Goal.

No ideal———Weak mind.

Changing ideals———Flirting mind

Many ideals———Confused mind.

Steady ideal———Steady mind.

Pure ideal———Pure mind.

So our thoughts should aspire towards some steady and pure Ideal which will establish tranquility and chastity in the mind leading to the desired Mental Health.

We have to look for such a changeless Ideal among the changing phenomena of this world, the Life-Principle behind all this Universe, an Unmolested, Uncontaminated, Unseen truth—a power-controlling as it were the whole Cosmos. Let us focus our attention upon such an indomitable Goal, striding the path of life, progressing on. irrespective of dazzling successes and dejecting failures, reaching towards the climax of Mental Health.

We have to work without any compromise. But it is we to decide how to work, Let us always try to give out our best exhaustively without bothering for the results. Let our lips possess a smile through all the odds and evens of life. A healthy mind can swim across the sea of life inspite of the lashing and tossing waves, because such a mind ramains concentrated on the ' Motionless substratum ' that holds these moving fierce waves.

Let us therefore—

Handle the mind and not be handled by the mind.


Enslave the mind and not be enslaved by the mind.

Master the mind and master the world !

We can efficiently prove to have conquered the highest peak of evolution only when we have learnt to mind the mind !

( From a conversation with
Swami Purushottamananda )

# Research Project : Zoology Department



*Dr S. Y. Paranjape, Head of the Zoology Department and Principal Investigator of the ICAR scheme discussing research work with the guests - (from left to right) Prof. K N. Mehrotra, Dr T. P. Sriharan, Dr. D. N. Srivastava and Prof. R. P. Kapil.*

The Department of Zoology, of the Science Faculty of Modern college, not only imparts instructions to the students at B. Sc. Principal level, but the staff members of the department are also actively engaged in research. The research activites of the department are making a good progress under the guidance and encouragement from Principal S. Y. Gambhir.

The department is recognized as an approved place of research by the University of Poona. Recently the department received a research grant of Rs. 1,22,160/– from Indian council of Agricultural Research (ICAR), New Delhi. This grant has been sanctioned to a scheme which was submitted by the Head of the Zoology Department Dr. S Y. Paranjape, M. Sc., Ph. D., D. A. S. F., F. A. Z.; as the Principal Investigator. The objective of this research scheme is to make an extensive survey of local grouse–locusts and evaluate the detail taxonomy and biology of a few species of this insect from fundamental as well as applied aspects.

The main reason for selecting this animal is that despite their wide distribution and interesting features, this group of insects has not received proper attention so far. This department will be, in fact, first such department to start systematic work on these insects. Further, this will be the first research department, among the affiliated colleges of the University of Poona, to receive such a valuable grant for zoological research. Dr. Paranjape, who has considerable interest in taxonomic work and entomology, is guiding the research work of thrhe research fellows working under this scheme. The ICAR scheme has also provided employment for a laboratory assistant and a field collector.

The research work of the scheme is making a good progress. It must also be mentioned that eminent officials of the ICAR, namely, Dr. D. N. Srivastava, A. D. G. (PP), Dr. T. P. Sriharan, Senior Scientist, Entomology division; eminent scientist, Prof. K. N. Mehrotra of IARI and eminent entomologist Prof. R. P. Kapil of Haryana Agricultural University visited the department on 4th July 1981. They showed keen interest in the research activities and expressed their deep satisfaction. Dr. A. S. Summanwar, Head IARI Regional Research Station Pune–5 and ICAR nominee on the Selection Committee also showed keen interest in the research activities.

Invaluable help and encouragement in our research endeavour is constantly being received from Dr. A. B. Joshi, Ex-Vice-Chancellor Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri (M. S.), Ex–Senior Executive official of ICAR, INSA, etc., former member of F. A. O. and presently Adviser to various Nations on Agricultural policy.

# हार्दिक अभिनंदन

## साधु वास्वानी निबंधस्पर्धा

साधु वास्वानी मिशनतर्फे आयोजित केलेल्या निबंधस्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील एम्. कॉम्. पार्ट—१ चा विद्यार्थी रवींद्र एकनाथ कोठावदे याने ३०० रु. चे प्रथम पारितोषिक पटकावले आहे. निबंधाचा विषय होता :– ' What I have learnt from the life and teachings of Sadhu Vaswani.'

## मॉडर्नच्या कवींचे अभिनंदनीय यश

स्टुडन्टस् फ्रेन्ड सर्कल, संघवी कॉलेज, चिंचवड, यांच्या वतीने दिनांक २५–२–८२ रोजी घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन काव्यवाचन स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाचा विद्यार्थी आनंद दादू साळवे (टी. वाय्. बी कॉम.) याने प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळविली, तर आपल्याच कॉलेजची विद्यार्थिनी कु. सुजाता गानू (एफ्. वाय. बी. कॉम) हिला तृतीय क्रमांक मिळाल्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन.

वरील काव्यवाचन स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाकडून रवींद्र पारसकर, टी. एन्. चव्हाण, कु. निलीमा शिकारखाने या कवींनी देखील भाग घेतला होता.

## फनफेअर आणि समाजकार्य

यंदा फनफेअरच्या मंडपात स्टॉल चालवून मिळालेल्या प्राप्तीमधून कु. वर्षा कटारीया, कु. साधना मुथा व कु शीला देसाई ह्या द्वितीय वर्ष वाणिज्य वर्गातील मुलींनी रु. २०१ ची खेळणी व बिस्किटचा डबा महिला सेवा मंडळ, कर्वे रोड, पुणे ४, ह्या संस्थेतील लहान मुलांना देऊन फनफेअरच्या आनंदाबरोबर अल्पसे समाजकार्यही करण्याचा प्रयत्न केला. हृया त्यांच्या उपक्रमाबद्दल प्राचार्यांनी हृया विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

## संख्याशास्त्र–पारितोषिक

एप्रिल १९८० मध्ये पुणे विद्यापीठाने घेतलेल्या बी. कॉम परीक्षेत संख्याशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल आपल्या महाविद्यालयाच्या श्री. संजय भिडेला ' कै. रावसाहेब आनंदराव रामचंद्र चिटणीस, बी. कॉम ' पारितोषिक देण्यात आले. श्री. भिडे सध्या आपल्याच महाविद्यालयात एम्. कॉम. (पार्ट २) करत आहे. त्याने एम्. कॉमला संख्याशास्त्र विषय घेतला आहे.



# " इश्श "!!

१) मनाच्या आकाशात, प्रेमाच्या हिंदोळचात
हास्याच्या लहरीत जे झोका घेते ते 'इश्श'!

२) ज्याने पुरुष घायाळ होतात अशी प्रभावी अस्त्रे
स्त्रीकडे आहेत. एक अश्रू आणि दुसरे 'इश्श'!

३) पुरुषाच्या प्रेमाला, शौर्याला व धैर्याला प्रोत्साहन
देते ते 'इश्श'!

४) कमलाच्या परागाहून, मृगाच्या गुंजारवाहून,
कोमल आहे ते 'इश्श'!

५) स्त्रीचे नापसंतीचे दर्शन, आवडीचे प्रदर्शन व
लाडाचे प्रतीक म्हणजे 'इश्श'!

६) स्त्रीच्या शब्दांत, तिच्या मोहक हास्यात गालातल्या
खळीत जे दडून बसले आहे ते 'इश्श'!

७) जगातील कोणत्याही स्त्रीकडे नाही, पण मराठी
बोलणाऱ्या स्त्रीकडे आहे ते 'इश्श'!

८) यौवनाच्या वाढीबरोबर स्त्रीचे दुसरे काही
वाढत असेल तर वाक्यागणिक 'इश्श'!

९) सगळ्या गोड प्रश्नास स्त्री जे अवीट उत्तर
देते ते 'इश्श'!

१०) मधमाशाच्या मधाहून, कोकीळेच्या संगीताहून
गोड आहे ते 'इश्श'!

११) नाही आणि होय अशा दोन्ही अर्थाने प्रणयिनीचा
एकच शब्द म्हणजे 'इश्श'!

१२) असा हा मराठी भाषेचा लोभसवाणा अलंकार
वाचल्यावर स्त्री जो शब्द उच्चारेल तो असेल 'इश्श'!

१३) तो ऐकणारीही सहज म्हणून जाईल 'इश्श'!

**पानमंद विजयकुमार एम्., तु. व. शास्त्र**

✻ एका मनुष्याचे नवीनच लग्न झाले होते व तो नेहमी २४ तास पुस्तके वाचण्यात मग्न असायचा. तेव्हा वैतागून एके दिवशी त्याची बायको त्याला म्हणते, 'जर मी पुस्तक असते तर २४ तास तुमच्या नजरेसमोर राहिले असते.' तेव्हा त्यावर तो तिला म्हणतो, 'जर तू 'कॅलेंडर' असते तर मी दरवर्षी बदलले असते.'

**अनिल काशिनाथ हजारे,** द्वितीय वर्ष वाणिज्य

# खाजवा डोके

एन. बी कुलकर्णी

वर्गात तास नसेल तेव्हा किंवा सहलीच्या वेळी आपल्या मित्रांना खालील प्रश्न विचारून डोके खाजवायला लावण्यात गंमत येईल. यातील प्रत्येक प्रश्नाचे फाडकन उत्तर देणारा मोठा बुद्धिमान म्हणून जगात नावाजला जाईल. पाचाच्या आत ज्याच्या चुका होतील तो हुशार असेल. लक्षात ठेवा, कमीतकमी आठ प्रश्नांची उत्तरे तुमची बरोबर आली पाहिजेत. नाहीतर रोज ब्राह्मीची पाने खा.

१. तीन मांजरे तीन उंदिर तीन मिनिटांत खातात. ५० मांजरांना ५० उंदिर खाण्यास किती वेळ लागेल?

२. घरी आई-वडील, त्यांचे सात मुलगे आणि प्रत्येकाला एक बहीण आहे. घरात एकंदर माणसे किती ?

३. मी बसस्टँडवर गेलो. बस ५ मिनिटांपूर्वी सुटली होती. ती क्षितिजरेषेवर जाताना दिसत होती. म्हणजे दोन मैलांवर होती. मित्र स्कूटरवर आला होता. तो म्हणाला बैस मागे, आपण बस गाठू. ' ताशी तीस मैल वेगाने त्याने पहिले मैलाचे अंतर काटले. बस गाठण्यासाठी दुसऱ्या मैलाचे अंतर किती वेगाने तोडले पाहिजे ?

४. माझ्या खणात १० मोजे पांढरे व १० काळे मोजे आहेत. मी त्यातली एक जोडी काढणार इतक्यात वीज गेली. अंधारात फजिती न होण्यासाठी किती मोजे मी बरोबर घेतले पाहिजेत म्हणजे बाहेर येऊन मला बूट घालता येतील ?

५. टोपलीतील अंडी दर मिनिटाला दुप्पट होतात. टोपली एका तासात अंड्यांनी भरून जाते. टोपली बरोबर अर्धी केव्हा भरली होती ?

६. माझ्याकडे २७ कोंबड्या होत्या. साथीच्या रोगात काल नऊ मेल्या. आज मी मोजायला गेलो. किती असतील ?

७. दोन बाप आणि दोन मुलगे शिकारीला गेले. प्रत्येकाने एक ससा वेगवेगळा मारला, परंतु ससे तीनच भरले. का ?

८. एक म्हातारा व एक मुलगा रानातून चालले होते. मुलगा म्हाताऱ्याचा होता, परंतु म्हातारा मात्र त्याचा बाप नव्हता. मग तो कोण होता ?

९. तुमच्याजवळच्या तीन केळ्यांतून दोन काढून घ्या. आता तुमच्याजवळ किती केळी राहिली ?

१०. चटणीबरोबर बटाटावडा हॉटेलात ६५ पैशाला मिळतो. बटाटावड्याची किंमत चटणीपेक्षा ५५ पैशांनी अधिक आहे. चटणीची किंमत किती ?

११. नावेतून एकावेळी जास्तीत जास्त १५० किलो वजन नेता येते. १५० किलो वजनाचा एक पैलवान आणि त्याचे प्रत्येकी ७५ किलो वजनाचे दोन मुलगे कशा रीतीने नदी पार करू शकतील ?

12. Can you make first into last by merely adding one letter ?

13. Can you draw the letter E without taking the pencil of the paper and without going over any line twice ?

14. A shopkeeper had 28 servants. All but II refused to work and went away. How many did he have left ?

१५. एकमेकापासून शंभर मैल दूर असलेल्या दोन आगगाड्या एकाच मार्गाने धावताहेत. एकीचा वेग ताशी साठ तर दुसरीचा तासी ४० मैल आहे वरून ताशी २५ मैल वेगाने एक पक्षी उडतो आहे. दोन्ही आगगाड्या जेथे मिळतील, त्यावेळी पक्षी निघालेल्या जागेपासून किती अंतरावर असेल ?

१६. प्रत्येकी शंभर पानांची दहा पुस्तके रॅकवर ओळीने लावून ठेवली होती. सहा महिन्यांनी वाळवीने पहिल्या पुस्तकाच्या पहिल्या पानापासून आरपार भोक पाडलेले दिसले. शेवटच्या पुस्तकाच्या शेवटच्या पानावरही तीच अवस्था दिसली. वाळवीने एकूण किती पाने खाल्ली ?

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

# वार्षिक अहवाल

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

## क्रीडा संघटना : (वरिष्ठ महाविद्यालय)

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी विविध स्पर्धांत भाग घेऊन नेत्रदीपक यश संपादन केले आणि महाविद्यालयाच्या कीर्तीत भर घातली.

आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धांत मुलींच्या संघाने प्रथमच सर्वसाधारण अजिंक्यपद मिळविले.

त्याचप्रमाणे बॉल बॅडमिंटन मध्ये मुलींच्या संघाने सतत चौथ्यांदा विजेतेपद मिळविले.

आंतरमहाविद्यालयीन वॉटरपोलो स्पर्धेत मुलांच्या संघाने प्रथमच उपविजेतेपद मिळविले.

जलतरण आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

कु. निशा अंबिके (तृ. व. शास्त्र) हीस महाराष्ट्र शासनाचा या वर्षीचा शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त झाला. आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धांत (३००० मी. पळणे) कु. मिथिला जबडे, (तृ. व. वाणिज्य) या विद्यार्थिनीने ब्रॉंझपदक मिळवून महाविद्यालयाच्या कीर्तीत भर टाकली.

महाराष्ट्र राज्य खो-खो संघातून राष्ट्रीय पातळीवर खेळून महाराष्ट्रास विजेतेपद मिळवून देण्यामध्ये आमच्या महाविद्यालयातील खालील स्पर्धकांचा कौतुकास्पद उल्लेख केलाच पाहिजे.

| | |
|---|---|
| १) कु. वनिता महाजन | प्र. व. साहित्य. |
| २) कु. संगीता ताटके | तृ. व. शास्त्र |
| ३) कु. निशा अंबिके | तृ. व. शास्त्र |
| ४) कु. मिथिला जबडे | तृ. व. वाणिज्य |
| ५) कु. वसुधा तुमपल्लीवार | द्वि. व. वाणिज्य. |
| ६) श्री. संजय जोशी | तृ. व. वाणिज्य. |

आंतरविभागीय स्पर्धांमध्ये आमच्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी पुणे शहर विभागातर्फे प्रतिनिधित्व केले.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. प्रविण फुले | द्वि. व. शास्त्र | वॉटरपोलो<br>हॅण्डबॉल<br>व्हॉलीबॉल |
| २) श्री. मिलिंद जोशी | तृ. व. शास्त्र | वॉटरपोलो |
| ३) श्री. यशोधन बाळ | द्वि. व. वाणिज्य | वॉटरपोलो<br>मैदानी स्पर्धा<br>जलतरण. |
| ४) श्री. आचवल व्ही. एन. | तृ. व. वाणिज्य | वॉटरपोलो. |
| ५) श्री. डोळे आर. एच. | तृ. व. वाणिज्य | क्रिकेट. |

| | | |
|---|---|---|
| ६) श्री. अस्नीकर विवेक | तृ. व. शास्त्र | खो–खो. |
| ७) श्री, कुलकर्णी धनंजय | तृ. व. वाणिज्य | खो–खो |
| ८) श्री. पेमगिरीकर संदीप | तृ. व. वाणिज्य | खो–खो. |
| ९) कु. संगीता ताटके | तृ. व. शास्त्र | खो–खो, मैदानी स्पर्धा |
| १०) कु. निशा अंबिके | तृ. व. शास्त्र | खो–खो, मैदानी स्पर्धा |
| ११) कु. मिथिला जबडे | तृ. व. वाणिज्य | खो–खो, मैदानी स्पर्धा |
| १२) कु. वसुधा तुमपल्लीवार | द्वि. व. वाणिज्य | खो-खो, मैदानी स्पर्धा |
| १३) कु. जयश्री साने | एम्. कॉम. | खो–खो. |
| १४) कु. मेधा अवधानी | तृ. व. वाणिज्य | खो–खो. |
| १५) कु. वनिता महाजन | प्र. व. साहित्य | खो–खो. |
| १६) कु. रश्मी छत्रे | द्वि. व. शास्त्र | खो–खो. |
| १७) कु. हर्षा पोटफोडे | प्र. व. वाणिज्य | खो–खो. |
| १८) कु. सुजाता गांधी | द्वि. व. साहित्य | व्हॉलीबॉल. |
| १९) कु. सुजाता कोळमकर | द्वि. व. शास्त्र | व्हॉलीबॉल |
| २०) कु. हेलन सूर्यवंशी | द्वि. व. वाणिज्य | हॅण्डबॉल. |
| २१) कु. सुनंदा इंगळे | तृ. व. साहित्य | बॉल बॅडमिंटन. |
| २२) कु. रेखा कुलकर्णी | तृ. व. वाणिज्य | बॉल बॅडमिंटन |
| २३) कु. अंजली बिद्रे | द्वि. व. वाणिज्य | बॉल बॅडमिंटन. |

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेत विजयी ठरलेल्या संघातील खालील विद्यार्थ्यांनी विशेष नैपुण्य दाखविले.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. विवेक अस्नीकर | तृ. व. शास्त्र | खो–खो. |
| २) श्री. धनंजय कुलकर्णी | तृ. व. वाणिज्य | खो–खो. |

आंतरविद्यापीठ महिला खो–खो स्पर्धेत पुणे विद्यापीठाला उपविजेपद मिळवून देण्यात खालील विद्यार्थिनींचा सहभाग होता.

| | |
|---|---|
| १) कु. संगीता ताटके | तृ. व. शास्त्र |
| २) कु. निशा अंबिके | तृ. व. शास्त्र |
| ३) कु. मिथिला जबडे | तृ. व वाणिज्य |
| ४) कु. वसुधा तुमपल्लीवार | तृ. व. वाणिज्य |
| ५) कु. जयश्री साने (कर्णधार) | एम्. कॉम. |
| ६) कु. मेधा अवधानी | तृ. व वाणिज्य |
| ७) कु. वनिता महाजन | प्र. व. साहित्य |
| ८) कु. रश्मी छत्रे | द्वि. व. शास्त्र |
| ९) कु. हर्षा पोटफोडे | प्र. व. वाणिज्य |

आंतरविद्यापीठीय इतर स्पर्धांत खालील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी प्रतिनिधित्व केले.

| | | |
|---|---|---|
| १) कु. सुजाता गांधी | द्वि. व. साहित्य | व्हॉलीबॉल |
| २) श्री. यशोधन बाळ | द्वि. व. वाणिज्य | वॉटरपोलो |
| ३) श्री. प्रविण फुले | द्वि. व. शास्त्र | वॉटरपोलो, व्हॉलीबॉल |
| ४) श्री. डोळे आर. एच. | तृ. व. वाणिज्य | क्रिकेट. |

**आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धा :–** खालील स्पर्धकांचे विशेष नैपुण्य.

**१०० मीटर पळणे**

| | | |
|---|---|---|
| कु. वसुधा तुमपल्लीवार | द्वि. व. वाणिज्य | प्रथम क्रमांक |
| कु. संगीता ताटके | तृ. व. शास्त्र | द्वितीय क्रमांक |

**२०० मीटर पळणे**

| | | |
|---|---|---|
| कु. संगीता ताटके | तृ. व शास्त्र | प्रथम क्रमांक |
| कु. वसुधा तुमपल्लीवार | द्वि. व. वाणिज्य | द्वितीय क्रमांक |

**४०० मीटर पळणे**

| | | |
|---|---|---|
| कु निशा अंबिके | तृ. व. शास्त्र | प्रथम क्रमांक |

**८०० मीटर पळणे**

| | | |
|---|---|---|
| कु. मिथिला जबडे | तृ. व. वाणिज्य | प्रथम क्रमांक |
| कु सुनीता देशपांडे | तृ. व. शास्त्र | द्वितीय क्रमांक |

**१५००--३००० मीटर पळणे**

| | | |
|---|---|---|
| कु. मिथिला जबडे | तृ. व. वाणिज्य | प्रथम क्रमांक |

**लांब उडी**

| | | |
|---|---|---|
| कु. वसुधा तुमपल्लीवार | द्वि. व. वाणिज्य | प्रथम क्रमांक |

**४ × १०० मीटर रिले :–** या खेळात खालील विद्यार्थिनींनी सांघिक विजेतेपद मिळविले.

| | |
|---|---|
| कु. मिथिला जबडे | तृ. व. वाणिज्य |
| कु. वसुधा तुमपल्लीवार | द्वि. व. वाणिज्य |
| कु. निशा अंबिके | तृ. व. शास्त्र |
| कु. संगीता ताटके | तृ. व. शास्त्र |

**४ × ४०० मीटर रिले**

| | |
|---|---|
| कु. जयश्री साने | एम्. कॉम. |
| कु. मिथिला जबडे | तृ. व. वाणिज्य |
| कु. सुनीता देशपांडे | तृ. व. शास्त्र |
| कु. निशा अंबिके | तृ. व. शास्त्र |

**२० कि. मी. चालणे**

| | | |
|---|---|---|
| श्री. यशोधन बाळ | द्वि. व. वाणिज्य | तृतीय क्रमांक |

**जलतरण स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांचा यशस्वी सहभाग होता.**

**४ × १०० रिले**

| | |
|---|---|
| १) श्री. यशोधन बाळ | द्वि. व. वाणिज्य |
| २) श्री. भालचंद्र पाठक | प्र. व. शास्त्र |
| ३) श्री. प्रविण फुले | द्वि. व. शास्त्र |
| ४) श्री. मिलिंद जोशी | तृ. व. शास्त्र |

**४ × १०० फ्री स्टाईल**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. प्रविण फुले | द्वि. व. शास्त्र |
| २) | श्री. मानसिंग पाटोळे | तृ. व. शास्त्र |
| ३) | श्री. मिलिंद जोशी | तृ. व. शास्त्र |
| ४) | श्री. यशोधन बाळ | द्वि. व. वाणिज्य |

**डायव्हींग**

| | | |
|---|---|---|
| श्री. मानसिंग पाटोळे | तृ. व. शास्त्र | प्रथम क्रमांक |

**१०० मी. ब्रेस्ट स्ट्रोक**

| | | |
|---|---|---|
| श्री. यशोधन बाळ | द्वि. व. वाणिज्य | तृतीय क्रमांक |

पुणे जिल्हा ज्युडो संघटनाद्वारा आयोजित आंतरमहाविद्यालयीन वर्षात खालील विद्यार्थ्यांनी खालील प्राविण्य दाखविले.

| | | | |
|---|---|---|---|
| १) जोशी एस्. एम्. | प्र. व. वाणिज्य | ५५ कि. ते | सुवर्णपदक |
| | | ५९ कि. | प्रथम क्रमांक |
| २) श्री. एस्. डी. बालगुडे | प्र. व. वाणिज्य | ६१ कि. ते | सुवर्णपदक |
| | | ६८ कि. | द्वितीय क्रमांक |
| ३) श्री. यू. एस. भिताडे | द्वि. व. वाणिज्य | ५० कि. ते | ब्रॉंझपदक |
| | | ५५ कि. | तृतीय क्रमांक |
| ४) श्री. ए. एम्. भानू | तृ. व. वाणिज्य | ५० कि. च्या | ब्रॉंझपदक |
| | | आतील | तृतीय क्रमांक |

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाविद्यालयात आंतरवर्गीय क्रीडास्पर्धा घेण्यात आल्या. ह्या स्पर्धांत द्वि. व. शास्त्र या वर्गास सर्वसाधारण विजेतेपद मिळाले.

'मॉडर्न श्री' चा बहुमान श्री. सांळुके (प्र. व. वाणिज्य) यांना मिळाला.

या स्पर्धांना सर्वच प्राध्यापकांचे सहकार्य आणि प्राचार्यांचे मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

| | | |
|---|---|---|
| **श्री. हरीष देशमुख** | **किरण लागू** | **म. आ. कुलकर्णी** |
| **कु. सुनीता देशपांडे** | क्रीडासंघटक | कार्याध्यक्ष |

## क्रीडा संघटना : (कनिष्ठ महाविद्यालय)

१९८१–८२ या शैक्षणिक वर्षात मॉडर्न महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी विविध स्पर्धांमधून मोठ्या उत्साहाने भाग घेऊन कनिष्ठ महाविद्यालाच्या क्रीडा–विभागाची शान वाढविली.

जिल्हा परिषदेद्वारा आयोजित आंतरशालेय पावसाळी व हिवाळी सत्र स्पर्धांमध्ये आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी पुढील विविध खेळांमध्ये भाग घेतला.

व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, जिम्नॅस्टिक्स, कुस्ती, बास्केट बॉल, खो–खो, फुटबॉल, कबड्डी, टेबल टेनिस, पोहणे व मैदानी स्पर्धा.

वरील स्पर्धांपैकी विशेष नैपुण्य खालीलप्रमाण.

१) व्हॉलीबॉल (मुली) विजेतेपद.

२) बॅडमिंटन (मुले) उपविजेतेपद.

बास्केटबॉल, व्हॉलीबॉल या खेळातील विद्यार्थी–खेळाडूंनी उपांत्यपूर्व सामन्यापर्यंत मजल मारली.

आंतरशालेय पुणे जिल्हा मैदानी स्पर्धांत आमच्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी विशेष चमक दाखविली.

१) अल्पना थोरात (१२ वी वाणिज्य)—थाळीफेक—प्रथम क्रमांक.

२) पोपट काळे (११ वी कला)—८०० मी. धावणे–द्वितीय क्रमांक.

३) शशिकांत उभे (१२ वी शास्त्र)—कुस्ती—५२ कि. गट–प्रथम क्रमांक.

(आंतर–राज्य पातळीवर निवड)

४) विद्या गोडबोले (११ वी वाणिज्य) जलतरण—प्रथम क्रमांक.

(१०० मी बॅक स्ट्रोक).

(१०० मी. ब्रेस्ट स्ट्रोक).

(१००० मी. फ्रीस्टाईल).

(आंतर–राज्य पातळीवर निवड)

आमच्या महाविद्यालयातील श्री. उमेश नवाथे (११ वी शास्त्र) याची बॅडमिंटन मध्ये आंतर राज्य पातळीवर निवड झाली, याचा आम्हाला अभिमान वाटतो. त्याचप्रमाणे बास्केटबॉलमध्येही येरवडेकर प्रकाश याची निवड आंतर–राज्य पातळीवर झाली.

कु. नीता अंबिके (१२ वी) या विद्यार्थिनीने खो–खो मध्ये राणी लक्ष्मीबाई पारितोषिक प्रथमच मिळवून महाविद्यालयाच्या कीर्तीत मोलाची भर घातली.

पुण्यामध्ये 'पूना ज्युडो असोसिएशन' ने घेतलेल्या ज्युडो स्पर्धांत आमच्या महाविद्यालयातील कनिष्ठ विभागातील मुलांनी दुसऱ्यांदा विजेतेपद मिळविले ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

**आंतर–वर्गीय स्पर्धा :–**

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही महाविद्यालयाच्या सांघिक व वैयक्तिक आंतरवर्गीय स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी त्यात उत्साहाने भाग घेतला.

मुलांचे सर्वसाधारण विजेतेपद १२ वी 'ब' या वर्गाने मिळविले. मुलींचे वैयक्तिक नैपुण्यपद कु. संगीता येरवडेकर (१२ वी वाणिज्य) या विद्यार्थिनीने पटकावले.

क्रीडाविभागास महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व उपप्राचार्य व इतर प्राध्यापकवर्ग यांचे सतत सहकार्य लाभले. त्यांच्या प्रोत्साहनानेच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी विशेष प्रगती दाखवू शकले.

जी. एम. बनसुडे — उपकार्याध्यक्ष.

विनोद छाब्रा — क्रीडासंघटक.

# कलामंडळ

दरवर्षीप्रमाणे १९८१–८२ या वर्षातही महाविद्यालयाच्या कलामंडळाने अनेक कार्यक्रम अत्यंत उत्साहाने सादर केले.

**पुरुषोत्तम करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा :**

या स्पर्धेमध्ये आपल्याच महाविद्यालयाती एक प्राध्यापक श्री. राजीव कुलकर्णी यांनी लिहिलेली एकांकिका 'सन दोन हजार एक' अत्यंत प्रभावीपणे सादर करून दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळविला. एकांकिकेचा विद्यार्थी दिग्दर्शक आनंद मासूर (टी. वाय्. बीएस्सी) याला अभिनयाचे खास प्रशस्तिपत्रक मिळाले. या एकांकिकेत खालील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

| | |
|---|---|
| १. प्रमोद देशपांडे | ९. प्रविण फुले |
| २. आनंद मासूर | १०. विवेक आचवल |
| ३. यशोधन बाळ | ११. संदीप कुलकर्णी |
| ४. रोहिणी दिकसंगीकर | १२. प्रदीप चोपडे |
| ५. विकास पेशवे | १३. नंदिनी गाडगीळ |
| ६. मिलिंद गांधी | १४. शुभदा शहा |
| ७. विश्वनाथ प्रभूमिराशी | १५. सचिन शेटचे |
| ८. जयश्री दाणी | १६. जयंत पवार |

या एकांकिकेस प्रेमकुमार सबापती यांनी पार्श्वसंगीत दिले आणि ध्वनिमुद्रणाची बाजू सांभाळली, तर प्रकाशयोजना महेश गोडबोले यांनी केली.

दि. ३० ऑगस्ट आणि ५ सप्टेंबर १९८१ रोजी 'सन दोन हजार एक' या एकांकिकेचे दोन प्रयोग केल्यानंतर महाविद्यालयाच्या कलामंडळाने औपचारिक उद्‌घाटन समारंभ साजरा केला. कलामंडळाच्या उद्‌घाटनाला प्रख्यात अभिनेते श्री. शरद तळवलकर आलेले होते. शरद तळवलकरांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण होत असताना आणि सर्व नाटचरसिक त्यांचा सत्कार करीत असताना असे अध्यक्ष आमच्या कलामंडळाला मिळावेत हे आमचे भाग्य. श्री.शरदरावांनी आपल्या नाटचजीवनातील अनेक अनुभव सांगून विद्यार्थ्यांना मनसोक्त हसविले.

दि. ७ सप्टेंबर १९८१ रोजी प्रा. लक्ष्मण देशपांडे (नाटचविभाग प्रमुख, औरंगाबाद विद्यापीठ) यांचा तुफान विनोदी कार्यक्रम 'वऱ्हाड निघालंय लंडनला' कलामंडळाने घडवून आणला. विद्यार्थी आणि इतरही अनेक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या कार्यक्रमास मिळाला.

दि. १९ सप्टेंबरला अहमदनगरच्या शारदा करंडक एकपात्री अभिनय स्पर्धेत अकरावी सी या वर्गातील कु. वैशाली वाबळे हिने यशस्वीरीत्या भाग घेतला.

युवकमहोत्सवाच्या प्रथम फेरीमध्ये महाविद्यालयाने सदानंद रेगे यांच्या 'बादशहा' या अवघड एकांकिकेचा प्रभावी प्रयोग दिनांक २४ डिसेंबर १९८१ रोजी सादर केला. या एकांकिकेचे दिग्दर्शन आनंद मासूर याने केले. यात खालील विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

| | |
|---|---|
| १. प्रमोद देशपांडे | ५. वंदना आडकर |
| २. यशोधन बाळ | ६. शंकर जाडू |
| ३. सुजाता कोळंबकर | ७. अभिजीत फौजदार |
| ४. विवेक आचवल | ८. राजेश व्यास |

९. प्रेमकुमार सबापनी, १०. महेश गोडबोले, ११. नंदिनी गाडगीळ

'बादशहा' या एकांकिकेचे वाचन आनंद मासूर, प्रमोद देशपांडे, यशोधन बाळ आणि राजश्री बेडेकर यांनी दि, ७ जानेवारी १९८२ रोजी ड्रॉपर्स आंतरमहाविद्यालयीन नाटयवाचन स्पर्धेत केले. या नाटयवाचनास सौ अमृता सातभाई यांनी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयातील एक कलाकार कु. शुभदा कुलकर्णी हिने वसुमती विजापुरे एकपात्री अभिनय स्पर्धेत ताराबाई मराठे पारितोषिक मिळवून उज्ज्वल यश संपादन केले.

कलामंडळाच्या दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे या वर्षीही महाविद्यालयांतर्गत नाटयवाचन, एकांकिका, नाटयाभिनय आणि कथाकथन स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांचे परीक्षक म्हणून महाविद्यालयातील प्राध्यापक लाळे आणि प्राध्यापिका कु. शहाणे यांनी काम पाहिले. या स्पर्धांच्या संयोजनांमध्ये प्रा. जे. पी. चिंचोरे यांनी अथक परिश्रम करून स्पर्धा यशस्वी केल्या.

या स्पर्धांचा निकाल पुढीलप्रमाणे--

| | | | |
|---|---|---|---|
| **नाटयाभिनय** | : | प्रथम क्रमांक | वैशाली वाबळे |
| | | द्वितीय क्रमांक | संगीता माळी |
| | | उत्तेजनार्थ | संदीप कुलकर्णी |
| **नाटयवाचन** | : | प्रथम क्रमांक | विकास पेशवे |
| **कथाकथन** | : | प्रथम क्रमांक | आनंद पाध्ये |
| | | उत्तेजनार्थ | सुनील दाढे |
| **एकांकिका** | : | प्रथम क्रमांक | डॉक्टर रोगी आणि यम (अकरावी सी) |
| | | द्वितीय क्रमांक | अबोल झाली सतार (बारावी एच्) |
| | | उत्तेजनार्थ | The Dear Departed (बारावी जी) |
| **अभिनय (मुले)** | : | प्रथम क्रमांक | संदीप कुलकर्णी |
| | | द्वितीय क्रमांक | अजय खोले |
| | | उत्तेजनार्थ | विनय माडीवाले, शंकर जाडू |
| **अभिनय (मुली)** | : | प्रथम क्रमांक | मनिषा जोशी |
| | | द्वितीय क्रमांक | संगीता येरवडेकर |
| | | उत्तेजनार्थ | रोहिणी पाटील, नीता गोरे |
| **नेपथ्य पारितोषिक** | : | | शुभदा शहा |

वरील स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ दि. १३ जानेवारी १९८२ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाने प्रमुख पाहुणे आणि अध्यक्ष म्हणून नाटयतपस्वी जेष्ठ अभिनेते श्री. मामा पेंडसे कलामंडळाला लाभले. मामांनी आपल्या 'नाटकातील शब्द' या विषयाच्या विवेचनात त्यांच्या भूमिकांमधील काही स्वगते प्रभावीपणे सादर केली. श्रोतृवृंद मंत्रमुग्ध झाला.

कलामंडळाचा यंदाचा शेवटचा कार्यक्रम म्हणजे युवक महोत्सव. पुण्यात दि. ११, १२ आणि १३ फेब्रुवारीस साजऱ्या झालेल्या या युवकमहोत्सवात महाविद्यालयाच्या नरेंद्र नायडू (तृ. व. शास्त्र) या कलाकाराने कथ्यक नृत्याचा बहारदार आविष्कार सादर करून दुसरा क्रमांक आणि रौप्यपदक मिळविले.याच महोत्सवात कु. नंदिनी गाडगीळ (सतारवादन), गजगौरी पुरंदरे (तबलावादन), आनंद साळवे (काव्यवाचन), आनंद पाटचे (कथाकथन), अनिता गर्दे (नाटचसंगीत) आणि सीमा पुंडले (परिसंवाद) यांनीही यशस्वीपणे भाग घेतला.

अशा रीतीने महाविद्यालयाच्या कलामंडळाचं आणखी एक कलापूर्ण वर्ष पार पडलं. श्री. राजीव कुलकर्णी आणि महाविद्यालयातील नाटचविभाग–प्रतिनिधी श्री मुकुंद महाजन यांचेही कलामंडळास खूप सहकार्य मिळाले. सर्वांचेच मनःपूर्वक आभार.

**वि. भा. देशपांडे**

कार्याध्यक्ष

✻

# वादविवाद मंडळ

१९८१–८२ या शैक्षणिक वर्षात मॉडर्न महाविद्यालयातील वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी आंतर–महाविद्यालयीन स्तरावरील विविध वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांमध्ये उत्साहाने भाग घेऊन आपले प्राविण्य प्रस्थापित केले.

स्व. दीनदयाळ उपाध्याय स्पर्धा, कविवर्य मोरोपंत वादस्पर्धा (बारामती), न्या. रानडे वादस्पर्धा (पुणे). डॉ. हिवाळे वादस्पर्धा (अहमदनगर), डॉ. पद्मश्री विखे पाटील स्पर्धा (प्रवरानगर) इत्यादी स्पर्धांमध्ये कु. सीमा पुंडले, कु. ज्योति गिरमे, कु. सीमा कुलकर्णी, श्री. सुनील दाढे या स्पर्धकांनी मॉडर्न महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.

बारामती येथील कविवर्य मोरोपंत वादस्पर्धेत कु. सीमा पुंडले हिने प्रथम क्रमांकांची अनेक वैयक्तिक पारितोषिके मिळविली. त्यांचे हे यश निश्चितच प्रशंसनीय आहे.

कु. सीमा कुलकर्णी हिने नगरच्या डॉ. हिवाळे वादस्पर्धेत उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रक मिळविले

**कर्नावट करंडक वादस्पर्धा** :– मॉडर्न महाविद्यालयाने गेल्या दोन वर्षांपासून सुरू केलेली ‘कर्नावट करंडक’ वादस्पर्धा दि. २०–९–१९८१ रोजी घेण्यात आली. या वादस्पर्धेचे उद्घाटन ‘महाराष्ट्र हेरल्ड’ या वृत्तपत्राचे संपादक श्री. एस् डी वाघ यांच्या हस्ते झाले.

या वादस्पर्धेत एकूण आठ महाविद्यालयांच्या संघाने भाग घेतला होता. वादस्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. संगोराम आणि श्री. वसंतराव कुलकर्णी यांनी काम पाहिले.

**वादस्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| १) कर्नावट करंडक विजेता संघ | — | फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे. |
| २) प्रथम वैयक्तिक पारितोषिक | — | श्री. उमेश घोडके.<br>बी. जे. मेडिकल कॉलेज पुणे. |

३) द्वितीय वैयक्तिक पारितोषिक — कु. लीना तक
फर्ग्युसन महाविद्यालय पुणे.

४) उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके — श्री. सुनील दाडे
मॉडर्न महाविद्यालय.
श्री. गिरीश देशपांडे.
फर्ग्युसन महाविद्यालय.
श्री. प्रसाद अंबीकर
टिळक आयुर्वेद महाविद्यालय.

कर्नावट करंडक वादस्पर्धा आणि इतर स्पर्धा यशस्वी होण्यामागे, प्रा. चिरपुटकर उपप्राचार्य, प्रा. रायकर उपप्राचार्य, प्रा. डॉ. धायगुडे, प्रा. यशवंत सुमंत, यांच्या मार्गदर्शनाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलाच पाहिजे.

काळभोर शं. ना. नवलगुंदकर.
सेक्रेटरी प्रमुख

जयंत जोर्वेकर.
सहाय्यक

✳

## कर्नावट करंडक वादस्पर्धा

महाविद्यालयाच्या दशवार्षिक समारोहापासून सुरू झालेल्या कर्नावट करंडक आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धेचे हे तिसरे वर्ष होते. या वर्षी रविवार दि. २०-९-८१ या दिवशी वादस्पर्धा घेण्यात आल्या स्पर्धांचे उदघाटन "महाराष्ट्र हेरल्ड" चे संपादक श्री. एस्. डी. वाघ यांनी केले. निरनिराळ्या एकूण १० महाविद्यालयांनी या स्पर्धेत भाग घेतला. परीक्षक म्हणून पुणे विद्यापीठाच्या हिंदी विभागातील डॅा. श्री. दा. संगोराम व आकाशवाणीचे श्री. व. वा. कुलकर्णी यांनी काम केले.

सु. व्यं. धायगुडे
संयोजक

✳

## मॉम

मॉडर्न महाविद्यालयातील 'मॉम' या हस्तलिखित भित्तिपत्रकाचे या वर्षी पहिल्या सत्रात तीन व दुसऱ्या सत्रात तीन असे एकूण सहा अंक निघाले. या वर्षीची सुरूवात कथा—कविता अंकाने झाली. यंदाचे 'मॉम' चे लक्षणीय वैशिष्टय म्हणजे दुसऱ्या सत्रात खास स्नेहसंमेलनाचा मुहूर्त साधून प्रसिद्ध केलेला 'कॉपी विशेषांक.' नेहमीपेक्षा मोठ्या आकाराच्या नि अधिक पानांच्या या अंकातील विनोदी लेखांनी व व्यंगचित्रांनी स्नेहसंमेलनाच्या हलक्याफुलक्या वातावरणात भरघालून ते अधिक हलकेफुलके केले. 'मॉम'ला यंदा विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

सुनील पवार दत्तात्रय पुंडे
सचिव सल्लागार प्राध्यापक

✳

# ANNUAL SOCIAL

The College organized the Annual Social on 22nd, 23rd, and 24th Jan. 1982.

For the year 1981-82 the following members - staff and students - constituted the Gathering Managing Committee.

President – Prin. S. Y. Gambhir

Vice-President – Prof. S. R. Raykar

Chairman – Dr. S. Y. Paranjape

Vice-Chairman – Dr. D. D. Punde

U. R. – Shri. P. S. Chaudhari

I. C. S. R. (Gents) – Shri. H. M. Deshmukh

I. C. S. R. (Ladies) – Miss Suneeta Deshpande

The four main items of the annual social were : Funfair. Refreshments, Funny Games and Classwise Variety Entertainment programmes. The sub-committees for these consisted each of a number of staff members, and student volunteers and were ably headed by prof. A. L. Pathre, prof. M. S. Mahajan, prof. P. D. Apte and Prof. R. V. Kulkarni respectively.

Many a students, their guests participated in the Fun-fair, Funny games; about 29 classes from all the faculties staged entertainment programmes for the students of the class amidst the presence of class-advisers and others. This gave the classwise talent an opprtunity to stage the performances and earn applause. The refreshments were arranged extremely systematically and helped everybody get really refreshed.

A special feature was the invitation extended by the Principal, Modern College, to all University Representativas (U R's) from local colleges The U. R's honoured it by remaining present and expressed their keen appreciation of the really cordial atmosphere that prevailed at the instance of the efforts of prin. S. Y. Gambhir, the staff and the students. They were of the view that this should happen everywhere else.

Thus, the Social, conducted in a very cordial atmosphere, complete co-operation and co-ordination amongst the students, teaching and non-teaching staff was a success. Prin. S. Y. Gambhir, as president of the Annual, appreciated and thanked one and all for the same

S. Y Paranjape
Chairman

# माजी विद्यार्थी संघटना

माजी विद्यार्थ्यांची प्रातिनिधिक सभा दि. २६ नोव्हेंबर १९८१ रोजी आयोजित करण्यात आली होती. या सभेत एतदर्थ कार्यकारिणीची निवड करण्यात आली. मा. प्राचार्य, गंभीर स. य. पदसिद्ध अध्यक्ष असावेत असे ठरले. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे निवडण्यात आले.

उपाध्यक्ष– प्रा. मुकुंद महाजन.
कार्याध्यक्ष– विलास सातभाई
चिटणीस– भानुदास जोशी.
कोषाध्यक्ष– प्रा. घैसास.

दि. २६ डिसेंबर १९८१ रोजी कार्यकारिणीची दुसरी सभा घेण्यात आली. दि. २६ जानेवारी १९८२ रोजी माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यासंबंधी चर्चा झाली.

२६ डिसेंबर १९८१ च्या कार्यकारिणीच्या सभेत ठरल्याप्रमाणे २६ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्या'म सुमारे १५० माजी विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांचे मा. उपप्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ यांनी स्वागत केले. स्वागत-समारंभानंतर उपाध्यक्ष प्रा. महाजन यांनी माजी विद्यार्थी संघटनेने भरीव कार्य करावे असे आवाहन केले. मेळाव्यामध्ये परस्पर परिचय, गमतीदार खेळ, अल्पोपहार व चित्रपट इत्यादी कार्यक्रम झाले.

प्रा. मुकुंद महाजन
उपाध्यक्ष

*

# शारीरिक शिक्षण विभाग

" शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् "

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच त्यांच्या शारीरिक विकासाकडे महाविद्यालय सतत लक्ष पुरवित आहे. महाविद्यालयाच्या १९८१–८२ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेणाऱ्या वरिष्ठ व कनिष्ठ विभागांचे शारीरिक शिक्षणाचे तास अनुक्रमे वरिष्ठ महाविद्यालय दि. २० जुलै १९८१ व कनिष्ठ महाविद्यालय १२ वी दि. ६ जुलै १९८१, ११ वी दि. २३ जुलै १९८१ रोजी सुरू झाले.

प्रथम वर्ष शास्त्र, वाणिज्य व कला या वर्गांसाठी आठवड्यातून तीन दिवस (मंगळवार, बुधवार व गुरुवार) सकाळी ६–४० ते ७–२५ या वेळांत तर ११ वी व १२ वी सकाळी ७–३५ ते ८–२० व सायंकाळी ३–५० ते ६–०० या वेळांत तास ठेवले होते. याच कालावधीत काही विद्यार्थी व विद्यार्थिनींची शारीरिक शिक्षण संघनायक म्हणून निवड करण्यात आली. यात वरिष्ठ महा-विद्यालयातील ६ व कनिष्ठ महाविद्यालयातील २० विद्यार्थ्यांचा समावेश होता. या संघनायकांना वरिष्ठ संघनायक, शारीरिक शिक्षण शिक्षक व शा. शि. संचालकांतर्फे योग्य प्रशिक्षण देण्यात आले.

जे विद्यार्थी महाविद्यालयापासून खूप दूर राहात असल्याने सकाळी ६–४० ते ७–२५ या वेळांत उपस्थित राहू शकत नव्हते, त्यांची सर्वांच्या शेवटी शारीरिक क्षमता कसोटी घेण्यात आली.

तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता कसोटी दि. २३ सप्टेंबर ८१ रोजी सुरू झाली. यात (९) १०० मी. पळणे, (२) लांब उडी, (३) गोळा फेक या कसोट्यांचा समावेश होता.

महाविद्यालयाचे दुसरे सत्र दि. १६ डिसेंबर रोजी सुरू झाले. या सत्रात दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची व १२ वी च्या विद्यार्थ्यांची परीक्षा दि. १७ जाने. ८२ रोजी घेण्यात आली. यात पहिल्या सत्रातील कसोटयांचाच समावेश होता.

विद्यार्थ्यांकडून योगासने, सूर्यनमस्कार, भारतीय व्यायाम, रोड रनिंग इत्यादी उपक्रम करून घेत असता त्याच बरोबर हॉकी, बास्केटबॉल, फुटबॉल, खो खो, व्हॉलीबॉल, थ्रो बॉल, कबड्डी, या खेळांची माहिती, खेळांचे तंत्र, कौशल्य व नियम शिक्षकांनी समजावून देऊन या खेळांचा विद्यार्थ्यांकडून सराव करून घेतला. तसेच आरोग्य विषयक सल्ला, शारीरिक शिक्षणाने उंची वाढविणे, योग, प्राणायाम, सूर्यत्राटक आणि डोळचांचे व्यायाम यांची माहिती प्रात्यक्षिकांसह संचालकांनी दिली. याचा पुष्कळ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

**वैद्यकीय तपासणी :–** वरिष्ठ महाविद्यालयांची वैद्यकीय तपासणी यावर्षीसुद्धा शा. शि. विभागाकडे सोपविण्यात आली होती ती दि. १०–१–८१ रोजी घेण्यात आली. संघनायक (विद्यार्थी), शिक्षक व संचालकांनी डॉक्टर्सना योग्य मदत करून ती यशस्वीपणे पार पाडली.

स्वातंत्र्य दिन (१५ ऑगस्ट) व प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी) हे आपले राष्ट्रीय सण विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्साहाने साजरे केले.

खालील विद्यार्थ्यांनी १९८१–८२ या वर्षाकरिता उत्कृष्ट शारीरिक शिक्षण संघनायक म्हणून काम केले.

| | |
|---|---|
| १) श्री सावे संजयकुमार | तृ. व. शास्त्र. |
| २) श्री. बोडस मेघनाद | तृ. व. वाणिज्य. |
| ३) श्री. पिसाळ दत्तात्रय | प्र. व. वाणिज्य. |
| ४) श्री. नेर्लेकर दीपक | प्र. व. वाणिज्य. |
| ५) कु. वैद्य वसुधा | प्र. व. शास्त्र. |
| ६) कु. म्हसकर कांचन | प्र. व. शास्त्र. |
| ७) श्री. चंद्रमणी जावळे | १२ वी. कला. |
| ८) श्री. संत रविंद्र | १२ वी शास्त्र. |
| ९) श्री. व्यवहारे ए. टी. | १२ वी वाणिज्य. |
| १०) श्री. पाटील आर. व्ही. | ११ वी शास्त्र. |
| ११) कु. जाडू निलू | ११ वी वाणिज्य. |
| १२) कु. जोशी सविता | ११ वी कला. |

**किरण लागू**
संचालक

*

# साहित्य संघटना

शैक्षणिक वर्ष १९८१–८२ साठी साहित्य संघटनेच्या व्यवस्थापन समितीवर सौ. प्रा. सुधा शाळिग्राम, प्रा. बा. गो. वाणी, प्रा. डब्ल्यू. आर. अहिरराव आणि प्रा. सौ. लीना पाटणकर या प्राध्यापकांचा समावेश होता. या समितीमध्ये सर्वश्री विवेक पुराणिक, राजेंद्र पारसकर, अशोक वंजारी आणि

कु. शुभांगी महाजन, कु. सीमा कुलकर्णी, कु. ज्योती गिरमे, कु. सुषमा देसाई आणि कु. प्रेमलता चव्हाण या विद्यार्थी प्रतिनिधींचा समावेश होता.

४ ऑगस्ट, १९८१ रोजी डॉ. य. दि. फडके यांच्या हस्ते या वर्षीच्या कार्याचा शुभारंभ झाला.

**व्याख्याने :** या वर्षात साहित्य संघटनेतर्फे पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली.

| तारीख | वक्ते | विषय |
|---|---|---|
| ४–८–८१ | डॉ. य. दि. फडके (प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ) | बाळ गंगाधर टिळक – एक माणूस |
| ५–९–८१ | डॉ. वि. म. दांडेकर. (प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ) | अर्थशास्त्रातील मूल्यसिद्धान्त |
| १४–९–८१ (हिंदी दिन) | श्री. प्र. द. पुराणिक (माजी मुख्याध्यापक, हिंदी हायस्कूल) | भारतीय सांस्कृतिक जीवनदृष्टि |
| २१–१–८२ | डॉ. एस्. बी. सावंत (प्रपाठक, भूगोल विभाग, पुणे विद्यापीठ) | भारतातील ग्रामीण वस्त्यांच्या समस्या |

**शिक्षक दिन :–** दि. ५ सप्टेंबर, १९८१ या दिवशी गोखले अर्थशास्त्र–राज्यशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. वि. म. दांडेकर यांचा एक ज्येष्ठ अध्यापक या नात्याने सत्कार करण्यात आला. विद्यार्थी सदस्यांनी महाविद्यालयातील प्राध्यापकांचा या प्रसंगी गौरव केला.

**भित्तिपत्रक :** संघटनेचे हे भित्तिपत्रक ऑक्टोबर महिन्यात प्रसिद्ध झाले. साहित्य शाखेतील विविध विषयांशी संबंधित अशा निवडक निबंधांचा या भित्तिपत्रकात अंतर्भाव होता. साहित्य शाखेकडील विद्यार्थ्यांनी हे निबंध लिहिलेले होते.

**अभ्यासभेट :** दिनांक १२ फेब्रुवारी, १९८२ रोजी महाविद्यालयातल्या प्रथम वर्ष साहित्य वर्गातील विद्यार्थ्यांनी डेक्कन कॉलेजमध्ये अभ्याससहल आयोजित केली होती. या सहलीत भाषा–प्रयोगशाळा पाहणे, पश्चिम विभागीय भाषा केंद्रामध्ये अमराठी लोकांना मराठी भाषेचे अध्यापन कसे केले जाते याचे अवलोकन करणे, अमराठी लोकांशी गप्पागोष्टी करणे, भाषाविषयक माहितीपट पाहणे इत्यादी कार्यक्रम झाले. या अभ्यासभेटीस डेक्कन कॉलेजमधील शास्त्रभाषा प्रगत केंद्राचे संचालक डॉ. अशोक केळकर यांचे बहुमोल सहाय्य झाले.

**चर्चासत्रे :** (१) महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महानगरीय समस्या या विषयावर एक चर्चासत्र २६ फेब्रुवारी १९८२ रोजी आयोजित करण्यात आले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन कु. सुमन जोशी यांनी केले. निरनिराळ्या उपविषयांवर अनेक विद्यार्थी–विद्यार्थिनींनी निबंधवाचन केले. त्याचाच एक भाग म्हणून राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी महानगरपालिकेस भेट दिली.

(२) महाविद्यालयातील मराठी विभागातर्फे दोन चर्चासत्रे घेण्यात आली. पहिल्या चर्चासत्रात डॉ. धायगुडे यांच्या ज्ञानेश्वरीवरील व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी चर्चा केली. दुसऱ्या चर्चासत्रात 'भाऊसाहेबांची कैफियत' या विषयावर कु. शुभांगी देशपांडे आणि 'तुकारामाचे अभंग' या विषयावर कु. शुभदा थिटे व सौ. माधवी गंधे यांनी निबंध सादर केले. अध्यक्षस्थानी डॉ. भीमराव कुलकर्णी होते.

**मुकुंद महाजन**
**कार्याध्यक्ष**

# वाणिज्य संघटना

प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष वाणिज्य वर्गातील सर्व विद्यार्थी या संघटनेचे सभासद असतात. या वर्षासाठी खालील विद्यार्थ्यांची विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून नेमणूक करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| राजू लाळे | — | तृ. व. वाणिज्य |
| राजू ढबू | — | ,, |
| आकाशी घुगे | — | ,, |
| श्रद्धा गानबोटे | — | द्वि. व. वाणिज्य |
| सुनीती पितळे | — | ,, |
| खानापूरकर | — | ,, |
| किशोर गंभीर | — | ,, |
| विवेक भालेराव | — | प्र. व. वाणिज्य |
| खोले | — | ,, |

प्रा. डॉ. माधवी मित्र यांची कार्याध्यक्ष म्हणून व प्रा. काशीद, प्रा. मुथा, प्रा. भारती डोळे व प्रा. प्रेमा आगाशे यांची प्राध्यापक सल्लागार म्हणून नेमणूक झाली. कार्यालयीन कामकाजाची जबाबदारी श्री. दिलीप खोपकर यांनी यशस्वीपणे सांभाळली.

संघटनेतर्फे या वर्षी खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**चर्चासत्र :** "कामगार चळवळीतील आधुनिक प्रवाह" या सध्याच्या ज्वलंत प्रश्नावर ऑगस्ट १९८१ मध्ये एक चर्चासत्र पदव्युत्तर विद्यार्थी संघटनेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात कामगार चळवळीतील नेते, व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, सरकारी अधिकारी व या क्षेत्रातील विचारवंतांनी भाग घेतला. प्रथम सत्राचे संचालन गोखले अर्थशास्त्र संस्थेतील प्रा. कल्याण दासगुप्त यांनी केले व दुसऱ्या सत्राची जबाबदारी श्री. मोहन धारिया यांनी सांभाळली.

स्वाती हार्डीकर, सुनीति दिघे, विद्या गोडखिंडी आणि सुनील दाढे या विद्यार्थ्यांनी 'कामगार संघटनांचे सभासदत्व', या विषयावर निबंध सादर केला.

**भित्तिपत्र :** 'कॉम' या भित्तिपत्राचे तीनच अंक या वर्षी प्रसिद्ध झाले. त्यांतील एका अंकाचे संयोजन कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केले होते.

भित्तिपत्राच्या संबंधात विद्यार्थ्यांनी जास्त उत्साह दाखवून परिश्रम करणे आवश्यक आहे.

या वर्षीच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन १५ ऑगस्ट रोजी महाविद्यालयातील सेवक श्री. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

**शैक्षणिक भेटी :** खालील औद्योगिक व व्यावसायिक संघटनांना भेटी देऊन त्यांच्या प्रत्यक्ष कामकाजाबद्दलची माहिती मिळवून विद्यार्थ्यांनी आपल्या पुस्तकीज्ञानाला व्यवहाराची जोड दिली.

गुलटेकडी कृषि उत्पादन बाजारपेठ, पुणे
राजाबहादुर मोतीलाल मिल्स लि; पुणे
मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, पुणे
स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि., खडकी.
शिवाजीनगर टेलिफोन एक्सचेंज, पुणे (कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी)

## प्रकल्प अहवाल स्पर्धा

गेल्या दोन वर्षांप्रमाणेच या वर्षीही प्रकल्प अहवाल स्पर्धा आयोजित करण्यात आली. एकूण ८ प्रकल्प अहवाल तयार करण्यात आले. गोखले अर्थशास्त्र संस्थेतील प्रा. डी. पी. आपटे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले त्यांनी विद्यार्थ्यांना ' संशोधनाची कार्यपद्धती ' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान दिले त्यांच्या हस्ते खालील प्रथम तीन क्रमांकांच्या अहवालांना बक्षिसे देण्यात आली.

प्रथम पारितोषिक :– ' दैनिक वृत्तपत्रे-लोकशाहीचा चतुर्थ आधारस्तंभ '
विवेक भालेराव, संतोष शर्मा, चंद्रशेखर कऱ्हाडकर

द्वितीय पारितोषिक :– ' Piece Promoting Peace ' –
शिरीष जोशी, राजू लाळे, सुनील दाढे, आकाशी घुगे

तृतीय पारितोषिक :– ' सिनेमा व सिनेमा गृहे '–अल्पना ताटके, सरिता पुंगलिया.

**निबंधस्पर्धा** : कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी गतवर्षीप्रमाणे या वर्षीही निबंधस्पर्धा घेण्यात आली. एकूण १८ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला. आपल्याच महाविद्यालयातील प्रा. यशवंत सुमंत आणि प्रा. निर्मला मोने यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रथम तीन क्रमांकांना पारितोषिके देण्यात आली.

प्रथम क्रमांक :– विद्याधर भागवत, द्वितीय क्रमांक :– विद्या गांधी.

तृतीय क्रमांक :– विभागून, मनीषा ओक व जी. रॉबर्टस्

**व्याख्याने** : प्रा. डी. पी. आपटे यांचे ' संशोधनाची कार्यपद्धती ' यावर, श्री. योगश शहा यांचे ' शेअर बाजारातील व्यवहार ' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

## नोकरी मार्गदर्शन शिबिर

पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी शोधण्याच्या कार्यात मार्गदर्शन करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे या वर्षीही एक शिबिर आयोजित करण्यात आले. यंदा शास्त्र संघटनेचे सहकार्य या शिबिराच्या आयोजनात मिळाले. अर्ज कसा करावा, मानसशास्त्रीय चाचण्या म्हणजे काय, मुलाखतीसाठी जाताना काय काळजी घ्यावी याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

**वाचनालय** : संघटनेच्या वाचनालयाचा फायदा तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी घेतला. वाचनालयातील कर्मचाऱ्यांचे या बाबतीत बहुमोल सहकार्य नेहमी प्रमाणे मिळाले.

**निरोप समारंभ** : तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्याचा समारंभ नेहमीच्या प्रथेनुसार करण्यात आला. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांतर्फे तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.

वरील सर्व कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ज्या सर्वांचे सहकार्य लाभले त्या सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद.

**माधवी मित्र**
कार्याध्यक्ष

*

# शास्त्र–संघटना

**व्यवस्थापन समिती :** **अध्यक्ष :** प्राचार्य स. य. गंभीर, **कार्याध्यक्ष :** प्रा. चं. ग. कुलकर्णी

**प्राध्यापक सदस्य :** श्री. वि. वि. उत्तुरकर, श्री. अ. वि. रायरीकर, श्री. ब. य. भिडे. श्री. (डॉ.) र. व. गंधे, ,श्री. अ. ब. दांडेकर, श्री. श्री. न. भिडे, श्री. वा. र. अहिरराव, श्री. प्र, श्री. कापरे.

**विद्यार्थी प्रतिनिधी :** तृतीय वर्ष शास्त्र : श्री. अ. ग. बेल्हे, श्री. ह. वा. अनगोळकर, श्री. व. कडुसकर, श्री. वि. दि. देशमुख, श्री. सु. दि. श्रेष्ठ.

द्वितीय वर्ष शास्त्र : कु. शु. नि. पाटील, श्री. अ. ह. पाटील, श्री स. बा. जगताप, श्री. मि. र. कुलकर्णी, श्री. बा. र. नाझीरकर, श्री. म. सो. लबडे, श्री. रा. वि. व्हावळ

**कार्यालयीन व्यवस्था :** श्री. भू. र. दोशी.

शास्त्र–संघटनेतर्फे यावर्षी खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

१) **उद्घाटनाचे व्याख्यान :** दि. २२ ऑगस्ट १९८१.

**विषय :** ' ॐकार, गायत्रीमंत्र आणि उपासना. '

**व्याख्याते :** श्री. स. कृ. देवधर, सहाय्यक निबंधक, सहकार खाते, महाराष्ट्र राज्य.

२) **माहिती पट :** दि. ११ सप्टेंबर १९८१ या दिवशी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष शास्त्राच्या विद्यार्थ्यांना खालील माहितीपट दाखविण्यात आले.

i ) Nature's Half Acre, ii) D. N. A.

वरील माहितीपटांच्या फिल्स् प्राचार्य, स. प. महाविद्यालय यांच्या सौजन्याने उपलब्ध झाल्या. आम्ही त्यांचे आभारी आहोत.

३) **विज्ञान कथा स्पर्धा :** वरिष्ठ महाविद्यालयांतील शास्त्रशाखेच्या विद्यार्थ्यांसाठी ' विज्ञान कथा स्पर्धा ' आयोजित करण्यात आली. एकूण १० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला. डॉ. द. दि. पुंडे यांनी परीक्षक म्हणून काम केले. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे —

| बक्षीस क्रमांक | कथेचे नाव | कथालेखक |
|---|---|---|
| १ | दृष्टिआड सृष्टी | कु. सविता कुलकर्णी<br>तृतीय वर्ष शास्त्र |
| २ | अजून चंद्रमा नभात | श्री. प्रमोद देशपांडे<br>द्वितीय वर्ष शास्त्र |
| ३ | (कोणासही देण्यात आले नाही) | |

४) **व्यवसाय मार्गदर्शन व्याख्यानमाला :** दि. १४ व १६ डिसेंबर १९८१ तृतीय वर्ष शास्त्रच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेत डॉ. श्री. वा. चितळे यांनी खालील चार व्याख्याने दिली. या व्याख्यानांतील महत्त्वाच्या माहितीची चक्रमुद्रित टिपणे विद्यार्थ्यांना वाटण्यात आली.

| क्रमांक | व्याख्यानाचा विषय |
|---|---|
| १ | व्यवसाय मार्गदर्शनाची आवश्यकता |
| २ | ' प्रगत अभ्यासक्रमाची क्षितिजे '<br>(' अ ' गटाच्या विद्यार्थ्यांसाठी) |

| क्रमांक | व्याख्यानाचा विषय |
| --- | --- |
| ३ | 'प्रगत अभ्यासक्रमाची क्षितिजे' ('ब' गटाच्या विद्यार्थ्यांसाठी) |
| ४ | व्यवस्थापनाचे आणि इतर काही अभ्यासक्रम. |

५) **प्रदर्शन** : रोटरी क्लब, पुणे यांनी दि. २२ व २३ डिसेंबर १९८१ रोजी आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे येथे शास्त्रीय प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनात आमच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. एकूण भौतिकीतील तीन चल प्रतिकृती व गणिताच्या अकरा अचल प्रतिकृती विद्यार्थ्यांनी सादर केल्या. त्यापैकी 'Angle between two skew-lines' या अचल प्रतिकृतीस तिसरे बक्षीस मिळाले.

६) **नोकरी मार्गदर्शन शिबिर** : वाणिज्य संघटनेच्या सहकार्याने हे सत्र दि. ६ व ७ फेब्रुवारी १९८२ रोजी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले या शिबीरात १०८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. हे शिबिर तीन सत्रांमध्ये घेण्यात आले.

**सत्र पहिले** : या सत्रात 'अर्ज कसे लिहावेत' या विषयी उपप्राचार्य प्रा. रायकर यांनी मार्ग दर्शन केले. मानसशास्त्रीय चाचण्यांची ओळख प्रात्यक्षिकांसह विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. ही जबाबदारी प्रा. (सौ.) सेन यांनी पार पाडली.

यानंतर संबंधित माहितीपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. ह्या फिल्म्स् 'राज्य शिक्षण शास्त्र संस्था' यांच्या सौजन्याने उपलब्ध झाल्या.

**सत्र दुसरे** : या सत्रात प्रथम प्रा. चं. गु. कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या अर्जाचे विश्लेषण केले. त्यानंतर प्रा. सौ. शाळीग्राम व प्रा. सौ. सेन यांनी विद्यार्थ्यांना 'समूह चर्चे'चे प्रात्यक्षिकांसह शिक्षण दिले.

श्री. पंजाबी (असिस्टंट पर्सोनेल-ऑफिसर, हिंदुस्थान अँटिबायोटिक्स) यांनी 'मुलाखती कशा द्याव्यात' यावर व्याख्यान दिले. ह्या व्याख्यानानंतर 'मुलाखतींची प्रात्यक्षिके' विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. या मुलाखती श्री. पंजाबी, प्रा. गोसावी, डॉ. (सौ.) मित्रा आणि कु. सविता कुलकर्णी यांनी घेतल्या. या मुलाखतींचे विश्लेषणही करण्यात आले.

**सत्र तिसरे** : या सत्रात 'नोकरी देणाऱ्यांच्या अपेक्षा' या विषयी विद्यार्थ्यांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन देण्यात आले. श्री. टी. सत्यनारायन् (मॅनेजर, मॅनपॉवर डेव्हलपमेंट, टेल्को), श्री जठार (चीफ रिजनल मॅनेजर, स्टेट बँक ऑफ इंडिया, पुणे), श्री. बोरडे (स्टेट बँक ऑफ इंडिया, पुणे)- श्री. कदम (मेंबर ऑफ बँकिंग सिलेक्शन बोर्ड), श्री. मुश्रीफ (असिस्टंट कमिशनर ऑफ पोलीस, (ट्रॅफिक), श्री. दिघे (रिजनल एम्प्लॉयमेंट ऑफिसर) या तज्ज्ञ व्यक्तींनी हे बहुमोल मार्गदर्शन केले.

प्रत्येक सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांना खुल्या चर्चेस वाव दिला होता. महत्त्वाच्या माहितीची चक्रमुद्रित टिपणे विद्यार्थ्यांना देण्यात आली.

७) **निरोप** : वर्षाअखेरीस तृतीय वर्ष शास्त्रच्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्ष शास्त्रच्या विद्यार्थ्यांतर्फे भावपूर्ण निरोप देण्यात आला.

संघटनेच्या कामात ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

**चं. गु. कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

## नियोजन चर्चा मंडळ

१९८०–८१ साठी नियोजन चर्चा मंडळाच्या व्यवस्थापन समितीमध्ये पुढील सदस्यांचा, समावेश होता. प्राचार्य स. य. गंभीर (अध्यक्ष), प्रा. रमेश शहा (कार्याध्यक्ष), प्राध्यापक सदस्य— प्रा. सौ. व्ही. एस. कुलकर्णी, प्रा. वाय. एम. सुमंत, प्रा. सुमन कौशल.

विद्यार्थी प्रतिनिधी —कु. शुभांगी महाजन, कु. शोभा कांबळे, श्री, संजय वाबळे.

२० ऑगस्ट १९८१ रोजी नियोजन चर्चा मंडळाचे उद्घाटन माननीय मोहन धारिया ह्यांच्या हस्ते झाले. ह्याप्रसंगी श्री. धारियाजींनी सहावी पंचवार्षिक योजना, सार्वजनिक वितरण व्यवस्था ह्या विषयांवर आपले विचार व्यक्त केले.

२१ सप्टेंबर १९८१ रोजी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. बँकेचे श्री. एन. बी. वाबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना बँकेच्या प्रत्यक्ष कामकाजाविषयी सविस्तर माहिती दिली.

३० सप्टेंबर १९८१ रोजी मुंबईच्या 'फोरम ऑफ फ्री एन्टरप्राईज' या संघटनेच्या वतीने 'सेठ वालचंद हिराचंद वक्तृत्वस्पर्धा आयोजित करण्यात आली. ह्या स्पर्धेमध्ये श्री. सुनील दाढे, श्री. संजय वाबळे आणि कु. संगिता वाणी हे स्पर्धक यशस्वी झाले.

२० जानेवारी १९८२ रोजी महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळ, पुणे या संस्थेची शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. या संस्थेचे विभागीय व्यवस्थापक श्री. एन. एच. मांजरेकर आणि त्यांचे सहकारी यांनी महामंडळाचे कामकाज, विविध योजना यांची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

संघटनेच्या कार्यक्रमात ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

रमेश शहा
कार्याध्यक्ष

## राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या नियमित कार्यक्रमाखेरीज यंदाच्या वर्षी दोन प्रमुख प्रकल्प पूर्ण करण्यात आले. विशेष उपक्रमांपैकी एक म्हणजे नाक। कान। घसा यांचे मोफत तपासणी शिबिर. ७ सप्टेंबर १९८१ रोजी हे शिबिर महाविद्यालयात घेण्यात आले. पत्रकाद्वारे व रेडिओ वरील निवेदनाद्वारे शिबिरास जास्तीत जास्त प्रसिद्धी देण्यात आली. शिवाय महाविद्यालयाच्या परिसरातील रहिवाशांना घरोघर स्वयंसेवकांनी हिंडून शिबीराची माहिती दिली. शिबीराच्या दिवशी सकाळी गरजूंची नोंदणी करण्यात आली. सुप्रसिद्ध नाक। कान। घसा तज्ञ डॉ. टेपन यांनी आपले सहकारी डॉ. सुरतवाला व डॉ. वाटवे यांच्या मदतीने सुमारे ३०० रुग्णांची तपासणी केली. उपमहापौर डॉ. शं. म. तोडकर यांनी शिबिराचे उद्घाटन केले. सर्व डॉक्टरांना महाविद्यालयातर्फे भेटवस्तू दिल्या. मॉडर्नच्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी बहुमोल आर्थिक सहाय्य केले.

यंदाच्या विशेष उपक्रमांतील दुसरा प्रकल्प म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांची, स्वराज्याची पहिली राजधानी किल्ले राजगड येथे रस्त्याचे कामामाठी पथकानी आठ शिबिरे आयोजित केली. श्री. सूर्यकांत भोसले, श्री. रमाकांत पाळंदे व अन्य ग्रामस्थांनी श्रमदान कामी विशेष सहकार्य दिले.

पथकाच्या निरनिराळ्या कार्मक्रमांस व उपक्रमांस प्राचार्य स. य. गंभीर, उपप्राचार्य डॉ. गाडगीळ, प्रा. चिरपुटकर, प्रा. रायकर, प्रा गोसावी, प्रा. गोखले इत्यादींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

पांडुरंग चिचकर, सुनीलकुमार तापडे
जबीन इनामदार, राजेंद्र केसकर
विद्यार्थी प्रतिनिधी

म. आ. कुलकर्णी
बा. गो. वाणी
कार्यक्रमाधिकारी

✳

## राष्ट्रीय छात्रसेना

१९८१-८२ ह्या शैक्षणिक वर्षी आपल्या महाविद्यालयातील खालीलप्रमाणे विद्यार्थी छात्र-सेनेच्या विविध विभागांमध्ये दाखल झाले होते.

| Unit | cadets |
|---|---|
| i) 1 MAH. Signal...................... | 01 |
| ii) 2 MAH. Girls...................... | 04 |
| iii) 3 MAH. Air...................... | 40 |
| iv) 3 MAH. Naval...................... | 37 |
| v) 3 MAH. Armd...................... | 07 |
| vi) 36 MAH. BN...................... | 53 |
| | Total 142 |

36 MAH. BN. NCC.

१) या युनिटमधील श्री. जगताप ए. एस्; शेख एम्. बी; कुलकर्णी ए. टी; रघतवान एस्. एस्. यांची Army Attachment कँपसाठी निवड झाली व त्यांनी तो कँप यशस्वीरित्या पूर्ण केला.

२) कोल्हापूर येथे वार्षिक शिबिरात झालेल्या विविध स्पर्धांमध्ये आपल्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले.

३) रक्तदान; सामाजिक कार्य ह्यामध्ये बहुसंख्येने आमचे विद्यार्थी होते. सुमारे ८० कि. मी. अंतराची (सायकलवर) सहल काढण्यात आली होती.

४) Pune Group H. Q. ने आयोजित केलेल्या NCC Seminar मध्ये आपल्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

१५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी ध्वजवंदन आयोजित केले होते. कॅप्टन आपटे; सबलेफ्ट. पाथरे हे दोन प्राध्यापक छात्रसेनेचे अधिकारी असून; अधिकारी प्रशिक्षणासाठी श्री. भोमे यांची निवड झालेली आहे.

CAPT. P. D. APTE
Officer-in-charge

✳

# कनिष्ठ महाविद्यालय

गतवर्षी प्रमाणेच या वर्षीही कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वीच्या १० तुकड्या व इयत्ता १२ वीच्याही १० तुकड्या अशा एकूण २० तुकड्या होत्या. त्यात कला शाखेच्या ४, शास्त्र-शाखेच्या ८ व वाणिज्य शाखेच्या ८ अशी विभागणी होती.

हुशार विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करून त्यांची जास्त तयारी करून घेण्याच्या दृष्टीने दरवर्षीप्रमाणेच यंदाही प्रयत्न करण्यात आले. १२ वी (शास्त्र) च्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या तयारीच्या दृष्टीने जास्तीच्या परीक्षा व प्रात्यक्षिके घेण्यात आली.

**व्याख्याने**– विद्यार्थ्यांनी काय व कसे वाचावे आणि आपले व्यक्तिमत्त्व कसे सुधारावे, या संबंधीचे मार्गदर्शन करणारे व्याख्यान उपप्राचार्य सीताराम रायकर यांनी ११ वी (शास्त्र) च्या विद्यार्थ्यांना दिले.

१२ वी (वाणिज्य) च्या विद्यार्थ्यांसाठी बृ. म. कॉलेज ऑफ कॉमर्स येथील प्रा. विलास जोशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. वाणिज्य शाखेची निवड का करावयाची व बी. कॉम. नंतर विद्यार्थ्यांना पुढे काय करता येईल याची अत्यंत उपयुक्त माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली.

१२ वी उत्तीर्ण होऊन वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर विषयांची निवड कशी करावी हा प्रश्न विद्यार्थ्यांपुढे उभा असतो. आपल्या महाविद्यालयात कोणकोणते विषय शिकविण्याची सोय आहे आणि आपल्याला पुढे काय करावयाचे आहे हे ठरवून विषयाची निवड कशी करावी याची माहिती देणारी व्याख्याने आयोजित करण्यात आली. कलाशाखेच्या विद्यार्थ्यांसाठी उपप्राचार्य सीताराम रायकर यांचे व्याख्यान झाले व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रा. सु. ग. दातार व प्रा. अ. गो. गोसावी यांनी मार्गदर्शन केले.

**जर्मन विभाग**– नाताळानिमित्त विद्यार्थ्यांना 'डी गूटे श्टूबे' (Die gute stube) हा चित्रपट दाखविण्यात आला.

रानडे इन्स्टिट्यूटच्या प्रा. शाईन यांनी 'दायचलँड आडरा डेडर लुफ्ट' हा स्लाईड शो दाखविला.

व्याकरणाचा पाठ विद्यार्थ्यांना समजविण्यासाठी बसहाबेन झी गेट्राटाम्ट ह्या विल्यसच्या स्लाईडस् दाखविण्यास आल्या.

डॉ. दामले यांनी विद्यार्थ्यांना जर्मन गाणी शिकविली. सर्व फिलमस् मॅक्समुल्लर भवनतर्फे मिळाल्या. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**नाट्यवाचन एकांकिका स्पर्धा** कला–मंडळातर्फे कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी नाट्यवाचन व एकांकिका स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धांना विद्यार्थ्यांनी खूप मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला. नटवर्य मामा पेंडसे यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

**निबंध स्पर्धा**– वाणिज्य संघटनेतर्फे वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी निबंधस्पर्धा घेण्यात आली. एकूण १८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. प्रथम तीन क्रमांकांना बक्षिसे देण्यात आली.

या सर्व कार्यक्रमांचे आयोजन आणि संयोजन करण्यामध्ये ज्या सर्वांचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहकार्य लाभले त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

**प्रा. प. स. चिरपुटकर**

## पदव्युत्तर विद्यार्थी मंडळ : अहवाल

ह्यावर्षी विद्यार्थ्यांना अधिक ज्ञान मिळावे ह्यासाठी खालील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

१) डॉ. जी. एस्. कामत. " Management Cooperative Sector."

२) डॉ. एम्. सी. दीक्षित. " Corporate Failures."

३) डॉ. सी. जी. वैद्य. " Financial problems in public sector undertakings."

४) श्री. विनायकराव कुलकर्णी, " Trade union movement."

५) श्री. योगेश शहा. " Transactions on stock exchange."

तसेच वाणिज्य मंडळाच्या सहकार्याने " Recent Trends in Trade Union Movement in India." ह्या विषयावर एक दिवसाचे चर्चा-सत्र आयोजित केले होते. ह्या चर्चासत्रात डॉ. दासगुप्ता व श्री. मोहन धारिया ह्यांनी सूत्रसंचालन केले. ह्या चर्चासत्रात विविध कामगार संघटनांचे नेते, सरकारी अधिकारी, व्यवस्थापन तज्ज्ञ, प्राध्यापक व विद्यार्थी ह्यांनी सक्रिय भाग घेऊन चर्चासत्र अत्यंत यशस्वी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सहकारी प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी ह्यांच्या उत्तेजन व सहकार्याबद्दल धन्यवाद.

**सु. ग. दातार**
कार्याध्यक्ष

*

## पदभ्रमण मंडळ

' पदभ्रमण मंडळ ' हा उपक्रम आपल्या महाविद्यालयात यावर्षी नव्यानेच सुरू करण्यात आला. निसर्गाकडे जाण्याची आवड वाढावी, साहसी वृत्ती निर्माण व्हावी आणि गड-किल्ल्यांची माहिती व्हावी हे उद्देश या उपक्रमामागे होते.

या वर्षात पदभ्रमण मंडळाचे कार्य खरोखरच उल्लेखनीय झाले. प्रथम सत्रात १९ जुलैला भाजे ते लोहगड, २३ ऑगस्टला कार्ले ते तुंगार्ली आणि २७ सप्टेंबरला ड्यूक्स नोज व टायगर्स लीप अशा तीन साहस-सहली आयोजित करण्यात आल्या. भाजे ते लोहगडला सुमारे ३६ विद्यार्थी व १० विद्यार्थिनी उपस्थित होते. त्यानंतर मात्र प्रत्येक साहस-सहलीस साधारणपणे १० विद्यार्थी व ५ विद्यार्थिनी अशी स्थिर उपस्थिती होती. धो धो कोसळणाऱ्या पावसाची साथ लाभलेल्या या पदभ्रमणांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला व पदभ्रमणाबद्दल चांगलेच आकर्षण उत्पन्न झाले.

द्वितीय सत्रात १७ ते २० डिसेंबर १९८१ या काळात पुणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या माझेरी-महाबळेश्वर या पदभ्रमणात आपल्या महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व ६ विद्यार्थी व ३ विद्या-

र्थिनींनी केले. याच सत्रात २५ व २६ जानेवारी १९८२ या दिवशी आयोजित केलेल्या सिंहगड ते राजगड या पदभ्रमणात १५ विद्यार्थी व ७ विद्यार्थिनी सहभागी झाले होते. राजगडावर व्यतीत केलेला प्रजासत्ताक दिन खरोखरच संस्मरणीय होता.

पहिल्याच वर्षातील पदभ्रमण मंडळाची ही कामगिरी ध्यानात घेता पुढील वर्षी अधिक भरीव कार्य होऊ शकेल असा आशावाद वाटतो. पदभ्रमण मंडळाच्या यावर्षीच्या कार्यात उपप्राचार्य श्री. रायकर यांची विशेष मदत झाली. त्यांचे मनःपूर्वक आभार !

महेन्द्र गोहेल

संयोजक

## ग्रंथालय विभाग

जून १९८१ मध्ये ग्रंथालय नवीन वास्तूमध्ये प्रविष्ट झाले.

जानेवारी १९८२ अखेर ग्रंथालयातील ग्रंथांची एकूण संख्या ३३००० झाली यामध्ये महाविद्यालयाने घेतलेले ग्रंथ, पुस्तकपेढीतील ग्रंथ, स्टुडंटस् रिक्रिएशन लायब्ररी ग्रंथ, शास्त्र, कला आणि वाणिज्य संघटना ग्रंथ आणि कनिष्ठ महाविद्यालयासाठी घेतलेले ग्रंथ या सर्वांचा समावेश आहे.

ग्रंथालयामध्ये एकूण ७५ नियतकालिके येतात, त्याचप्रमाणे पुणे आणि मुंबईमधील जवळजवळ सर्व मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रे घेतली जातात

विद्यापीठ अनुदान मंडळ पुस्तकपेढी योजनांतर्गत यावर्षी प्रथम सत्रात ११० विद्यार्थ्यांना आणि द्वितीय सत्रात ११० विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांना स्वतंत्र अभ्यासिकेची सोय यावर्षी नवीन इमारतीत सुरू करण्यात आली. अभ्यासिका सकाळी ८–३० ते रात्री १०–०० वाजेपर्यंत खुली ठेवण्यात येते.

३१ जानेवारी १९८२ अखेर झालेल्या कामकाजाचे दिवसात रोज सुमारे ४६९ पुस्तके याप्रमाणे एकूण ७४,३५६ पुस्तके विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी देण्यात आली.

वाणिज्य शाखेकडील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयात मुक्त प्रवेश ठेवण्यात आला आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मान्यवर व्यक्ती आणि संस्था यांनी भेटीदाखल दिलेल्या ग्रंथांमुळे ग्रंथालय समृद्ध होण्यास मदत झाली आहे. त्या सर्वांचे ग्रंथालय ऋणी आहे.

द. गो. बापट

ग्रंथपाल

# राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. राठी जुगलकिशोर रामपालजी | १२ वी सायन्स |
| २) | श्री. काजळे हेमंत रामचंद्र | " |
| ३) | कु. उपासनी चारुशीला माधव | " |
| ४) | श्री. गोखले नितीन मनोहर | " |
| ५) | श्री. भारांबे किशोर बळीराम | " |
| ६) | कु. शेवाळे निलीमा चंद्रकांत | " |
| ७) | श्री. कुलकर्णी संतोष दिगंबर | " |
| ८) | कु. मोरे शारदा हरीभाऊ | " |
| ९) | कु. पोटफोडे संगीता बाबूराव | १२ वी कॉमर्स |
| १०) | कु. भागवत राजश्री गोपाळ | " |
| ११) | कु. चिरपुटकर शुभांगी रामचंद्र | एफ्. वाय्. बी. एस्सी. |
| १२) | श्री. घारे मकरंद रमेश | एफ्. वाय्. बी. कॉम्. |
| १३) | कु. गानू सुजाता राजाराम | " |
| १४) | कु. करमरकर वासंती पांडुरंग | एस्. वाय्. बी. एस्सी. |
| १५) | कु. केदारी ज्योती बाबूराव | एस्. वाय्. बी. कॉम्. |
| १६) | कु. रणदिवे शुभांगी भास्कर | " |
| १७) | कु. वांकर अंजली गोविंद | टी. वाय्. बी. एस्सी. |
| १८) | कु. कुलकर्णी सविता सदाशिव | " |
| १९) | श्री. ढब्बू चंद्रशेखर विरभद्र | टी. वाय्. बी. कॉम्. |
| २०) | श्री. कुलकर्णी किरण दिगंबर | " |
| २१) | कु. गोडखिंडी विद्या शंकर | एम् कॉम्. पार्ट–१ |
| २२) | कु. जोशी पद्मजा प्रभाकर | एम्. कॉम्. पार्ट–२ |
| २३) | श्री. बोन्हाडे विजय महादेव | ११ वी सायन्स |
| २४) | श्री. डोंगरे कैलास रामचंद्र | " |
| २५) | श्री. जोग श्रीनिवास रमेश | " |
| २६) | श्री. महाजन सतीश भास्कर | " |
| २७) | कु. शेख रहिमा अब्दुलगनी | " |
| २८) | कु. शिरगांवकर उषा निळकंठ | ११ वी कॉमर्स |

## राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कोठावदे राजेश जगन्नाथ | १२ वी सायन्स |
| २) | श्री. उदास गिरीश पुरुषोत्तम | " |
| ३) | श्री. पलांडे सुधाकर शिवाजीराव | एफ्. वाय्. बी. एस्सी. |
| ४) | श्री. शिंदे सुधीर राजाराम | १२ वी सायन्स |
| ५) | श्री. गोरडे विठ्ठल कारभारी | एस्. वाय्. बी. एस्सी. |

| | |
|---|---|
| ६) श्री. गोरडे शिवाजी बबन | एस्. वाय्. बी. एस्सी. |
| ७) कु. कणसे सुरेखा अनंत | ,, |
| ८) कु. काळे ज्योती विठ्ठलराव | ,, |
| ९) कु. लेणे शैलजा विश्वास | एस्. वाय्. बी. कॉम. |
| १०) कु. भावे सुवर्णा वसंत | टी. वाय्. बी. कॉम्. |
| ११) श्री. दाते मिलींद भालचंद्र | ,, |
| १२) कु. दीक्षित सुनंदा सुधाकर | ,, |
| १३) कु. खोले केतकी आनंद | ११ वी सायन्स |
| १४) श्री. पत्की नितीन शशिकांत | ११ वी सायन्स |

## राज्य सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| १) कु चावरे शुभदा जयंत | एस्. वाय्. बी. ए. |
| २) कु. कुलकर्णी सीमा मधुकर | ,, |
| ३) कु छत्रे रश्मी सदाशिव | एस्. वाय्. बी. एस्सी. |
| ४) कु. देशमुख कविता ज्ञानेश्वर | ,, |
| ५) कु. इप्पर लता पोपट | टी. वाय्. बी. ए. |
| ६) देशमुख संगीता शिवाजीराव | टी. वाय्. बी. एस्सी. |
| ७) श्री. प्रभुणे धनंजय रामचंद्र | टी. वाय्. बी. कॉम्. |
| ८) कु. हसबनीस विभावरी यशवंत | ,, |
| ९) कु. पाटसकर संजीवनी वसंत | ,, |
| १०) कु. मोरे माधुरी चिंतामण | ,, |

## भारत सरकारची हिंदी शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| १) कु. चव्हाण प्रेमलता विठ्ठल | एफ्. वाय्. बी. ए. |
| २) कु. सबनीस सविता जनार्दन | एस्. वाय्. बी. ए. |

## प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| १) कु. जोशी हेमा प्रभाकर | एस्. वाय्. बी. एस्सी. |
| २) कु. कुलकर्णी अनिता गोपाळ | ,, |

## राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| १) श्री. दाढे सुनील श्रीकृष्ण | टी. वाय्. बी. कॉम्. |

## श्री साईबाबा संस्थान शिर्डी शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| १) कु. देशपांडे संध्या रघुनाथ | ११ वी कॉमर्स |
| २) कु. औटी जनाबाई विष्णू | एस्. वाय्. बी. एस्सी. |
| ३) श्री. रामगुडे शिरीष दत्तोबा | टी. वाय्. बी. कॉम्. |
| ४) श्री. शेवाळे ज्ञानदेव नामदेव | ,, |

## सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत

| | |
|---|---|
| १) श्री. चिगरे संदीप दामोदर | ११ वी सायन्स |
| २) कु. जाधव लता यशवंत | ,, |
| ३) श्री. राणे राजेंद्र वसंत | ,, |
| ४) श्री. पंडीत मुकुंद माधव | १२ वी सायन्स |
| ५) कु. जोगळेकर वंदना रा. | १२ वी कॉमर्स |
| ६) श्री. पवार विजय वसंत | एफ्. वाय्. बी. एस्सी. |
| ७) कु. डोंगरे साधना मनोहर | एफ्. वाय्. बी. कॉम्. |
| ८) श्री. कदम राजीव कृष्ण | ,, |
| ९) श्री. पंडीत मिलींद माधव | ,, |
| १०) श्री. वायदंडे विजय गणपत | ,, |
| ११) कु. बारसकर मंगला रामचंद्र | एस्. वाय्. बी. ए. |
| १२) कु. राणे छाया वसंतराव | एस्. वाय्. बी. कॉम्. |
| १३) श्री. बोराटे सुधीर दिनकर | टी. वाय्. बी. एस्सी. |
| १४) श्री. जाधव विलास कोंडीराम | ,, |

## स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत

| | |
|---|---|
| १) कु. बोधनी शैलजा रामचंद्र | ११ वी आर्टस् |
| २) श्री. जाधवराव दौलत पिलाजीराव | १२ वी आर्टस् |
| ३) श्री. उभे सुनील पंढरीनाथ | १२ वी सायन्स् |
| ४) कु. पाटील वंदना रामचंद्र | १२ वी कॉमर्स. |
| ५) कु. पाटील वर्षा रामचंद्र | एफ्. वाय्. बी. कॉम्. |
| ६) श्री. फडतरे अनिल अनंत | ,, |
| ७) श्री. दंडवते अच्युत दिगंबर | एस्. वाय्. बी. एस्सी. |
| ८) श्री. भटेवरा राजेंद्र अमोलकचंद | एस्. वाय्. बी. कॉम्. |
| ९) कु. जाधवराव मंदाकिनी पिलाजीराव | टी. वाय्. बी. कॉम्. |
| १०) श्री. काळे अजय वासुदेव | ,, |
| ११) श्री. मैरवकर भानुदास केशवराव | एम्. कॉम्. पार्ट १ |
| १२) कु. शाह भाग्यश्री रतनलाल | ,, |

## ई. बी. सी. शिष्यवृत्ती (कनिष्ठ महाविद्यालय)

| | |
|---|---|
| १) श्री. बोंबले सुभाष लक्ष्मण | १२ वी सायन्स |
| २) कु. दुधाळे शुभांगी तुकाराम | ,, |
| ३) श्री टेब्रें सुधीर चिंतामण | ,, |
| ४) कु. बडवे मोहिनी नारायण | १२ वी कॉमर्स |
| ५) कु. खैरे सुजाता दिनकर | ,, |

| | |
|---|---|
| ६) कु. खेडकरमंजिरी शामराव | १२ वी कॉमर्स |
| ७) श्री. महाता नरेश मोहनलाल | ,, |
| ८) श्री. हाडवळे अंकुश तुकाराम | ११ वी सायन्स |
| ९) श्री. जोशी अनंत शंकर | ,, |
| १०) श्री. संकपळ राजेंद्र शिवाजी | ,, |
| ११) श्री. जाधव प्रवीण अर्जुनराव | ,, |
| १२) श्री. काळे राजू भिकोबा | ११ वी कॉमर्स |
| १३) कु. कळसकर सुनंदा बाळासाहेब | ,, |

ई. बी. सी. फी सवलत मिळणारे विद्यार्थी.
कनिष्ठ महाविद्यालय :– २८१
वरिष्ठ महाविद्यालय :–५२०
प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत
कनिष्ठ महाविद्यालय :– ६८
वरिष्ठ महाविद्यालय :– ८८
भारत सरकारची शिष्यवृती (मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी)
कनिष्ठ महाविद्यालय – १७०
वरिष्ठ महाविद्यालय :– १००
महाराष्ट्र राज्य शासनाची फी सवलत (मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी)
कनिष्ठ महाविद्यालय :– ४३
वरिष्ठ महाविद्यालय :–२५
महाविद्यालयीन शिष्यवृत्ती
वरिष्ठ महाविद्यालय :– १६०
महाविद्यालयीन फी सवलत
वरिष्ठ महाविद्यालय :–३४
एस्. एस्. डी. एड्. शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत.
कनिष्ठ महाविद्यालय :– ४
वरिष्ठ महाविद्यालय :– १२